
साप्ताहिक
माणूस
१४ एप्रिल ८४ / दोन रुपये

# कांबळे यांनी उभा केलेला रामायणातील संस्कृती-संघर्ष

## -एक राजकीय चिखलफेक





# इचलकरंजी ते हैदराबाद

एका नव्या विषयाची सुरवात

साप्ताहिक

**माणूस**

◻

वर्ष : तेविसावे

अंक : सेहेचाळीसावा

◻

१४ एप्रिल १९८४

किंमत : दोन रुपये

◻

संपादक

श्री. ग. माजगावकर

◻

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

◻

वार्षिक वर्गणी

पन्नास रुपये

◻

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

◻

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

◻

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ३०

दूरध्वनी : ४४३४५९

◻

मुखपृष्ठ

संजय पवार

# सप्रेम नमस्कार १

माणूस

## मिलिंद कॉलेजातला गोंधळ

◻ सर्व दीन-दलितांना शिक्षण मिळावे अशी डॉ. आंबेडकरांची खूप इच्छा होती. शिक्षणामुळे माणसाचा इतर अनेक क्षेत्रात दर्जा वाढतो, हे त्यांना चांगले माहीत होते. दीन-दलितांना सामाजिक अन्यायापासून त्यांनी सोडविले तसेच त्यांच्या शिक्षणासाठीही त्यांनी अहोरात्र कष्ट सहन केले.

१९४५ साली त्यांनी पीपलस एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली व १९४९ साली औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. त्यामागे त्यांचा उद्देश केवळ दलितांना शिक्षणाची दारे उघडे करून देण्याचाच नव्हता तर, त्याबरोबर संस्कार, रीत व चांगूलपणा या गोष्टीही या समाजाला आणखी जास्त कळायला हव्यात असे त्यांना वाटे. मिलिंद महाविद्यालयात प्रवेश करताना, महाविद्यालयाच्या प्रवेशद्वाराच्या भितीला टांगलेल्या त्यांच्या भाषणावरूनच हे स्पष्ट होते. मिलिंद राजा व नागसेन बौद्ध भिक्षू यांच्या उदाहरणावरून त्यांनी एक आदर्श प्राध्यापक व विद्यार्थी समोर ठेवला आहे.

पण या आदर्शाचे पालन प्राध्यापक अथवा विद्यार्थी आज कितपत करतात ? मिलिंद व नागसेन यांना तर सोडाच; परंतु डॉ. बाबासाहेबांचा आदर्श तरी हे मानतात का ? याची शंका मिलिंद महाविद्यालयात चाललेल्या गोंधळावरून येते. मागील काही वर्षांपासून या महाविद्यालयात नुसता सावळा गोंधळ दिसतो.

दहा–बारा वर्षे पाठीमागे जाऊन जर हे कॉलेज पाहिले व आज हे कॉलेज पाहिले तर त्यांच्यात जमीन अस्माना एवढा फरक जाणवतो.

राजकारण हा या कॉलेजचा एक भाग बनलेला आहे. हे महाविद्यालय नसून राजकारणाचा अड्डा आहे असेच म्हणावे लागेल. विद्यार्थी व प्राध्यापक–प्राचार्य यांच्यात स्नेहाचे सबंध दिसत नाहीत. चाकू, सुऱ्या, सायकल चेनचा वापर करून आपसातच एकमेकाची डोकी फोडणे असे प्रकार या कॉलेजच्या आवारात कित्येक वेळा झाले आहेत.

अगदी कालपरवाच, येथे हा प्रकार घडून आला. चाकू-सुऱ्यांचा वापर करून व बाहेरील गुंड आणून विद्यार्थ्यांची हाणामारी झाली त्यात दत्ता ठोबले व विष्णु ठोवळे जखमी झाले. प्रत्यक्ष विष्णु ठोबले यास भेटलो असता त्याने सांगितले की, 'प्राचार्य हटाव' ही आपली चळवळ दाबून टाकण्यासाठीच स्वत: प्राचार्यानेच हा डाव खेळला. ते काही असो; परंतु डॉ. आंबेडकरांच्या कॉलेजमध्ये असे प्रकार घडून येणे म्हणजे डॉ. आंबेडकरांच्या आदर्शाची पायमल्ली करणेच नव्हे का ?

बऱ्याच विद्यार्थ्यांना व प्रतिष्ठीत व्यक्तींना मी भेटलो असता, त्यांना मी मिलिंदविषयी प्रश्न केला, तर ते सहजतेने म्हणाले, 'काय राहिलंय त्या कॉलेजात ? नुसता गोंधळ !'

डॉ. आंबेडकरांचे कॉलेज म्हणून महाराष्ट्राच्या सर्व कोपऱ्यातून, येथे विद्यार्थी शिक्षणास येतात. त्यांचे आई-वडीलही त्यांना स्वखुषीने 'बाबाचे कॉलेज' म्हणून पाठवितात; परंतु एका वर्षाच्या आतच विद्यार्थी कंटाळून जातो.

काही राजकारणी हस्तक, या कॉलेजच्या विद्यार्थ्यांना नेहमी बहकवतात. त्यामुळे त्यांचे फावते; परंतु विद्यार्थ्यांचे अत्यंत नुकसान होते. वर्ष बघत–बघत निघून जाते व विद्यार्थी ऐन वेळी काही करू शकत नाही.

खेड्यातील विद्यार्थी या कॉलेजात जास्त आहेत. तसे सर्व ठिकाणी आहेत; परंतू

मिलिंदचा विद्यार्थी म्हटलं की, गरिबीने ग्रासलेला. मुलगा शिकतोय म्हणून आई-वडिलांनी स्वप्नांचे डोंगर रचलेले असतात; पण राजकाराण्यांचा अड्डा झालेल्या कॉलेजात विद्यार्थी काय शिकणार ? शेवटी आई-वडिलांच्या पदरी काय मिळते ? केवळ दुःख, उपेक्षा !

मागील दहा वर्षांमागील कॉलेजची प्रगती व दहा वर्षांपुढील प्रगती पाहिली तर तितकीशी बरी नाही. मिलिंद कॉलेजातील या उणीवा, गोंधळ पाहाता शासनाने हे कॉलेज हातात घेऊन संरक्षण द्यावे. अशी इच्छा आहे. त्याशिवाय कॉलेजातील हा सावळा गोंधळ बंद होणे शक्य नाही !

६ एप्रिल ८४ — अशोक बनसोडे
लोखंडी सावरगावकर
औरंगाबाद

□ १) इंडिया इंटरनॅशनल या केंद्रातर्फे झालेल्या परिसंवादाचा वृत्तांत वाचला. (३१ मार्च ८४) आवडला. त्यामुळे प्रचलित काव्यप्रवाहांचा परिचय झाला.

डॉ. निशिकांत मिरजकरांचा 'मराठी कवितेतील प्रचलित प्रवाहा'वरील मूळ निबंध मागवून तो 'माणूस'मधून प्रकाशित करावा ही विनंती. त्यांचे लेखन काव्यरसिकांना खचितच उपयुक्त ठरेल, आवडेल. (हे मी त्यांचं इतर लेखन वाचूनच सांगत आहे. त्यांचं लेखन पूर्वी, माणूसच्या अंकातून येऊन गेल्याचं आठवतं).

मराठी वाङ्मयाचा परिचय परभाषिकांना फारसा झाला नाही, ही दुर्दैवाची बाब आहे. अनेक श्रेष्ठ मराठी ग्रंथांचा इंग्रजी अथवा हिंदी अनुवाद झालाच नाही, याचे कारण बहुधा मराठी वृत्तीत सापडते. आपले लेखन परभाषिकांपर्यंत पोचावे असे किती प्राध्यापक–लेखकांना वाटले ? त्या दिशेने किती प्रयत्न झाले ? आज काही इंग्रजी नियतकालिकांतून प्रादेशिक भाषांतील वाङ्मयानुवाद सातत्याने प्रकाशित होत असतो, हे किती मराठी बुजुर्ग लेखकांना माहीत आहे ? मराठीविषयी इंग्रजीतील 'एन्सायक्लोपीडिया'तून अपूर्ण व चुकीची माहिती येत असते, याकडे किती लेखकांचं लक्ष आहे ? (पुरावा : पाहा – प्रिन्स्टन एन्सायक्लोपीडिया ऑफ पोएट्री अँन्ड 'पोएटिक्स् १९७४'च्या आवृत्तीतील डॉ. व्ही. राघवन यांनी लिहिलेले मराठी कवितेवरील टिपण. त्यात गिरीश व यशवंत हे 'More recent' कवी ठरवले आहेत.) साहित्य अकादमीतर्फे प्रकाशित होणाऱ्या ('इंडियन लिटरेचर'च्या अंकातून इतर प्रादेशिक भाषांतील लेखन अधिक असतं. तेव्हा मराठी साहित्यिकांनीही अनुवादाकडं अधिक लक्ष देणं आवश्यक आहे असं मला वाटतं.) डॉ. प्रभाकर माचवेंनी साहित्य अकादमीचे सेक्रेटरी असताना 'इंडियन लिटरेचर'चा एक मोठा मराठी कविता विशेषांकच काढला होता. नंतर डॉ. आर. एस. केळकरांच्या काळात मराठीला फारसं प्रतिनिधित्व मिळालं नाही.

२) 'ऑथर्स गिल्ड'ची स्थापना १९७४ साली झाली, १९८१ साली नव्हे. ('कॉन्स्टिट्यूशन ऑफ ऑथर्स गिल्ड ऑफ इंडिया'ची १९७४ सालची प्रत माझ्याकडे आहे. एवढंच नव्हे तर जानेवारी १९७६ पासून 'इंडियन ऑथर' या नावाचं एक त्रैमासिक निघत असतं. १९७४ सालीच त्या संस्थेची सभासद संख्या दोनशेच्या वर होती. आता ती खूपच वाढली असेल असे वाटते. (पाहा : इंडियन ऑथर : खं १, नं. ४. ऑक्टोबर–डिसेंबर १९७६). वकील, प्राध्यापक, लेखक व इतर वर्गांतील लोक गिल्डचे सभासद असले तरी काही राजकारणीही त्यात नेहमी वावरतात. अप्रत्यक्षरीत्या ही संस्था काँग्रेस पक्षाशी बांधील आहे. त्यास भरपूर अनुदान मिळते व दरवेळी कार्यक्रमात काँग्रेस पक्षीय व्यक्ती असतेच. या वेळी श्रीकांत वर्मांची वर्णी लागली आहे असे दिसते.

३) का. ना. सुब्रमण्यम् हे जुन्या पिढीतील लेखक. त्यांचा ओढा जुन्या तामीळ साहित्याकडे आहे. 'समकालीन प्रवाह–प्रवृत्तीं'वर त्यांचे फारसे लेखन नसतेच. ते इंग्रजी व तमिळ अशा दोन्ही भाषांतून लेखन करतात. त्यांनी इंग्रजीत बरंच तमिळ साहित्य अनुवादित केले आहे त्यांना तमिळविषयी फार अभिमान वाटतो व ते तळमळीनं लिहीत असतात. ते कथाकार व इतर तऱ्हेचं जास्त लेखन करतात; पण ते श्रेष्ठ कवी असल्याची माहिती नाही. त्यांचा आणि ऑथर्स गिल्डचा अगदी सुरुवातीपासून संबंध असल्यामुळे त्यांना तमिळ काव्याविषयी बोलण्यास सांगण्यात आलं असावं असं मला वाटतं.

१ एप्रिल ८४ — विश्वनाथ खोटे
सोलापूर

□

# सर्वोदय हॉस्पिटलमधील दुर्दैवी मृत्यू !

**अहमदनगर**

दि. १–२–१९८४

चीफ ज्युडीशिअल मॅजिस्ट्रेट श्री. एच्. एम्. मोहिते आपलं निकालपत्र वाचत होते– 'मृत्यूच्या कारणाचा सविस्तर तपशील फिर्यादीची बहीण व पत्नी यांच्या साक्षीत आला आहे.

'वजनदार' आरोपीने पोलीसचौकशीत अडथळा निर्माण करण्याचे प्रयत्न केले हे फिर्यादी पक्षाचे म्हणणे ग्राह्य धरण्यास पुरेसा वाव आहे.

मृत्यूच्या दिवशी संध्याकाळी ६ वाजता मुलीला तपासून औषधोपचार करणाऱ्या डॉ. देशपांडे यांच्या म्हणण्यानुसार मुलीची प्रकृती चांगली होती हे स्पष्ट झालेले आहे. मुलीला प्रतिबंधक लस, डोस देणाऱ्या अश्वी येथील डॉ. अशोक शिंदे यांच्या साक्षीने, साक्षीदार डॉ. देशपांडे यांच्या म्हणण्याला दुजोरा दिला आहे.

साक्षीदार डॉ. रसाळ यांचीही साक्ष या संदर्भात महत्त्वाची ठरते. त्यांच्या म्हणण्यानुसार घटसर्पाच्या ( Diptoria ) डायग्नोसिससाठी कापसाचा बोळा घशात घालणे आवश्यक असले तरी खोलवर घातलेला

असा बोळा मृत्यूलाही कारण ठरू शकतो आणि दडपणाने असा बोळा घशात घातल्याने भीतीने लहान मुलाचा मृत्यूही ओढवू शकतो. न्यूमोनियाने असा मृत्यू येऊ शकत नाही. न्यूमोनियासाठी घशात बोळा घालण्याची आवश्यकता नाही.

दि. ७–११–८३ रात्री १० चे सुमारास मृत्यू झाला. त्यानंतर दि. ८–११–८३ ला सकाळी ५ वा. प्रेत नेले. या दरम्यान अगर नंतरही डॉक्टरनी पोलीसरिपोर्ट करणे आवश्यक असताना रिपोर्ट केला नाही. 'न्यूमोनियाने मृत्यू' हे मृत्यूचे दिलेले सर्टिफिकेट खोटे कारण दाखवते.

औषधोपचार करत असताना, मुलगी तीव्र प्रतिकार करत असतानासुद्धा मुलीच्या घशात कापसाचा बोळा घालण्याचा प्रयत्न करून तिच्या घशात बोळा घालून तपासणी करणाऱ्या डॉक्टरांच्या या कृत्यामुळे मुलीचा मृत्यू झाला. डॉक्टरांचे हे वागणे आडदांडपणाचे आणि निष्काळजीपणाचे आहे आणि प्रथमदर्शनी पुराव्यावरून इंडियन पिनल कोडच्या कलम ३०४ (a) नुसार कारवाईस पात्र आहे.

## मिनल राजी नव्हती !

आपल्या ट्रीटमेंटचा अंतिम परिणाम काय होऊ शकतो हे माहीत असतानाही आणि मुलीने चावा घेऊन प्रतिकार केला असताना, मुलीच्या आईने आणि मावशीने डॉक्टरांना त्यांच्या या वर्तनापासून परावृत्त करण्याचा प्रयत्न केला असतानाही डॉक्टरनी त्यांच्याकडे दुर्लक्ष केले आणि मुलीचा मृत्यू ओढवला. हे कृत्य इंडियन पिनल कोडच्या कलम ३०४ नुसार कारवाईस पात्र आहे.

सर्व साक्षीपुरावे बघता मिनलच्या मृत्यूची केस प्रथमदर्शनी आय. पी. सी. च्या कलम १९७, ३०४, ३०४ (ब), २०२ नुसार कारवाईस पात्र ठरते. म्हणून मी 'प्रोसेस इश्यू' ची ऑर्डर देत आहे–'

दि. ३–११–१९८३ रोजी दुपारी १२ वा अॅड्. अमृत गांधी आपली पत्नी सरला आणि दोन छोट्या मुली सोनल आणि मिनल वय वर्षे चार आणि दोन यांच्यासह आश्वीहून निघून मजल-दरमजल करीत दुपारी ४ वाजता अहमदनगरला आपल्या वहिणीकडे सरोजिनी गुगळे यांच्या घरी पोहचले.

दि. ७–११–८२ ला ते नगरशहरातच होते.

नगरला आलोच आहोत तर आपल्या प्रकृतीची तपासणी करून घ्यावी. कारण आश्वीसारख्या खेडयात चांगली, योग्य तपासणी होईल याची खात्री नाही. म्हणून अॅड् गांधी सात तारखेला सकाळी ११.४५ वाजण्याच्या सुमारास आयुर्वेदिक महाविद्यालयाच्या दवाखान्यात डॉ. कुलकर्णी यांच्याकडे गेले. बरोबर पत्नी आणि दोन्ही छोट्या मुली होत्या. त्यांनी स्वतःचा केसपेपर तयार केला. आपल्या मिनलचेही अंग जरा गरम लागतंय–ताप असावा. या आपल्या पत्नीच्या तक्रारीवरून त्यांनी आपल्या मुलीचाही केसपेपर तयार केला. डॉ. कुलकर्णी यांनी दोघांना तपासले ! थोडा ताप आहे– औषध देतो, लगेच आराम वाटेल' म्हणून डॉ. कुलकर्णींनी छोट्या मिनलसाठी औषध दिले.

दुपारीसुद्धा मिनलच्या अंगातला ताप कमी झालेला जाणवला नाही. म्हणून अॅड. गांधी यांनी आपल्या बहिणीकडे जवळपासच्या दवाखान्याची चौकशी केली. मिनलला त्यांनी 'तुला ताप आलाय' सांगितल्यावर 'पपा, मला दात येतायेत ना म्हणून ताप आलाय' असं बोबड्या बोलीत ऐकवून त्या दोन वर्षांच्या चिमुरडीनं सगळ्यांना हसवलं होतं.

काही कामासाठी कडयाला जायचे होते म्हणून एखाद्या चांगल्या डॉक्टरला दाखवा असे सांगून ३॥ वाजण्याच्या सुमारास अॅड. गांधी निघून गेले.

संध्याकाळी सरोजिनी गुगळे आणि सरला गांधी दोघी जणी मिनलला घेऊन जुन्या बाजारातील डॉ. देशपांडे यांच्याकडे गेल्या. डॉ. देशपांडे यांनी मिनलची पूर्ण तपासणी केली. इंजक्शन दिलं. औषधासाठी प्रिस्क्रिप्शन दिले आणि काळजी करण्यासारखं काहीच नाही. लवकर बरे वाटेल. नाही तर रात्री पुन्हा दवाखान्यावर घेऊन या ! असे सांगितले.

रात्रीही अंगात ताप होताच, धापही लागली होती. काळजी स्वस्थ बसू देईना म्हणून दोघीजणी मिनलला घेऊन रात्री ९ वा. पुन्हा डॉ. देशपांडे यांच्याकडे गेल्या. दम्याच्या त्रासाने अस्वस्थ असल्याने डॉक्टर दवाखान्यात येणार नसल्याचे समजल्यावरून दोघीजणी जवळच्याच डॉ. मुथा यांच्या 'ममता क्लिनिक'मध्ये गेल्या.

डॉ. अशोक मुथा यांना त्यांनी डॉ. देशपांडे यांनी दिलेली ट्रीटमेंट आणि प्रिस्क्रिप्शन दाखवली. डॉ. मुथांनी मिनलला न्यूमोनिया असल्याचे सांगून आपल्या कंपाउंडरला दोन इंजक्शन्स द्यायला सांगितली.

आणि पुन्हा इंजक्शन्स आणि ऑक्सिजन द्यायला लागेल म्हणून आपल्या 'सर्वोदय हॉस्पिटल'ला अॅडमिट करायला सांगितलं.

मिनलला घेऊन दोघीजणी हॉस्पिटलमध्ये गेल्या. डॉक्टर मुथा मागाहून येणार होते. उपचारासंबंधी त्यांनी नर्सला सूचना दिल्या होत्या.

हॉस्पिटलमध्ये नर्सने मिनलला ऑक्सिजनची नळी लावली, मिनलने ती झटकून टाकली. आईने समजावून सांगितल्यानंतर मात्र शांतपणे कॉटवर पडून राहिली. अजूनपर्यंत डॉक्टर आलेले नव्हते म्हणून दोघींनी नर्सला फोन करण्यास सांगितले. नर्स फोन करायला गेली आणि थोड्या वेळात डॉक्टरांच्याबरोबर आली.

डॉक्टर नाडी तपासत होते तेवढ्या वेळात मिनलने ऑक्सिजनची नळी काढून टाकली आणि आईकडे धाव घेतली. पुन्हा आईने शांत केले. कॉटवर झोपवलं. पुन्हा डॉक्टर ऑक्सिजन लावणार असतील म्हणून; पण डॉक्टरांनी आता त्याची आवश्यकता नाही म्हणून सांगितलं.

प्रथम तिचा घसा साफ करतो म्हणून नर्सला सक्शनमशिन आणायला सांगितलं. झोपवलेल्या मिनलचे हात–पाय, डोके नर्सकंपाउंडरने धरून ठेवले– डॉक्टरनी नळी घशात फिरवली. त्यात काही आले नाही असे बघून डॉक्टरनी नर्सला कात्र्या, चिमटे, कापूस आणायला सांगितला.

मिनल या कोणत्याच उपचाराला राजी नव्हती !

पुन्हा तिला पहिल्यासारखी पकडून डॉक्टरनी चिमटयाने कापसाचा बोळा पकडून घसा साफ करण्याचा प्रयत्न चालविला. मिनल डॉक्टरांच्या बोटाला कडकडून चावली आणि निसटून आईकडे पळाली ! तिचा प्रतिकार बघून आईनेही डॉक्टरांना हे उपचार थांबवायला सांगितले; पण डॉक्टर ऐकायला राजी नव्हते. त्यांनी पुन्हा आपले उपचार जारीच ठेवले. मिनलचेही निसटण्याचे प्रयत्न चालूच राहिले. या प्रय-

त्नात चिमटा व बोळा घशात फिरवल्या-बरोबर मिनलची हालचाल एकदम बंद झाली. आईने डॉक्टरांचे तिच्या या अवस्थेकडे लक्ष वेधले; पण डॉक्टर आपल्याच नादात मश्गुल! त्यांनी बोळा काढला वर धरून बघितला– मिनलच्या अवस्थेनं आई, मावशी रडायला लागल्या. तेव्हा डॉक्टरांनी बोळा बाजूला टाकून ऑक्सिजनची नळी नाकात घातली, छाती चोळू लागले–

पण आता खूप उशीर झाला होता–

चिमुरडी मिनल आता ऑक्सिजनची नळी झटकून टाकणार नव्हती. प्रतिकारही करणार नव्हती. नर्सला आता तिचे हातपाय धरायला लागणार नव्हते. ती आता शहाण्या मुलीसारखी शांत झोपली होती! डॉक्टरांनी तिच्याकडे बघितलं: थंडपणानं म्हणाले. 'ती गेली–'

आणि निघून गेले!

■

रात्री ११ वा. ॲड्. अमृत गांधी कड्याहून परत आले.

आपल्या लाडक्या हसत्या–खेळत्या मिनलची एकदम अचानक अशी न बोलती अवस्था झालेली बघून त्यांना दुःखावेग आवरेना!

काय झालं हे त्यांना सांगितलं तर त्यांच्या तापट स्वभावामुळं आणखीन नस्ता प्रसंग ओढवायचा म्हणून दोघींनीही घडलेलं त्यांना सांगितलं नाही. मिनलच्या आईने नंतर ही हकिगत आपल्या माहेरच्यांना सांगितली होती. त्यांच्याकडून अमृत गांधींना आपल्या मुलीच्या मृत्यूचं खरं कारण समजलं. दि. २९।११।८३ ला त्यांनी तडक नगर गाठलं– डॉ. मुथांकडे गेले. त्यांना जाब विचारला. त्यांनीही बोळा तोंडात घातल्याने मृत्यू आल्याचे कबूल केले. केसपेपरची नक्कल द्यायला मात्र नकार दिला!

अमृत गांधी यांनी नगरशहरस्टेशनला अर्ज नं. १३१३।२३ नुसार तक्रार दाखल केली. त्यानंतर अनेक वेळा पोलीसस्टेशनला जाऊन तपासकामाची विचारणा केली. फक्त 'तपास चालू आहे' या उत्तरानं साहेब त्यांना वाटेला लावत असत. पोलीस प्रकारणाची फारशी गांभीर्यानं दखल घेत नाहीत हे लक्षात आल्यावर दि. ११।१।८४ ला श्री. मोहितेसाहेबांच्या कोर्टात फिर्याद दाखल करण्यात आली.

दि. १।२।८४ ला श्री. मोहितेसाहेबांनी 'प्रोसेस इश्यू'ची ऑर्डर केली. या चौकशीचे काम थांबावे यासाठी डॉक्टरसाहेबांनी आटोकाट प्रयत्न केला. 'पोलीसचौकशी चालू आहे, म्हणून कोर्टचौकशीची आवश्यकता नाही. त्यासाठी कोर्टात चालू असलेल्या चौकशीच्या कामास स्थगिती द्यावी' म्हणून वरच्या कोर्टातून 'स्टे' मिळवला; पण फिर्यादीने वस्तुस्थिती निदर्शनास आणून देताच त्या कोर्टाने तो 'स्टे' लगेच उठवलाही!

निदानाच्या, उपचाराच्या कितीतरी पद्धती, मार्ग असतानाही डॉक्टरनी प्रतिकाराला न जुमानता जे आडदांड वर्तन केले, ज्या बेजबाबदार आणि निष्काळजीपणे सगळी केस हाताळली, त्यांच्या या वर्तनाला जरब बसणार आहे का? लोकांच्या जिवाशी खेळणाऱ्या आणि पैशावर तुटून पडणाऱ्यांना आपल्या 'व्यवसायातली (?)' किमान नीतिमत्ता पाळावी असा कोणाचा तरी वचक हवा आहे. डॉक्टर नागवण्यासाठी मारतातही अशी स्थिती आहे. कायदेशीर सव्यापसव्य करून केसमध्ये अडथळा येण्याचे प्रयत्न होतीलच; पण फिर्यादी स्वतः वकील असल्यानं या सगळ्यांना पुरून उरेल! या मृत्यूची चौकशी होईलही– कोर्टात या प्रकरणाचा निकाल काहीही लागो– अशा केसमुळं अशांना लगाम बसला तर हवाच आहे; पण त्यात छोट्या मिनलचा काय दोष?

कोर्टातल्या न्यायानं ती थोडीच परत मिळणार आहे?

–विनय गुणे

---

# नटसम्राट दत्ता भटांची एक्झिट

१३ नोव्हेंबर १९६० हा दिवस दत्ता भटांच्या आयुष्यात नवे पर्व निर्माण करणारा ठरला. एक नवे वळण देणारा ठरला. या दिवशी त्यांनी केलेल्या 'ऑथेल्लो' नाटकाचा प्रयोग पुण्याच्या भरत नाट्य मंदिरात होता. या प्रयोगात भट होते 'इयागो'! 'ऑथेल्लो' होते बाबुराव सावंत. बाबुरावांचा आवाज त्या दिवशी बसलेला होता. काहीही करून तो आवाज त्यांना साथ देईना. प्रयोगावर त्याचा परिणाम झालाच. हा प्रयोग महाराष्ट्र शासनाच्या राज्यस्पर्धेसाठी लोकहितवादी मंडळाने केलेला होता. स्पर्धेचा निर्णय काय झाला ते आठवत नाही; पण एकच घडले की, दत्ता भट नावाचा कोणी कलाकार जबरदस्त ताकदीने या स्पर्धेत आलेला आहे, याची नोंद नाट्य-जाणकारांनी घेतली. भालबा केळकर, विजय तेंडुलकरांनी *भटांना या प्रयोगात प्रथम* पाहिले आणि अशा मातब्बरांना भटांची नोंद घ्यावीच लागली. ही नाट्यनोंदच पुढे भटांना रंगायन नाट्यसंस्थेत येण्यास आणि पर्यायाने व्यावसायिक रंगभूमीकडे जाण्यास फार मोठ्या प्रमाणात उपयोगी पडली. या प्रयोगाच्या माझ्या आठवणी अगदी क्षीण आहेत. आपण काही तरी वेगळे, मोठ्या ताकदीचे पाहिले एवढेच आठवते; पण या प्रयोगाबद्दल स्वतः भट, भालबा, तेंडुलकर अनेकदा आवर्जून बोलल्याचे आठवते. भटांसंबंधी जेव्हा जेव्हा बोलणे निघते तेव्हा पुणे, नाशिक, मुंबईतील नाट्यवर्तुळातील लोक 'ऑथेल्लो'च्या प्रयोगाचा आणि त्यातही 'इयागोचा' वारंवार उल्लेख करतात. भटांना त्या निमित्ताने गौरवतात!

एखाद्या नटाच्या विशिष्ट भूमिकेचा उल्लेख इतका दीर्घ काळ होत राहणे यातच *त्या कलावंताच्या गुणवत्तेला मनसोक्त दाद* देणे आहे. भटांनी जरी शालेय जीवनापासून आपल्या अभिनयप्रवासाला आरंभ केला असला तरी तो पहिला कालखंड उमेदवारीचा-अडखळणारा प्रवास होता. 'इयागो' पासून *त्यांचा एक नवा अभिनय–कालखंड आरंभित* झाला. त्यांच्या अभिनय–कालखंडाचा पल्ला खूप विस्ताराचा आहे. 'इयागो' ते 'गणपतराव बेलवलकर' इतका मोठा आहे. योगायोगाने ही दोन्ही नाटके मूळची शेक्सपिअरची आणि नंतर शिरवाडकरांचीही!

ऑथेल्लो' तर भटांच्यासाठी भाषांतरित केले असे वाटावे इतके साजेसे झाले. 'नटसम्राट' 'किंग लिअर' वरून तयार केलेले. दोन्हीतही भटांना महत्त्वाची भूमिका लाभली. त्या भूमिकांचे त्यांनी सोने केले. एका अर्थाने शेक्सपिअर आणि शिरवाडकर यांच्या नाटकात भूमिका करून आपले अभिनयाचे अभिजातपण भटांनी सिद्ध केले. मराठी रंगभूमीवर अभिजात गद्य नटांची जी परंपरा आहे त्यामध्ये भटांनी आपली प्रतिमा निर्माण केली ती अशा अनेक भूमिकांच्या बळावरच !

## रंगायनमधले दिवस

भट रंगायन नाट्यसंस्थेत आले तेव्हापासून त्यांचा नाट्यप्रवास मी उत्सुकतेने पाहण्याचा यत्न केला आहे. त्यांना रंगभूमीवर पाहणे हा एक आनंदाचा भाग होता. 'ससा आणि कासव' या शं. गो. साठे यांच्या नाटकातील भट अजूनही डोळ्यांसमोर येतात. त्याहीपेक्षा लक्षात राहतात ते 'मी जिकलो मी हरलो' या तेंडुलकरांच्या नाटकात ! मला आठवते की, भटांच्या वाट्याला आलेली भूमिका ही डॉ. के. ना. वाटवे ( माधव वाटवेंचे वडील आणि शरद तळवलकरांचे सासरे ) यांना डोळ्यासमोर ठेवून बऱ्याच प्रमाणात लिहिलेली होती. भटांनी डॉ. वाटव्यांच्या व्यक्तिमत्त्वातील अनेक बारकावे अभ्यासपूर्ण रीतीने आत्मसात करून आपल्या अभिनयासाठी त्यांचा वापर केलेला होता. विशेषत: त्यांची येरझारा घालण्याची पद्धत, विशिष्ट अशी बोलण्याची पद्धत वगैरे. हा प्रयोग अनेकार्थांनी लक्षात राहणारा ठरला. एक तर रंगायनसंस्थेचा हा प्रयोग. दिग्दर्शिका होत्या विजया मेहता ( तेव्हा विजया खोटे). भटांच्या साथीला अभिनेते होते विजयाबाई, डॉ. श्रीराम लागू, डॉ. वसंतराव देशपांडे इत्यादी. असे बिनीचे कलावंत एकत्र आल्यावर प्रयोगाची रंगत वाढली नसती तरच नवल !

भटांचे आणखी एक रंगमंचीय रूप डोळा साठवून ठेवावे असे होते. ते म्हणजे व्यंकटेश माडगूळकरांच्या 'पति गेले ग काठेवाडी' या नाटकात. यामध्ये भट होते—जोरावरसिंगच्या भूमिकेत. हा जोरावरसिंग होता काठेवाडी जहागिरदार. भटांनी काठेवाडी पगडी, अंगरखा वगैरे घालून ते सोंग तर उत्तम सजवले होतेच; पण त्यांनी या भूमिकेसाठी बोलीभाषेचा जो ढंग पकडला होता तो अवर्णनीय होता! या नाटकात ते प्रथम दिसायचे ते आपल्या दिवाणजीबरोबर काठेवाडी रासनृत्य पाहात असताना. ते त्या दिवाणजीशी असे काही गंमतीने, चमत्कारिक रीतीने बोलायचे की, तो अवाक् व्हायचा. त्यातून घडणारा विनोद मनमुरादपणे प्रेक्षकाला हसवायचा. या भूमिकेत रंगमंचावरचे भटांचे चालणे एका विशिष्ट पध्दतीचे, विशिष्ट लयीतले असायचे आणि त्यातच ते नाट्यविषयातील एका महत्वाच्या गोष्टीचा उल्लेख अर्थपूर्ण रीतीने करायचे. त्यातली त्यांची काही वाक्ये अजूनही आठवतात—'दिवाणजी, तरी पण तुमी लई दौडादौड करू नका !' ते महमूदची याद राखा—लय दौडादौड करू नका, दमछाक होईपर्यंत-काय? ...तरी पण जरा सावकाशीनी काम घ्या, जा ! तो तुरा सुकला पायजे !'...या प्रयोगातही कमलाकर सारंग, अरविंद देशपांडे, ललिता केंकरे, मीना सुखटणकर असा छान नटसंच होता. या नाटकाचा प्रयोग ज्यांनी किमान एकदा जरी पाहिला असेल, त्याला तो विसरताच येणार नाही. ( मी तीन वेळा पाहिलाय. ) त्यातही भटांच्या अभिनयाचे विस्मरण तर सोडाच; पण त्यांच्या स्मृती गोंजारण्यात स्वत:ला धन्य मानावे असा हा प्रयोग! असे आणखी एक त्यांच्या अभिनयाचे चिरंतर स्मरण, म्हणजे 'जेथे जातो तेथे' हे नाटक. हे नाटक म्हणजे भटांच्या जीवनातली 'मर्मबंधातली ठेव' आहे. कारण या नाटकाचे लेखक, दिग्दर्शक आणि प्रमुख भूमिका सारे काही दत्ता भटच होते ! हे नाटक म्हणजे 'हार्वे' या नाटकाचे मराठी रूपांतर होते. यातील मध्यवर्ती भूमिका होती आनंद सुखात्मे या नावाची. वयाच्या बेचाळिसाव्या वर्षी भटांनी ही नायकाची भूमिका करून अनेकांना चकित केले! हा सुखात्मे स्वत:ला आनंद झाला की, खिशातून लिंबू-सरबताची बाटली काढून त्यातले थोडे सरबत इतरांना देत असे. ( मुळातल्या नाटकात तो नायक व्हिस्की देत असे. ) नायकाच्या कोटाच्या खिशात ससा आहे आणि तो केव्हाही बाहेर येईल असे वाटायचे. निरागस, निखळ आनंद देणारी अशी ही आनंद सुखात्मेची भूमिका भटांच्या अभिनयातील एक मोरपीस होते ! मोरपिसाच्या सुखद स्पर्श—दर्शनाइतकी त्यांची ही भूमिका पुन:पुन्हा पहावीशी वाटे. दुर्दैवाने या नाटकाचे प्रयोग फार झाले नाहीत; पण भट नेहमी खाजगीत सांगत असत की, या नाटकाचे जे काही प्रयोग झाले त्यातल्या अनेक प्रयोगांना तेंडुलकर आवर्जून तिकीट काढून येत. येताना नवनवीन मित्रांना घेऊन येत. संहिता तयार झाल्यापासून प्रयोगापर्यंत पु. लंनी या नाटकाचा प्रवास पाहिला होता. कारण त्या वेळी भट पु. लं.कडे 'वाऱ्यावरची वरात' मध्ये काम करीत होते. पु. लं.नी 'जेथे जातो तेथे' हे मन:पूर्वक आवडल्याची दाद भटांना तेव्हाच दिलेली होती !

## नटसम्राट गणपतराव !

भटांना सार्वत्रिक दाद मिळाली ती नटसम्राटमधल्या गणपतराव बेलवकर या भूमीकेला: तब्येतीमुळे डॉ लागूंनी काही काळ नटसम्राट नाटकच नव्हे तर एकूण रंगभूमिचीच निवृत्ति स्वीकारली होती. नटसम्राट नाटक तर चालणे आवश्यक होते. गोवा हिंदूंच्या लोकांनी योग्य निर्णय घेऊन भटांची निवड केली. भटांनी आपला सारा जीव नेहमीप्रमाणेच या भूमिकेत पणाला लावला. त्यांना अपूर्व यश लाभले. डॉ. लागू यांनी गणपतराव केल्यानंतर तितक्याच ताकदीने उभे राहणे महत्त्वाचे होते. भट केवळ उभे राहिले नाहीत तर त्यांनी त्या भूमिकेवर आपल्या कलाप्रतिभेची मुद्रा स्थापित केली ! आतापावेतो पाच नटांनी या भूमिकेचे आव्हान स्वीकारून आपापल्या ताकदीनुसार ती भूमिका अभिव्यक्त करण्याचा यत्न केला; पण भटांचे वैशिष्ट्य हे त्यांचे म्हणूनच राहिले. त्यांच्या आवाजाला कमालीची फिरत आहे. खर्जापासून टिपेपर्यंत त्यांचा आवाज लागू शकत असे. तिन्ही सप्तकांत तो आवाज सहज लीलया फिरत असे. आवाजाचे चिरकणे नाही, फाटणे नाही किंवा कणसूर होणे नाही, याचा प्रत्यय नटसम्राटमधील स्वगतांच्या वेळी दरक्षणी येत असे. विशेषत: दुसऱ्या अंकानंतर (कावेरी गेल्यावर) जेव्हा ते उद्ध्वस्त होऊन रंगमंचावर प्रवेशायचे

पृष्ठ ३२ वर

# मुंबई महापालिकेचा अस्त !

विष्णू जयदेव

अठराशे अठ्ठ्याऐंशीच्या मुंबई महानगरपालिकेचा कायदा, कायदेमंडळात चर्चिला जात असताना फिरोजशहा मेहेता म्हणाले होते, " The real test of a representative Government of a city is the full control of the purse. "

या शहराचे शासन सर्वथैव कॉर्पोरेशनच्या सत्तेखाली आहे व कॉर्पोरेशन ही सार्वभौम संस्था आहे हे कलम ज्या दिवशी कायदेमंडळात मंजूर झाले, त्या दिवशी फिरोजशहांना मोठी धन्यता वाटली. ते म्हणाले, " This is the last word on the local self Government. "

आणि आज १११ वर्षांनंतर प्रथमच या स्थानिक स्वराज्य संस्थेची परंपरा महाराष्ट्र सरकारने खंडित केली. अठराशे अठ्ठ्याऐंशीच्या या महापालिका कायद्यात बदल घडवून आणून पालिका बरखास्त केली.

गेल्या शनिवारी पालिकेची शेवटची बैठक झाली. तिला एकशेचाळीसपैकी जेमतेम पन्नास सदस्य हजर राहिले. सरकारने केलेल्या ह्या ' काळ्या कायद्या ' विरुद्ध कसा लढा देता येईल याचा विचार करण्यासाठी महापौर मनमोहनसिंग बेदींनी शनिवारी दुपारी मुंबापुरीतील प्रमुख नागरिकांची एक सभा बोलावली होती. एकूण दोनशेपन्नास निमंत्रणे पाठवली होती; पण केवळ पंचवीस ते तीस लोक हजर राहिले. त्यापैकी निम्म्याहून अधिक राजकीय पक्षाचे पुढारी आणि उरलेले सारे नगरसेवक.

सभा संपल्यावर वीस-पंचवीस नगरसेवकांसमवेत बेदी महापालिकेसमोर असलेल्या फिरोजशहा मेहेतांच्या पुतळ्याशी गेले. दहा मिनिटांनी फोटोग्राफर्स आल्यानंतर हात उंचावून साऱ्या नगरसेवकांनी शपथ घेतली की, ह्या नगरपालिकेच्या लोकशाही परंपरेचे पुनरुज्जीवन होईपर्यंत ते त्यांचा लढा चालूच ठेवतील. ' क्लिक्–क्लिक्. '

आता बेदी समांतर नगरपालिका चालविण्याच्या विचारात आहेत. कायद्याने जे स्वातंत्र्य दिले तेही ह्या नगरसेवकांना नीट उपभोगता आले नाही. प्रत्येक सभेवर दहा-दहा हजार रुपये खर्चूनही या नगरपित्यांनी शहराच्या प्रश्नांवर चर्चा केली नाही. पुरोगामी लोकशाही दलाचा बहुतांशी वेळ घटक पक्षांवर कुरघोडी करण्यात गेला आणि आता त्यांना समांतर पालिकेचा साक्षात्कार झाला आहे.

ह्या लढ्याला मुंबापुरीतील जनतेने कमीत कमी पाठिंबा दिला ह्याचे कारण नगरसेवक त्यांची सहानुभूती मिळविण्यात अपयशी ठरले. अखेर हे युद्ध पुलोदचे नगरसेवक आणि राज्यसरकार यांच्यातीलच ठरले. जनतेचा सहभाग फारच कमी.

तरीही झाले ते वाईट झाले. दुःख म्हातारी मेल्याचे नाही, काळ सोकावतो त्याचे आहे. पुलोदची राजवट जर भ्रष्टाचारी होती तर राज्यसरकारला नव्याने निवडणुका घेता आल्या असत्या; पण ह्या निवडणुकांत कॉंग्रेस आय जिंकण्याची सुतराम शक्यता नव्हती.

ही नगरपालिका ताब्यात घेण्यामागे राज्यसरकारचा हेतू तिचा कारभार सुधारणे हा निश्चितच नाही. ज्या नगरविकासखात्याच्या आधिपत्याखाली आता ही महापालिका येईल त्या खात्यावरच भ्रष्टाचाराचे इतके आरोप आहेत की, ह्या खात्याचे राज्यमंत्री चंद्रकांत त्रिपाठी आता ही 'सोन्याचे अंडे देणारी कोंबडी ' मारूनच खातील की काय, अशी शंका निर्माण झाली आहे.

महापालिका बरखास्तीच्या या अफवा (कॉंग्रेस आयच्या राज्यात दुर्दैवाने सगळ्या अफवा खऱ्या ठरतात.) गेल्या नागपूर अधिवेशनापासून सुरू झाल्या. याच अधिवेशनात उपमुख्यमंत्री रामराव आदिकांनी असे अभिवचन दिले की, कोणत्याही परिस्थितीत एकतीस मार्चपूर्वी महापालिकेच्या निवडणुका घेण्यात येतील. पालिका – प्रशासनानेही निवडणुकांची जोरदार तयारी सुरू केली होती. आयुक्त सुखथनकरांनी तर निवडणुकांचा तात्पुरता आराखडाही जाहीर केला होता. त्यानुसार निवडणुका अठ्ठावीस फेब्रुवारीला घेतल्या जाणार होत्या. मतदारांची यादीही पूर्ण होत आली होती.

नगरसेवकांची संख्या एकशे चाळीसवरून एकशे सत्तरवर नेण्यात आल्याने नवीन जागांमधून आरक्षित वॉर्डस् जाहीर व्हावयाचे होते. सरकारने हे पाच आरक्षित वॉर्डस् जाहीर केले की दोन दिवसांत निवडणुकांची निश्चित तारीख जाहीर करण्याची सुखथनकरांची तयारी होती. सर्वसाधारणत: निवडणुकांची तारीख जाहीर झाल्यानंतर प्रत्यक्ष निवडणुका घेण्यास पंचावन्न दिवसांचा अवधी लागतो; पण सरकारने नागपूर अधिवेशनानंतर अध्यादेश काढून कालावधी पस्तीस दिवसांपर्यंत कमी केला.

निवडणुका होतील की नाही या संभ्रमात मार्च महिना उजाडला. अजूनही सरकारने आरक्षित जागा जाहीर न केल्याने एकतीस मार्चपूर्वी निवडणुका घेणे अशक्यच दिसत होते. बारा मार्चला मुंबईचे अधिवेशन सुरू होईपर्यंत सरकारचा उद्देश महापालिका बरखास्त करण्याचा आहे. याची कोणाला कल्पनाही नव्हती. आठ–एक महिने मुदतवाढ देऊन नोव्हेंबरपर्यंत निवडणुका घेतल्या जातील अशी अपेक्षा होती.

## बरखास्ती का ?

परंतु प्रत्यक्षात सरकारने बरखास्तीचे विधेयक मांडले. विधानसभेतही विरोधकांना हे विधेयक केवळ दीड तास आधी मिळाले. विधानसभा आणि विधानपरिषद यांतील संख्याबळावर कॉंग्रेस आय् हे विधेयक मंजूर करून घेईल यात शंका नव्हती, केवळ सभागृहात आणि सभागृहाबाहेर विरोधी पक्ष त्याला कितपत विरोध करतात हेच काय ते पाहायचे होते.

पहिल्याच दिवशी हे विधेयक मांडले गेले तेव्हा महापालिकेची सभा तहकूब करून नगरसेवक मोर्चा घेऊन विधानसभेवर गेले. महापौर बेदी तेव्हा मॉस्कोच्या दौऱ्यावर होते. एकशेचाळीसपैकी या मोर्चात केवळ साठ ते सत्तर नगरसेवक सामील झाले. बऱ्याच झटापटीनंतर ह्या नगरपित्यांना

आदिक मंत्रालयात भेटले. नगरसेवकांचे म्हणणे आपण मुख्यमंत्र्यांच्या कानावर घालू असे आश्वासन त्यांनी दिले; 'पण हा शेवटी कॅबिनेटचा निर्णय आहे. माझा एकटयाचा नाही. त्यामुळे कॅबिनेटनेच ह्या निर्णयाचा फेरविचार करावयाचा आहे' असे त्यांनी स्पष्ट केले. (या सरकारात दादा आणि आदिक सोडले तर कॅबिनेटमधील इतर मंत्र्यांना स्वत:चे मत असते ह्याची आम्हाला पुसटशीही कल्पना नव्हती.) पण आदिकांचे हे आश्वासन केवळ विरोधाची धार बोथट करण्यापुरतेच होते.

विधानसभेत संमत होऊन हे बिल विधान परिषदेत आले. त्या वेळी विरोधी पक्षांनी पाच हजार लोकांचा 'प्रचंड मोर्चा' विधानभवनावर नेला. हा मोर्चा चर्चगेटजवळ अडविल्यावर सर्व विरोधी पक्षांचे एक शिष्टमंडळ वसंतदादांना जाऊन भेटले. त्यांचे म्हणणे शांतपणे ऐकून घेतल्यावर दादा म्हणाले,

'आता फार उशीर झाला आहे. आता बिल मागे घेता येणार नाही. तुम्हाला त्याचे महत्त्व वाटते; पण जगाला वाटत नाही!'

'दादा, तुम्ही हे बिल मागे घेतले तर तुमचे नाव इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले जाईल!' बेदी म्हणाले.

'आता नाही आमच्या नशिबात सुवर्णाक्षर त्याला काय करणार? एखाद्याच्या नशिबात असते काळे अक्षर!' हे दादांचे उत्तर.

शेवटी भाजपच्या हशू अडवानींनी दादांना विनंती केली की, केवळ एक छोटीशीच अॅमेंड्मेंट करा आणि महापालिकेची वाढविलेली मुदत सहा वर्षांऐवजी सात वर्षांची करा; पण दादा ऐकायला तयार नव्हते.

'आम्हाला जे करायचे ते आम्ही केले. आता तुम्ही काय वाटेल ते करा!' ते म्हणाले.

इतके झाल्यावरही विरोधी पक्षांचे रक्त थंड. शिष्टमंडळ मोर्चाकडे परत गेल्यावर बेदी लोकांना म्हणाले. 'आप जो ये शानदार मोर्चा लेकर आये है इसलिए हम आपके आभारी हैं। कल सुबह नौ बजे हम फिर मोर्चा लेकर राजभवन जाएंगे।' एवढे झाल्यावर मोर्चा पांगला. दादांना जेवढी भीती आदिक, भोसले आणि अंतुल्यांची वाटते तेवढी विरोधी पक्षांची वाटत नाही.

अखेर बिल मंजूर झाले. आता त्याचा कायदाही झाला आहे. महानगरपालिका कायद्यात बदल करण्यासाठी सरकारने जी कारणे दिली आहेत त्यावर शाळकरी पोरांचाही विश्वास बसणे कठीण आहे. या बरखास्तीपाठची खरी कारणे वेगळी आहेत.त्या पैकी महत्त्वाचे म्हणजे महापालिकेच्या ताब्यात असलेला नगरविकासाचा आराखडा. या आराखड्याने बिल्डरलोकांची मोठी पंचाईत करून ठेवली होती. या आराखड्यातून कोणताही भूभाग आरक्षणातून वगळायचा किंवा आरक्षणाचे स्वरूप बदलायचे तर त्यासाठी नगरसमिती, सुधार समिती, आणि कॉर्पोरेशन यांच्यापुढे प्रस्ताव मांडावा लागत असे. शिवाय हे प्रस्ताव या समित्यांच्या कार्यक्रमपत्रिकांवर येत असल्याने वृत्तपत्रांच्या प्रतिनिधींनाही ते पाहण्याची संधी मिळत असे; पण याचा अर्थ भ्रष्टाचाराला वावच नव्हता असे नाही. केवळ पुलोदमधील घटक पक्षांच्या संगनमताखेरीज कोणताही प्रस्ताव पास करणे कठीण होते एवढेच.

विकास आराखड्यात बदल करण्यासाठी नगर विकास खात्याला MRTP ACT 1966 च्या सेक्शन 37 (C), खाली खास अधिकार दिलेला आहे. ह्याच एका कलमान्वये नगरविकासखात्याचे मंत्री महापालिकेला विकास आराखड्यात बदल करण्यासाठी आदेश देऊ शकतात. पूर्वी असे आदेश क्वचितच दिले जात; परंतु चंद्रकांत त्रिपाठी नगरविकासखात्याचे राज्यमंत्री असल्यापासून, म्हणजे अंतुल्यांच्या काळापासून सरकारने आतापर्यंत एकूण पंचावन्नपेक्षाही जास्त आदेश महापालिकेकडे पाठविले आहेत.

मुंबापुरीतील बऱ्याचशा अनधिकृत बांधकामांबाबत त्रिपाठींचे नाव घेतले जाते. अंधेरी येथील खान इंडस्ट्रिअल इस्टेट आणि मीठीनदीवरील प्रचंड प्रमाणावरील अनधिकृत गाळे जेव्हा महापालिकेच्या उपयुक्ता कुंदा कदम ह्यांनी तोडले तेव्हा त्रिपाठींनी ही कारवाई थांबविण्याचे आटोकाट प्रयत्न केले. वेळोवेळी महापालिकेच्या सभांत मांडलेल्या तहकुबींवर बोलताना पुलोदच्या सभासदांनी त्रिपाठींवर टीकास्त्र सोडले आहे.

पुलोद सदस्य आणि त्रिपाठी यांचे हे प्रेमप्रकरण गेली चार वर्षे रंगते आहे. ह्या पुलोदच्या सदस्यांना धडा शिकवणे, सुखथनकरांनी अनधिकृत बांधकामांविरुद्ध उघडलेल्या मोहिमेला आळा घालणे आणि बिल्डर्स लोकांनी विकास आराखड्यात बदल करण्यासाठी आणलेला दबाव, ह्या कारणासाठीच काँग्रेस आयने महापालिका बरखास्त करायचे ठरविले.

या पालिकेचे दोनशेपन्नास कोटींचे वार्षिक अंदाजपत्रक आता नगरविकासखात्याकडे जाईल. आणि भातसई पाणीपुरवठायोजनेवरील खर्च लक्षात घेतला तर हे अंदाजपत्रक पाचशे कोटींच्याही वर जाते. कोटयवधी रुपयांची कंत्राटे जी पूर्वी महापालिकेची स्थायी समिती देत असे, ती आता नगरविकासखात्याकडून दिली जातील. आणि त्याच खात्याचे त्रिपाठी राज्यमंत्री आहेत.

बरखास्तीचे विधेयक संमत होण्यापूर्वी नगरसेवक रामराव आदिकांना भेटले. तेव्हा जुने महापौर बोमन बेहेराम आदिकांना म्हणाले ही महापालिका बरखास्त झाली तर मुंबईची जनता ते कदापि सहन करून घेणार नाही; पण मुंबईकरांनी ते सहन केले. याचे कारण एक बोमन बेहेरामसारखे चार-दोन नगरसेवक सोडले तर बाकी नगरपित्यांना आपली चराऊ कुरणे हिरावून घेतल्याचे दु:ख झाले होते. एकशेअकरा वर्षांची परंपरा असलेली देशातील सर्वांत मोठी स्थानिक स्वराज्य संस्था आज लयाला जात आहे याचा खेद फारच थोडयांना झाला.

आणि म्हणूनच वयाची सत्तरी ओलांडलेले बोमन बेहेराम भर दुपारच्या उन्हात पाय ओढत विधानभवनावर मोर्चा घेऊन गेले तेव्हा आम्हाला भारी वाईट वाटले. त्याच दिवशी महापालिकेची सभा संपल्यानंतर पत्रकारांशी बोलताना बोमन बेहेराम म्हणाले, 'I never thought I would see this day. I was telling these fools to behave themselves.'

जर्मन तत्त्वज्ञ नित्सेच्या Thus spake Zaratushtra ह्या पुस्तकाच्या सुरुवातीस या पुस्तकाचा नायक झरतुष्ट्र भल्या पहाटे बाजाराच्या ठिकाणी येतो आणि ओरडून जाहीर करतो–Gold is dead. The God is dead. we have killed him.' आजुबाजूचे लोक खिडक्या उघडून पहातात तेव्हा त्यांना वाटते की, एवढ्या भल्या पहाटे असे ओरडणारा हा माणूस एक तर वेडा असला पाहिजे किंवा लफंगा तरी असला पाहिजे! □

# इचलकरंजी ते हैद्राबाद

जानेवारी ८४ मध्ये 'मिरज–इचलकरंजी' लेखमालेतील चार लेख प्रसिद्ध झाले होते. विषय सुरू झाला मिरजेतील अरबांपासून आणि मिरज – सांगली – इचलकरंजी भागातील हिंदु-एकताच्या कामाचा आढावा घेऊन त्याचा शेवट झाला.

या अरब प्रश्नाचे मूळ–हैद्राबाद. हैद्राबादला जाण्यापूर्वी इचलकरंजी भागातील काही घटनांची व घडामोडींची लेखकाने केलेली ही नोंद.

**सुभाष काळे**

दिस इज हैद्राबाद–नामपल्ली स्टेशन. यह हैद्राबाद का नामपल्ली स्टेशन है. आपका स्वागत. इंग्रजी, हिंदी, तेलगूतून सारख्याच टोनिंगमध्ये बोलणाऱ्या अनौन्सरच्या आवाजाने जाग आली. खिडकीबाहेर पाहिले– चांगले उजाडले होते.

प्रवाशांच्या घोळक्यातून कसाबसा स्टेशनबाहेर आलो.

बोलो साब, सायकल-रिक्शासे चलोगे?

एक सायकल-रिक्शा समोरून भरकन्, वळसा मारून माझ्या डाव्या बाजूला येऊन उभी राहिली.

'मारवाडी सॅनिटोरियम जाना है. कितना रुपिया लोगे?'

माझा त्याच्याकडे बघत प्रश्न.

'जादा नही साब, खाली एक रुपिया दे दो!'

झटक्यात त्याचे उत्तर.

'बस! एकही रुपिया?'

आश्चर्य वाटले म्हणून परत प्रश्न केला. मनात म्हटले हा बनवत तर नाही ना आपल्याला? कारण तसे अंतर काही जवळ नव्हते. जवळजवळ दीड–दोन किलोमीटरचा रस्ता पार करायचा. अवघ्या रुपयात हा कसा काय तयार झाला? पण म्हटले बघू या तरी. फारच गयावया केले तर अजून एक रुपया त्याच्या हातावर टिकवून दोन रुपयात दीड–दोन किलोमीटरचा प्रवास निश्चितच जादा नव्हता.

कोई बात नही. अच्छा चलो!

माझे तोंडातून होकार बाहेर पडतो न पडतो तोच त्याने रिक्शात सामान भरलेदेखील. हैद्राबादच्या सायकलरिक्शात बसले की मेहमुदच्या 'कुवाँरा बाप'ची आठवण होते. बाकी काही म्हणा, सायकलरिक्शात बसायला प्रशस्त वाटत नाही. आपण सारे आरामात बसलेलो असतो आणि रिक्शावाला धापा टाकीत एकेक पायडेल जोर देऊन मारीत असतो. त्याची ही उरफोड अस्वस्थ करते.

गप्पांच्या ओघात मी त्याच्यापुढे मनातली अस्वस्थता मांडली. त्यावर तो म्हणाला, 'देखो साब-आप गरिबी जानते है. जब तक आप यहाँ हो तबतक सायकलरिक्शाही पसंद करो. मेरे जैसे दूसरे रिक्शावालोंको कमसे कम दो वक्त का खाना तो मिलेगा!'

'दिनभर कितना पैसा मिलता है?' मध्येच मी त्याला प्रश्न केला.

'साब, रिक्शा चलानेवाला कोई भी आदमी अबतक अमीर बना नही और बननेवाला भी नही! साब, यह कोई कमाई काम है? इसपर इतनी तकलीफ होती है कि कभी कभी मुंह मे खून निकलता है! साब, अगर हमने जिंदगीभर रिक्शा चलाने का सोचा तो हम पचास सालसे आगे जिंदा नही रह सकते है. हम सबेरे पाँच बजेसे रातको ग्यारह बजेतक रिक्शा चलाते है और कमाते कितना? ज्यादा से जादा बीस रुपियाँ, पाँच रुपया रिक्शा मालकको, खाली हातमे रहते पंधरा. उसमे पाँच शराब मे जाते है. रोज का टूटफूट है–वो जाकर खाली पाँच रुपया बचता है. उसमे हम क्या खाना और घर मे क्या देना?'

'क्या तुम शराब भी पीते हो?' माझा मध्येच सवाल.

अनवधानाने कबुली दिल्यामुळे चेहऱ्यावर खंत दर्शवीत क्या करना, साब पिनी पडती है. हम लोग पूरा दिन इतनी मेहनत उठाते है तो उससे रात को खाना भी नही जाता और निंद भी नही आती. तो उसके लिये शराब ले लेते है. बुरा है साब. हम आदतसे मजबूर बन गये है. क्या करना?'

रिक्शावाला असावा चाळीस-पंचेचाळिशीतला. त्याचे शरीर म्हणजे नुसता हाडांचा सापळा. त्याकडे बघून हा माणूस साठ-सत्तरीच्या पुढे जगत नसावा हे सहज पटते. मारवाडी सॅनिटेरियममध्ये जागा नव्हती. महाराष्ट्र मंडळात लगेच मिळेल याची खात्री नव्हती. म्हणून त्याला त्याच्या माहितीतल्या ठिकाणी रिक्शा घ्यायला सांगितले मग त्याने ट्रुपबझार भागातल्या बालाजी लॉजवर मला नेले. कौंटरवरल्या माणसाशी तेलगूतून काही तरी बोलून जागा मिळवून दिली. खोलीत सामान नेऊन लावले आणि मगच पैशासाठी समोर येऊन उभा राहिला. त्याची प्रतिक्रिया काय होते हे अजमावण्यासाठी प्रथम मी त्याच्या हातावर एक रुपयाची नोट ठेवली. म्हटले, हा आता म्हणेल, 'साब! जादा दो, कम से कम पचास पैसा तो दो.' पण एकही शब्द न बोलता त्याने रुपयाची नोट कनवटीला लावली आणि सलाम करून जायला निघाला. तेव्हा परत बोलावून घेऊन आणखीन एक रुपया त्याच्या हातावर ठेवला!

येथले सायकल-रिक्शावाले खरोखरच अतिशय गरीब आहेत; पण लाचारीचे प्रदर्शन नाही की अनावश्यक घासाघीस नाही. भाडे ठरवितामा इतके योग्य ते पैसे सांगतात की, त्यात आपण कमी-जास्त करावे असे वाटतच नाही. उद्धटपणा नावाला नाही. या गरीब रिक्शावाल्यांना स्पर्धा करावी लागते ऑटोवाल्यांशी. ऑटो चालविणाऱ्यांना चालवायचा त्रास कमी आणि शिवाय जितके अंतर गिऱ्हाईक जास्त जाईल तितकी मिळकत जादा. त्यामुळे त्यांच्या वागण्यात साहजिकच अरेरावी असते. त्यांच्यां तुलनेने सायकल-रिक्शावाल्यांची मात्र फार दैना आहे. रस्ते खराब, चढ-उताराचे, त्यामुळे रक्त ओकावे न लागले तरच नवल! अवघ्या दोन रुपयांत दीड-दोन किलोमीटर नेल्यानंतर या रिक्शावाल्याने मला सांगितले काय तर 'साहेब, तुम्ही हैद्राबादेत असेतो सायकल-रिक्शाच पसंत करा. त्यामुळे माझ्यासारख्या गरीबाच्या तोंडात दोन घास जास्त पडतील!' बस एवढीच इच्छा! निजामी, राजवट अस्ताला गेली. स्वातंत्र्यानंतर मराठवाडा विभागाचा समावेश असलेल्या हैद्राबाद स्टेटचीही राजवट संपली. त्यांच्यानंतर गोर-गरिबांच्या नावाने उच्चार करीत आलेल्या म. गांधींच्या काँग्रेसने. पस्तीस वर्षे राज्य केले. तेही सत्तेवरून गेले! आता तेलगुदेसम सत्तेवर येऊन पंघरा महिने लोटले तरी अद्याप तेलंगणाचा हा रिक्शावाला दोन वेळेच्या रोटीला महाग आहे! जेमतेम दोन वेळच्या अन्नासाठी अति मेहनत करून स्वत:च्या शरिराचे वाटोळे करून घेणारा रिक्शावाला सुधारणार तरी कधी? हाच एक प्रश्न तो रिक्शावाला निघून गेला तरी माझ्या मनात रेंगाळत होता.

या वर्षाच्या सुरुवातीला १७ जानेवारी ८४ ते २८ जानेवारी ८४ या काळात मी 'साप्ताहिक माणूस'मधून मिरज-इचलकरंजी-लेखमाला लिहिली त्यात मिरजेतील अरबांच्या वास्तव्यावर प्रकाश टाकला होता. लेखमाला चांगलीच गाजली. अनेकांनी भेटून, तर कित्येकांनी पत्र लिहून लेखमालेचे कौतुक केले. त्यातले एक पत्र होते, श्री. कमलाकर पाटील यांचे. हैद्राबादच्या शालीबंदाभागातून आलेले—

दि. ३।२।८४

श्री संपादक सा. माणूस,

जानेवारी ८४च्या 'माणूस' मध्ये आपण मिरज-सांगली येथील अरबांच्या विरुद्ध श्री. सुभाष काळे यांनी जी माहिती क्रमश: एक-दोन, तीन व चार दिली आहे ती फार प्रशंसनीय आहे. हैद्राबादच्या मुस्लिम बांधवांना देखील हे लेख फार आवडले. त्यांचे म्हणणे आहे की, हे लेख हिंदीमध्ये असते तर अजून खूप जणांनी वाचले असते. मी बहुतेकांना श्री. काळे यांनी काय लिहिले आहे ते हिंदीत सांगितले.

श्री. सुभाष काळे व आपले माझ्यातर्फे हार्दिक अभिनंदन. अरबांविरुद्धची अशी मोहीम जर पूर्ण भारतात निर्माण झाली तर येथील स्त्रियांच्या हालअपेष्टा होणार नाहीत व अरबलोक येथे मजा मारण्यासाठी बिलकूल येणार नाहीत.

आपला वाचक
कमलाकर पाटील
द्वारा : शंकर वाचनालय
शहअलीबंदा
घ. नं. २०।६।३६८।२
हैद्राबाद ५००२६५

वाचकांकडून आलेले प्रशंसेचे पत्र लेखकांना 'टॉनिक'सारखे असते, हे जरी खरे असले तरी हे पत्र ज्या भागातून आले होते त्या दृष्टीने ते महत्त्वाचे होते. मिरजेसारखेच ठाण अरबांनी हैद्राबादमध्ये देखील मांडले आहे. पत्रलेखक कमलाकर पाटलांचे वास्तव्य ज्या शालीबंदा भागात आहे, त्याच्या भोवतालचा परिसर अरबांनी व्यापलेला आहे. माझी अरबांची लेखमाला ज्या प्रकरणापासून सुरू झाली व मुलगी पळविली म्हणून हैद्राबाद पोलीस-स्टेशनकडे ज्याने प्रथम खैरुन्निसाच्या विरुद्ध तक्रार नोंदविली तो खैरातअल्ली – हा शालीबंद्याला लागूनच असलेल्या मोगलपुऱ्यातच राहतो. शालीबंदा आणि मोगलपुऱ्याला लागून 'बारकस' नावाचे छोटेसे खेडे होते. या परिसरात बहुसंख्य मुस्लिमलोक राहतात. 'बारकस' पेरूसाठी फार प्रसिद्ध होते. पेरू विकणारी ही मुस्लिम मंडळी आपल्या छोट्या-छोट्या झोपड्यांतून राहत असत. आज या बारकसचा चेहरामोहराच अरबांनी बदलून टाकला आहे. पंधरा-वीस वर्षांपूर्वीचे हे दरिद्री खेडे आज हैद्राबादचे एक अलिशान उपनगर बनले आहे. याचा अर्थ झोपडीवाले सुधारले असा मात्र नाही. झोपडीवाले होते त्याच परिस्थितीत जगत आहेत. किबहुना पूर्वीपेक्षाही त्यांची स्थिती खराब झालेली आहे. स्वत:च्या मुलींना अरबी राक्षसांच्या हवाली करून ते लाचारपणे जगत आहेत. सुधारले आहेत ते मुली विकणारे एजंट, लॉजवाले, डॉक्टर्स, पोलीस आणि इतर या व्यवहाराशी संबंधित असलेली मंडळी व बारकस, शालीबंदा, मोगलपुरा-हे विभाग; पण ज्यांना प्रत्यक्ष झळ बसली आहे, अशी मुस्लिममंडळी लेखाचे कौतुक करीत होती. लेख हिंदीतून असता तर अनेकांनी वाचला असता असे ते सुचवीत होते, हे अत्यंत महत्त्वाचे होते. एक प्रकारे ते लेखाचे यशच होते असे म्हणायला हरकत नाही.

¤

मिरजेवरील चार लेखांनंतर समारोपादाखल पाचवा लेख लिहावा असे सा. 'माणूस'चे संपादक श्री. ग. माजगावकर यांनी सुचविले होते. माझ्याही मनात ते होते; पण लगेचच लिहिण्यात स्वारस्य नव्हते. महिना-दीड महिना थांबून, लोकांच्या प्रतिक्रिया अजमावून लेख लिहिणे योग्य ठरणार होते. लोकांच्या प्रतिक्रियांखेरीज मिरज भागातील पोलीस, डॉक्टर्स, लॉजवाले, रिक्षावाले, तब्बक यांच्याही प्रतिक्रिया समजावून घ्यायच्या होत्या. हिंदुएकता, शिवसेना आणि अन्य संघटनांनी नंतर काही ठोस पावले टाकली का? शासकीय पातळीवर काही हालचाली सुरू झाल्या का, याचा मला शोध घ्यायचा होता. सर्वांच्या प्रतिक्रिया मला नोंदवून घ्यायच्या होत्या; पण त्यासाठी किमान महिनाभर तरी थांबण्याची आवश्यकता होती. त्यानुसार मी थांबलो होतो. दरम्यान दिनांक १० फेब्रुवारी ८४ ला माझ्या वडलांचे निधन झाले. त्यामुळे हा मधला काळ अधिक लांबला. श्री. कमलाकर पाटलांच्या (वरील) पत्राने गती मिळाली. पत्र हातात घेऊन मी लगेचच बॅग भरली व मुंबई-हैद्राबाद गाडीने हैद्राबाद गाठले!

¤

हैद्राबाद वार्तापत्रे सुरू करण्यापूर्वी आपण, अरब लेखमालेवरील स्थानिक मुस्लिमांच्या प्रतिक्रिया, शासकीय पातळीवरील घडामोडी, सरसंघचालक श्री. देवरस यांचे भाषण, हिंदुएकता आंदोलन, मिरज, सांगली, कोल्हापूर, सातारा, कऱ्हाड आणि इचलकरंजी–बंदचे महाभारत या घडामोडींकडे जरा वळून पाहू या.

मिरजेत मी पाऊल ठेवले तेव्हा नोव्हेंबरचा महिना होता शालिनीताईंच्या लोकसभा पोटनिवडणुकीची धामधूम चाललेली होती. सीझन नसल्यामुळे अरबांची संख्या तुरळक होती. अरबांची संख्या कमी होण्याला दुसरेही एक कारण होते, ते म्हणजे १९८३ च्या ऑगस्टमध्ये हिंदुएकतेने 'अरब हटाओ' मोहीम हाती घेतली होती. त्याचा थोडाफार परिणाम अरबांच्या आगमनावर झाला होता. वातावरण इतके निराशाजनक होते की, आपले अरबांवरील लिखाण म्हणजे शिळ्या कढीला ऊत आणण्याचा प्रकार तर ठरणार नाही ना, अशी धास्ती मनात सारखी डोकावत होती; पण 'शारदा हुल्लगबाळे' प्रकरणाने वातावरण एकदम बदलले. हिंदु एकतेने रणशिंग फुंकले तर शिवसेनेने शहरातले अरबी बोर्ड हटविण्याची घोषणा केली. त्यामुळे अरबविरोधी वातावरण तापत गेले. अशा तप्त वातावरणात लेखमालेचा प्रारंभ झाल्याने साहजिकच वाचकांच्या 'सा. माणूस'वर अक्षरशः उड्या पडल्या. मागणी न पुरवता येण्याइतका ताण माणूसच्या वितरणव्यवस्थेवर पडला ! कोल्हापूर, सातारा, सांगली, मिरज, कऱ्हाड, इचलकरंजी या भागातील एजंटांनी नेहमीपेक्षा चौपट प्रती मागवूनदेखील स्टॉलवाल्यांना अंक कमी पडले. हिंदु एकतेच्या कार्यकर्त्यांनी जादा अंक मागवून घेतले होते ते वेगळेच !

अंक ज्यांनी वाचला त्यात पोलीस, डॉक्टर्स, वकील, शिक्षक, प्राध्यापक, क्लार्कसारखी मध्यमवर्गीय मंडळी तर होतीच होती; पण रिक्शावाले, भाजीवाले, हातगाडीवाले, हमाल, लॉजवर काम करणारे नोकर, इतकेच काय अनेक तब्बकांनी देखील लेखाची ओळ न ओळ वाचून काढली. लेखमाला ज्यांनी वाचली आणि ज्यांना विशेष आवडली असा वर्ग म्हणजे मुस्लिमवर्ग. विशेषत: मुस्लिम स्त्रिया ! लेखमालेनंतर ज्या वेळी मी परत मिरज भागात गेलो तेव्हा मला अनेक मुस्लिम बांधव व मुस्लिम भगिनी भेटल्या. त्यांनी लेखांवर धीटपणाने माझ्याशी चर्चा केली, त्यावर अभिप्राय दिले. असाच एक अनुभव येथे देण्यासारखा आहे.

लेखमालेनंतर मी सिटीबसने सांगलीहून मिरजेला जायला निघालो होतो. वाटेत वालचंद कॉलेज स्टॉपवर एक मुस्लिम तरुणी माझ्या शेजारच्या सीटवर येऊन बसली. माझ्या हातात लेखमालेचे काही अंक होते. शेजारी येऊन बसल्यानंतर एक-दोन मिनिटातच 'भाईसाब, चौदा तारीख का अंक आपके पास है ? म्हणून विचारले. तेव्हा तो अंक मी तिला दिला. अंक होताच तिने 'क्या आपके पास यह ज्यादा कॉपी है ! आप मुझ दे सकते हैं ? अशी विचारणा करून दोन रुपयांची नोट पुढे केली. साहजिकच उत्सुकतेपोटी मी प्रश्न विचारला,

'क्यो ? आप किस लिए चाहते हो ?'

त्यावर तिने सांगितले, तिच्या घरातील सर्वांनी जानेवारी सात, एकवीस आणि अठ्ठावीसचे अंक वाचले आहेत; पण त्यांना चौदाचा अंक मिळाला नाही म्हणून तो अंक तिला हवा आहे. चौदा जानेवारीचे अंक मिरजेत कमी आल्याने अनेकांची मागणी होती याची मला कल्पना होती; पण तिचा लेखमालेवर अभिप्राय मला हवा होता. गप्पांच्या ओघात जेव्हा तिला, मी स्वतःच ते लेख लिहिले आहेत असे सांगितले तेव्हा तिने अभिनंदन केले व मला घरी चलण्याचा आग्रह केला. मीही फारसे आढेवेढे न घेता चटकन होकार दिला. स्टेशनस्टॉपच्याजवळच तिचे घर होते. आई शिक्षिका, वडील बँकेत क्लास टू ऑफिसर, घरातील वातावरण सुशिक्षित, सुसंस्कृतपणाचे, साहजिकच मध्यमवर्गीय कुटुंबात जाणवणारा मोकळेपणाही तिथे जाणवला. प्रथम तिने घरातील सर्वांची ओळख करून दिली. चहा दिला. चहापान चालू असताना घरातील सर्वजण माझ्या भोवती येऊन बसले होते.

घरात एकंदर सहा मुली तिघी विवाहित. दोघींचे लग्नाचे वय. शेवटची सातवीला शाळेत. सर्वांत शेवटचा मुलगा पाच वर्षांचा. मला भेटलेली ही मुलगी तिसरी. तीदेखील विवाहित; पण विवाहाचा शेवट ट्रॅजिडीत झालेला. 'अरब' या केवळ या एका शब्दाने तिचे जीवन उद्ध्वस्त झाले होते. ती हकिकत ऐकवण्याच्या हेतूनेच कदाचित तिने मला घरी नेले असावे. थोडक्यात हकिकत अशी की, ही मुलगी कॉलेजच्या पहिल्या वर्गाला असतानाची, साधारणत: दोन वर्षांपूर्वीची घटना आहे. सुस्वरूप, साहजिकच तिच्यामागे एक मुस्लिम तरुण लागला. अर्थात त्या तरुणाचे हे प्रेम एकतर्फीच होते. त्याला ती हवी होती; पण तिला तो नको होता. वडील पसंत करतील त्या तरुणाबरोबरच ती संसार थाटणार होती. तिने त्या तरुणाला चार–चौघात तसे स्पष्ट सांगून त्याची चांगली कानउघाडणीही केली होती; पण तो तरुण समजून घेत नव्हता. इन्कार ही होकाराची पहिली पायरी हे सिनेमातंत्र वास्तवात असते असे समजून तो आपले पाठलागाचे काम इमानेइतबारे करीत होता. दरम्यान वडिलांनी कोल्हापूरकडील एक स्थळ पाहून तिचा 'निकाह' लावून टाकला. सुदैवाने नवरा, घर सर्व काही ठीक होते. सात-आठ महिने आनंदात गेले असतील नसतील तोच कॉलेजमधल्या त्या माजी प्रेमवीराने एक निनावी पत्र तिच्या नवऱ्याला पाठवून ती मुलगी अरबांकडे जात होती असे खोटेच कळविले. झाले, नवऱ्याने एक चकार शब्द न बोलता तिला घरी परत पाठविले आणि तलाक देऊन दुसरा 'निकाह' लावला !

या घटनेला तीन वर्षे झाली. नशिबाला दोष देत स्वतःच्या पायावर उभे राहण्याचे प्रयत्न तिने चालविलेले आहेत. शॉर्टहँड, मराठी–इंग्रजी टंकलेखनाबरोबरच डिग्री पदरात पाडून घेण्यासाठी तिने कॉलेज परत जॉइन केलेले आहे. तिच्या आई–वडिलांनी मिरजेतल्या मुस्लिम मुलींबरोबर बाहेरचे कोणी विवाह करणे टाळत असल्याने मुलींची कशी कुचंबणा होते याच्या अनेक हकिकती सांगितल्या. यामुळे मुस्लिम समाजातील मुलींच्या विवाहाचा प्रश्न अतिशय बिकट बनलेला आहे. असे असतानाही स्वतःला धर्मपंडित म्हणवून घेणारे तथाकथित मौलवी, काजी; ऊठसूट धर्माच्या नावावर 'जिहादाची' बोंब मारणारे मुस्लिम पुढारी आणि त्यांना डोक्यावर घेऊन नाचणारी समाज-

वादी मंडळी मात्र मूग गिळून गप्प आहेत. भारतातल्या एकाही समाजवाद्याने आतापर्यंत 'मिरजेतल्या अरबांविरुद्ध' तोंड उघडलेले नाही, ही त्या मुलीच्या वडिलांनी बोलून दाखविलेली व्यथा अनाठायी नाही. समाजवाद्यांपासून कॉंग्रेसपर्यंत आणि भा. ज. प. पासून मुस्लिम लीगपर्यंत सर्वांना 'एकगठ्ठा मताची' काळजी लागली आहे. तेव्हा या कटु विषयावर बोलणार तरी कोण ?

¤

सा. 'माणूसने' सर्वसामान्यांसमोर अरबविषय सविस्तर मांडला, त्यामुळे त्यात अडकलेले काही अधिकारी उघडयावर आले. खैरुन्निसाच्या हद्दपारीचे प्रकरण दोन वर्षांपासून रेंगाळत होते. खैरुन्निसा ही मिरजेच्या दृष्टीने 'कॅन्सर' सारखे मोठे दुखणे आहे ! तिने अनेक समस्या निर्माण केल्या आहेत. तिच्या हकालपट्टीने बरेच प्रश्न सुटण्यासारखे होते. त्यासाठी तिची हद्दपारी तातडीने होण्याची गरज होती. या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना भेटलो असता त्यांनी प्रांताकडे बोट दाखविले. प्रांतसाहेबांची भेट घेतली त्या वेळी त्यांनी स्वतःपुढील सतराशेसाठ अडचणींचा पाढा वाचला.

शारदा-प्रकरणाच्या वेळी मी, हिंदु एकतेचे प्रांताध्यक्ष—श्री. नारायणराव कदम, प्रभाकर चौगुले, बापूराव साठे व अन्य पंधरा—वीस कार्यकर्ते जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन बाहेर पडत असताना सांगलीच्या राजवाडयाच्या आवारात प्रांतांची भेट झाली. या वेळी कदम यांनी त्यांच्या कानावर शारदा प्रकरण घातले व खैरुन्निसा—हद्दपारीचे प्रकरण अद्यापही कशासाठी लोंबकळत आहे असा प्रश्न केला.

तेव्हा मी मधेच 'केवळ प्रांतामुळे हे प्रकरण लोंबकळत पडले आहे. ते निर्णय करतील तेव्हाच ती मिरजेतून जाईल !' असे बोललो. साहजिकच साहेबांचा पारा चढला; पण परत मी त्यांना तेच वाक्य स्पष्टपणे ऐकवले आणि शारदासारख्यांचा बचाव करायचा असेल तर चटकन तिला हाकला असे सांगितले.

विषय बदलून नारायणराव कदमांनी तापलेले वातावरण थंड केले. या झटापटीचा परिणाम मात्र चांगला झाला. त्याच रात्री सात वाजता खैरुन्निसावर हद्दपारीची नोटीस बजावली गेली. नोटिशीवर खैरुन्निसाने तात्पुरता स्टे आणला वगैरे हा भाग वेगळा.

प्रांताने पावले उचलताच डॉक्टर्स, लॉजवाले यांच्यातही हालचाली सुरू झाल्या. 'शिवसेनेने' एक मोर्चा काढून सर्व डॉक्टरांवर तसेच इतर व्यावसायिकांवर मोर्चा काढून त्यांना अरबी भाषेतील बोर्ड काढायला भाग पाडले ! हिंदूएकतेच्या स्थापनेपूर्वी शिवसेनेने बापूराव साठे यांच्या मदतीने अरबप्रकरणात लक्ष घातले होते. नंतर शिवसेना थंड पडली; पण शारदाप्रकरणाच्या वेळी मात्र तिने कणखर पावले उचलली व अरबी भाषेतील बोर्डांवर डांबर फासले ! परिणामी मिरजेतले बरेचसे अरबी भाषेतले बोर्डस् निघाले. याच वेळी मिरजेतल्या सर्व लॉजमालकांनी एकत्र येऊन 'तब्बकांना' प्रवेश न देण्याचा निर्णय घेतला !

थंड होते ते पोलीसखाते. थंड होते म्हणण्यापेक्षा जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत होते; पण तेही अचानक खडबडून जागे झाले. त्याचे कारण 'माणूस !' पण लेखमाला मात्र नव्हे. शारदाप्रकरणाला सा. माणूसने फोडलेली वाचा हे होय. शारदाप्रकरण पोलीस दावताहेत हे लक्षात आल्यानंतर 'माणूस'ने पुढाकार घेऊन पुण्यातील पत्रकारपरिषदेत हे प्रकरण मांडले. त्यामुळे पोलीसखात्यात बरीच खळबळ उडाली त्यातच एका खून मालिकेला प्रारंभ झाला, तेव्हा कुठे हे जागे झाले! स्टेशनचौकानजीकच्या ग्राउंडवर एका तरुणाची कोणी तरी निर्घृण हत्या केल्याचे आढळून आले. त्यानंतर दुसरा खून एका रिक्शावाल्याचा झाला. तिसरी घटना एका हॉटेलातली. फासावर लटकविलेले एक प्रेत त्या ठिकाणी सापडले. विशेष म्हणजे त्या वेळी पोलीस रोज पेट्रोलिंगसाठी हॉटेलमध्ये जात होते; पण त्यांना काहीच पत्ता नव्हता ! हॉटेलमधील एका नोकराने ही माहिती पोलिसांना दिली. त्यानंतर हे खाकी डगलेवाले तिथे पोचले. या तिन्ही मृत्यूंशी अरबांचा कुठे ना कुठे संबंध आहे, असा लोकांच्या मनात संशय आहे. विशेष म्हणजे या घटनांचा तपास अद्याप पोलिसांना लागलेला नाही ! उलट त्यात अजून दोन मृत्यूंची भर पडलेली आहे. त्यातले एक प्रेत रेल्वेस्टेशनजवळ सापडले, तर दुसरे मिरजेतल्या एका विहिरीत आढळून आले. सध्या या घटनांमुळे पोलिसांचे 'पेट्रोलिंग' नियमित आहे. लॉजेसवर तब्बकांना प्रवेश बंद आहे. त्यामुळे पूर्वीच्या वातावरणात झालेला बदल जाणवतो.

¤

रा. स्व. संघाच्या पश्चिम विभागाचे शिबिर याच सुमारास मिरजेत पार पडले. दोन हजार गणवेषधारी संघस्वयंसेवकांचे निघालेले पथसंचलन आणि सरसंघचालक श्री. बाळासाहेब देवरस यांचे भाषण यामुळे मिरजेतले वातावरण काही काळ चांगलेच प्रभावित झाले ! योगायोगाने मी त्या दिवशी मिरजेत होतो. मला जेवणाचे निमंत्रण मिळाले होते. माझ्याप्रमाणेच मिरज—सांगलीतले पत्रकार, हिंदूएकतेचे कार्यकर्ते, निरनिराळ्या राजकीय पक्षाचे नेते, सामाजिक कार्यकर्ते यांना बाळासाहेब देवरस यांच्याबरोबर भोजनाचे निमंत्रण होते. जेवायला निघण्यापूर्वी दहा मिनिटे आधी मी श्री. बाळासाहेबांची भेट घेतली व त्यांना अरब लेखमालेचे चार अंक दिले. तेव्हा त्यांनी, 'मी वृत्तपत्रातून अधूनमधून मिरजेतील अरबांबाबत वाचत असतो. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे प्रश्न खरोखरच गंभीर आहे आणि तुम्ही तो सविस्तरपणे मराठी वाचकांपुढे आणलात हे फार चांगले झाले. मी अद्याप 'माणूस'चे अंक वाचले नाहीत; पण येथे आल्यानंतर येथल्या कार्यकर्त्यांनी मला तुमच्या माणूसमधील लेखांची कल्पना दिली. आता प्रवासात मी ते वाचीन असे म्हणतो. हाच विषय तुम्ही हिंदी व इंग्रजीतून मांडल्यास अनेकांपर्यंत पोचेल' अशी सूचनाही त्यांनी अखेरीस केली.

जेवताना श्री. बाळासाहेबांबरोबर श्री. नारायणराव कदम, श्री. काकासाहेब मराठे, जनता पक्षाचे शहराध्यक्ष, मिरज भा. ज. प. चे उपाध्यक्ष श्री. ए. एम. शेख व इतर अनेक मुस्लिम नेतेमंडळी होती. त्यात राष्ट्रसेवादलाचे कार्यकर्तेही होते. शिबिराच्या परिसरात व पथ-संचलनाच्या मार्गावर ठिकठिकाणी चुन्याने मोठमोठ्या अक्षरात 'राष्ट्र सेवादल झिंदाबाद', 'जातीयवाद देशाचा शत्रू आहे.' 'जातीयवादी संघटनांवर बंदी घाला!' वगैरे वगैरे अनेक घोषणा लिहिण्यात आल्या होत्या. रात्रभर भिंती, रस्ते रंगविणारी ही मंडळी दुसरे दिवशी जेवायला बाळासाहेबां-

बरोबर होती हे आणखी विशेष !

मिरजकरांनी, त्याचप्रमाणे मिरजेत वास्तव्याला असलेल्या अरबांनी प्रथमच एवढे मोठे भव्य, शिस्तबद्ध संचलन पाहिले ! हिंदुएकता तसेच अन्य अनेक संघटकांनी भव्य कमानी उभ्या करून स्वागतफलक लावले होते. अरबांचे वास्तव्य असलेल्या गांधीपुतळा-परिसरातून हे संचलन परतले, तेव्हा ते पाहण्यासाठी रस्त्यावर प्रचंड संख्येने लोक उभे होते. त्यात मिशन हॉस्पिटलचे डॉक्टर्स, नर्सेस यांचेबरोबरच अरबमंडळीही भरपूर होती, हे सांगायला नकोच. किसानचौकात हिंदुएकतेच्या लोकांनी फटाके वाजवून संचलनाचे स्वागत केले. संचलनानंतर मिरज मार्केट मैदानावर मिरज किल्ल्याची प्रतिकृती असलेल्या स्टेजवरून श्री. बाळासाहेबांचे भाषण झाले. त्यांचे पन्नास मिनिटांचे हे भाषण अत्यंत तेजस्वी आणि सडेतोड झाले. हिंदु लोकांना ते आवडले यात नवल नाही; पण मुस्लिमांनाही त्यांचे स्पष्ट विचार पसंत पडले. भाषणानंतर जे जे मुस्लिम भेटतील त्यांच्याशी मी चर्चा केली. त्यापैकी बहुतेकांनी बाळासाहेबांच्या भाषणाची स्तुती केली. इतकेच नव्हे तर भारतातील फुटीर प्रवृत्ती संपवायची असेल तर संघ-विचारांशिवाय तरणोपाय नाही, असे सांगून मोईन शेख नावाचा शिक्षक मला म्हणाला की, 'भारतात बहुसंख्य हिंदु असले तरच हिंदूंना न्याय मिळेल, हे तर बरोबरच आहे; पण मुस्लिमांनादेखील न्याय मिळेल! या देशात हिंदु बहुसंख्य असले तरी मुस्लिमांवर अन्याय झालेला नाही; पण मुस्लिम बहुसंख्य झाल्यास मात्र हिंदूंना न्याय मिळणार नाही; ही काळ्या दगडावरची रेघ आहे! पाकिस्तान आणि बांगलातील अल्पसंख्यांक हिंदूंची स्थिती किती खराब आहे हे स्पष्टच आहे. भारताच्याच नव्हे तर जगाच्या इतिहासाचे तसे दाखले आहेत. काळेसाहेब, दुसरा भाग तुम्हाला सांगतो की, कोणताही मुस्लिम माणूस इस्लामी राष्ट्रात स्वतंत्र किंवा सुखी नाही ! पुरावा म्हणून आपण पाकिस्तान, बांगला व जगातील इतर मुस्लिम नागरिकांची व भारतातील मुस्लिमांची तुलना करू. केव्हाही भारतातील मुस्लिम तुलनेने स्वतंत्र व सुखी आहे ! आज येथे सर्वांना समान संधी आहे. कोणताही उद्योग आम्ही करू शकतो. इतकेच काय आम्ही मिरजेच्या किसानचौकातच काय पण दिल्लीच्या चांदणीचौकातदेखील सभा घेऊन पंतप्रधान श्रीमती गांधी किंवा सरसंघचालक श्री. देवरसांवर टीका करू शकतो. तसे केले तर शासन किंवा समाज मला विरोध करणार नाही. तेच कोणताही पाकिस्तानी मुस्लिम झियाविरुद्ध किंवा इराणी मुस्लिम खोमेनी विरुद्ध बोलू शकतो का ? काळे, तुमचे सा. माणूस डाव्या विचाराचे आहे हे मला माहीत आहे; पण तुम्ही संघाला शिव्या देण्याआधी वस्तुस्थिती लक्षात घ्या !'

एक मुस्लिम शिक्षक सरसंघचालकांचे भाषण ऐकून हे विचार मांडीत होता. त्यावर मी अधिक भाष्य तरी काय करणार ?

¤

मिरजेतील अरबांचा प्रश्न हिंदुएकता आंदोलनाने ज्वलंत ठेवला हे माझ्या लक्षात आल्यानंतर त्यांच्यापैकी अनेकांना भेटून मी त्यांच्या मुलाखती घेतल्या. संघटनेची ध्येये-धोरणे माणूसच्या वाचकांसमोर ठेवली. तसेच त्या भागातली एक लढाऊ शाखा म्हणून इचलकरंजी शाखेचा परिचय करून दिला. अर्थात हिंदुएकताची सविस्तर माहिती देणे हा माझा विषय नव्हता. अरब प्रश्नाशी संबंधित तेवढेच मी त्यात कव्हर केले. आता त्यांच्या संदर्भात थोडी अधिक माहिती दिल्यास वावगे ठरणार नाही.

महाराष्ट्रात हिंदु एकता वाढली, फोफावली ती कोल्हापूर, मिरज, सांगली, कऱ्हाड, सातारा, इचलकरंजी या भागात; पण संघर्ष खरा दिला तो कोल्हापूर, इचलकरंजीने या दोन्ही शाखांनी अक्षरशः तलवारीचे घाव झेललेले आहेत असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. महाराष्ट्रातच नव्हे तर सबंध भारतात देखील अशी एकही संघटना नाही की, ज्या संघटनेचे प्रथम दर्जाचे तेवीस कार्यकर्त्यांनी मिसा भोगलेला आहे. मी सांगतो ही आणीबाणीतली हकिकत नाही तर १९८० च्या नंतरची, म्हणजेच इंदिराजी सत्तेवर आल्यानंतरची हकिकत आहे. खलिस्तानची मागणी करणारे देखील तेवीसच्या संख्येने मिसात नाहीत हे लक्षात घ्यायला हवे. प्रांताध्यक्ष सांगलीचे श्रीयुत नारायणराव कदम, मिरजेचे जीवन जामदार, इचलकरंजीचे गजानन मुरदंडे, मदन चव्हान, अजित पाटील, कोल्हापूरचे रविंद्र घोरपडे, विजय कुलकर्णी, उदय पवार, शैलेश पवार यांच्या नावानी बोंबलणारांनी हे लक्षात घ्यावे. ही मंडळी इतर कोणत्याही गुन्ह्याखाली नव्हे तर तत्त्वासाठी तुरुंगात मिसाखाली राहिली. संघटनेसाठी तुरुंगात खितपत पडणाऱ्या या लोकांची बाहेर–समाजात तर अहवेलना होतच होती पण घरीही तीच परिस्थिती होती. रिकाम्या उठाठेवींबद्दल घरच्यांची बोलणी खावी लागत होती. बरे, ही पोरे घरची श्रीमंत होती म्हणावे तर तसेही नव्हते. शैलेश पवारच्या घरी काय होते ? नारायणराव कदम, रविंद्र घोरपडे, अजित पाटील यांच्या तरी घरी सध्या काय आहे ? प्रांतसरचिटणीस प्रा. विजय कुलकर्णीचा परिस्थिती विषयक अनुभव वाचण्याजोगा आहे. विजय कुलकर्णी हा प्राध्यापक. तिशीच्या आतला. घरची गरिबी परिस्थितीला तोंड देत देत अनेक ठिकाणी नोकऱ्या करून शिक्षण घेतलेला हा तरुण, प्रारंभी कडव्या डाव्या विचाराचा पुरस्कर्ता होता; पण त्याच्यातला फोलपणा लक्षात येताच हिंदुएकतेत सहभागी झाला. हिंदुत्ववादी विचारांनी भारलेल्या विजयने नोकरी वगैरे शोधण्याचे सोडून देऊन सबंध दिवस संघटनेसाठी खर्च करायला सुरुवात केली. साहजिकच घरच्या लोकांनी एकदा चांगलीच त्याची कानउघाडणी केली. त्यावर विजयने घरच्या लोकांना काय ऐकवावे ? त्याने आपल्या भावांना सांगितले 'अरे, मी त्या वडिलांचा वारसदार आहे ज्यांनी संघबंदीचा निषेध करण्याकरिता जवळ काही साधन नाही म्हणून देवीची काळी साडी काठीवर फडकावली ! तुम्ही हिंदुत्वाचा विचार स्वीकारू शकणार नसलात तर निदान मला तरी कर्तव्य पार पाडू द्या. विचार नाही निदान मला तरी सांभाळणे तुमचे कर्तव्य आहे.'

विजय कुलकर्णीचे भाऊ त्या वेळी गप्प बसले खरे; पण नंतर त्यांनी एक चांगली मुलगी बघून त्याचे लग्न करून दिले. त्याल सांगितले, 'बाबा रे, तुला सांभाळणे हे आमचे राष्ट्रीय कर्तव्य होते, हे खरे आहे; पण आता तुझ्या बायका-मुलांना सांभाळणे हे आमचे कर्तव्य नाही. तेव्हा तू आता स्वतंत्र कुठे तरी सोय बघ.'

विजय कुलकर्णी याने हा किस्सा कोल्हापूर कार्यालयात सांगितला तेव्हा आम्ही

सर्वजण जोरजोरात हसलो. तोही आमच्या हसण्यात सहभागी होता; पण त्याच्या हसण्यात निखळपणा नव्हता. व्यथा होती ही. व्यथा सर्वच कार्यकर्त्यांच्या मनात आहे. याचा अर्थ विजय कुलकर्णीने काम सोडले असा मात्र नाही. चार-दोन शिकवण्या घेऊन कसेबसे पोट भरणारा विजय वेळ येताच स्वतःच्या बायको-मुलांची चिंता न करता तुरुंगाची वाट धरायला सिद्ध होतो. जे विजयचे तेच बाकीच्या सर्व कार्यकर्त्यांचे. हे सर्व कशासाठी ? हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांच्या धडपडीच्या एकेक हकिकती ऐकून थक्क झालेले भा. ज. प. चे आमदार श्री. अण्णा जोशी यांनी एका तरुणाला विचारले, 'अरे, तुम्ही हे सर्व करता मग घरचे काय म्हणतात ?' त्यावर 'अण्णा, बाकी सर्व विचारा; पण ते विचारू नका !' हे त्याचे उत्तर.'

हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांनी शिवजयंती, गणेशजयंती त्याचबरोबर रक्तदानासारखे अनेक सामाजिक उपक्रम पार पाडले. कोल्हापुरातील हिंदुएकतेला अशा अनेक कामांबद्दल अनेक प्रशस्तिपत्रके मिळाली आहेत. अगदी अलीकडेच इचलकरंजीतल्या कार्यकर्त्यांनी २६ जानेवारीनिमित्त सर्व शाळांतील तीन हजार बालकांना खाऊवाटपाचा भव्य कार्यक्रम घडवून आणला. हिंदुएकतेचे तरुण उत्साहाने सामाजिक कार्यात भाग घेतात; पण दुर्दैवाची बाब अशी की, या कार्यकर्त्यांच्या कार्याकडे न पाहता त्यांना गुंड ठरविण्याकडेच पोलीस व निरनिराळ्या राजकीय पक्षांचा कल अधिक जाणवला. यातही गंमत अशी की, हिंदुएकतेला गुंड म्हणवून शिव्या देणारे राजकारणी पुढारी आणि झोडपणारे पोलीस रक्ताची गरज लागताच मात्र हिंदुएकतेच्या घरांकडे धाव घेतात हे मी स्वतःच बघितले आहे.

ही झाली एक बाजू. दुसरीही बाजू थोडक्यात मांडायला हरकत नाही.

ही संघटना सांगलीला अस्तित्वात आली तरी तिची खरी वाढ झाली ती मिरज, कोल्हापूर, इचलकरंजी, सातारा, कऱ्हाड या भागात. वाढीमागची कारणे शोधण्याचा प्रयत्न मी केला. त्यात मला या ठिकाणी असलेला संघर्ष हेच त्याचे प्रमुख कारण असल्याचे आढळून आले. सांगलीतल्या हिंदुएकतेला रस्त्यावर येऊन संघर्ष करण्याची पाळी कधीच आली नाही. परिणामतः सांगलीत संघटना फारशी मूळ धरू शकली नाही. आज तर ती अतिशय विस्कळित आहे. त्याचे प्रत्यंतर मला त्यांनी फेब्रुवारीत चौथ्या वर्धापनदिनानिमित्त बोलावलेल्या मेळाव्यातही आले. मेळाव्यानंतरच्या सभेला तर जेमतेम दोन-अडीच हजार लोक होते. सांगली शहरात तसा या संघटनेचा कोणताच प्रभाव नाही. मिरजेत अरबांचे प्रकरण हातात घेऊन संघर्षात्मक पवित्रा घेतल्यामुळे तिथे संघटना वाढली होती. आता तिथेही जीवन जामदारसारखे जुने कार्यकर्ते संघटना सोडून गेल्यामुळे हिंदुएकतेचा प्रभाव संपलेला आहे.

शारदा प्रकरणाच्या वेळी सा.माणूस कार्यालयातील पत्रकारपरिषदेत पत्रकारांनी हिंदुएकतेचे लोक फक्त घोषणाबाजी करतात, प्रत्यक्षात कृती काहीच करीत नाहीत, अशा तक्रारी केल्या होत्या. त्या वेळी मी त्याचा इन्कार केला होता; पण सांगली-मिरजमध्ये अलीकडच्या काळात मला तशी परिस्थिती निर्माण झाल्याचे आढळून आले. 'खूनसत्राचा तपास आठ दिवसांत न लावल्यास पोलीसस्टेशनवर बांगडी मोर्चा नेऊ!', त्याचप्रमाणे 'पोलिसांनी तब्बकांना लॉजमध्ये प्रवेश देऊ नये; अन्यथा आठ दिवसांनंतर आम्ही छापे घालू !' वगैरे वगैरे. या प्रकारच्या घोषणा त्याच प्रकारच्या आहेत. आता त्या पूर्णपणे हवेत विरल्या आहेत. कुठे तरी काही तरी करायचे म्हणून विजय लॉजवर घेराव घातला तोही अर्धवट. त्यानंतर हिंदुएकतेचे कार्यकर्ते थंड पडले ते आजतागायत थंडच आहेत! घोषणा भडक करायची आणि कृती करायची नाही, त्यामुळे संघटनेचे कार्यकर्तेदेखील नेतेमंडळींवर नाराज आहेत ते पोलिसांच्या कच्छपी लागलेले आहेत, पोलिसांना मुदत देऊन वेळ मारून नेतात वगैरे अनेक आरोप सध्या मिरज-सांगलीत केले जात आहेत. यात खरे किती नि खोटे किती हा संशोधनाचा भाग आहे; पण सांगलीपाठोपाठ मिरजेच्या हिंदुएकतेने संघर्षाची भूमिका सोडून दिलेली आहे, हे मात्र खरे. मिरज-सांगलीत मला हिंदुएकतेत शिस्त, कार्यक्रमाची योजना, संघटनेची बांधणी, या सर्वांचाच अभाव जाणवला.

हिंदुएकता-आंदोलनाच्या गेल्या तीन वर्षांच्या काळात कोल्हापूर आणि इचलकरंजीतील कार्यकर्त्यांना पोलिसांच्या भयानक छळाला तोंड द्यावे लागले. शैलेश पवार, रवींद्र घोरपडे, विजय कुलकर्णी हे कोल्हापूरचे कार्यकर्ते आणि इचलकरंजीचे मुरदंडे, पाटील, चव्हाण यांचे वास्तव्य कायमचे पोलीसस्टेशनमध्ये असायचे. एकेकावर पंचवीस-पंचवीस केसेस ! जामीन तरी कोण देणार ? शैलेश पवारचा मुंबईच्या अरब कॉन्सुलेट गोळीबारात मृत्यू झाला. उदय पवार संघटनेबाहेर गेलेला आहे. विजय कुलकर्णी, रवींद्र घोरपडे यांनी कार्यक्रमाचे स्वरूप बदलले असल्याने कोल्हापूर आज थोडे-फार शांत आहे; पण इचलकरंजी मात्र अद्याप धगधगत आहे. पोलीस हिंदुएकतेच्या कार्यकर्त्यांना अमानुष मारझोड करतात, हे फक्त मी ऐकून होतो; पण त्याचे प्रत्यक्ष दर्शन घडले ते बंदच्या निमित्ताने. हा बंद हिंदुएकतेने कशासाठी पुकारला होता? तर भारताच्या लंडनमधील उप-उच्चायुक्त कै. रवींद्र म्हात्रे यांच्या हत्येच्या निषेधार्थ-त्यांना आदरांजलि वाहण्यासाठी. संपूर्ण भारतात पाळला गेलेला एकमेव बंद.लोकांनी तो स्वयंस्फूर्तीने पाळला असताना पोलिसांनी अमानुषपणे मारहाण केली. एका अर्थाने तो इचलकरंजीतला काळा दिवस ! या दिवशी घडलेल्या घटना ऐकून कै. म्हात्रे यांच्या मातोश्रींच्या डोळ्यांतदेखील अश्रू तरळले ! त्या घटना जरा सविस्तराने देतो म्हणजे वाचकांना हे प्रकरण काय आहे ते कळेल.

मी आठ फेब्रुवारीला इचलकरंजीत पोचलो. तत्पूर्वीच दुपारी झालेल्या मीटिंगमध्ये हिंदुएकताने बैठक घेऊन बंदचा निर्णय घेतला. त्याप्रमाणे त्यांनी पोलीसइन्सपेक्टर श्री. हिंदुराव पाटील यांची भेट घेऊन त्यांना कल्पना दिली. श्री. पाटील यांनी सुचविल्याप्रमाणे अत्यावश्यक सेवा वगळून इतर सर्वांना बंदचे आवाहन करण्यासाठी एक पत्रक काढून शहरभर वाटले. □

**म्हात्रे खून प्रकरणाच्या निषेधार्थ इचलकरंजी हिंदुएकताने काढलेले पत्रक, महिला मंडळाने काढलेला बांगडी मोर्चा, पोलिसांच्या मारपिटीच्या चीड आणणाऱ्या कृती व हैद्राबाद लेखाची सुरुवात पुढील अंकात—**




महिमवर अचलेचे प्रेम असताना तिचे मन सुरेशकडे का व कसे ओढले गेले, तरीही तिने महिमशीच कसा विवाह केला आणि मग पुन्हा सुरेशबद्दल आकर्षण का व कसे वाटत राहिले याचे सूक्ष्म व सूचक चित्रण शरदबाबूंनी मोठ्या कौशल्याने—टप्प्या-टप्प्याने आपल्यापुढे ठेवले आहे.

# शरदबाबूंची एक आधुनिक कादंबरी-'गृहदाह'

**लेखांक : पाच । लेखक : प्रा. बा. वि. पोतदार**

दोन पुरुषांविषयीच्या आकर्षणाच्या भोवऱ्यात जिचे चित्र दोलायमान होत राहाते अशा एका युवतीची ही शोककथा आहे. मानवी मनातील विविध प्रेरणांशी शरदबाबूंचा किती सखोल परिचय होता याचा प्रत्यय या कादंबरीत येतो. शहरात राहिलेल्या एका सुशिक्षित तरुणीची ही कहाणी असल्यामुळे लेखकाने अचला व तिचे वडील केदारबाबू यांना ब्राह्मसमाजी कल्पिले असले तरी ब्राह्मसमाज व हिंदूसमाज यातील संघर्ष हा या कादंबरीचा विषय नाही. सुरेश व महिम हे जिवाभावाचे मित्र. अचलेचे महिमवर प्रेम असते; परंतु सुरेशशी परिचय झाल्यानंतर तिला आकर्षण वाटत राहाते ते सुरेशबद्दल. महिम व अचला यांच्या विवाहानंतरही हे आकर्षण कमी होत नाही. त्यातून जे उत्पात घडून येतात त्यांची ही कहाणी आहे. हा एक आधुनिक विषय शरदबाबूंनी निवडला; परंतु मानवी मन हे असे स्खलनशील असते एवढेच आधुनिक कथाकारांप्रमाणे दाखवून शरदबाबू थांबत नाहीत. त्यांची नैतिक दृष्टी नेहमीप्रमाणे जागी आहे व नेहमीप्रमाणे ती उदार व करुणापूर्ण आहे. ज्याला आपण पाप म्हणतो त्याचे परिणाम भोगावेच लागतात; पण एखादे पाप घडून येण्यासाठी केवळ विशिष्ट व्यक्तीची स्खलनशीलताच तेवढी कारणीभूत नसते, अन्य व्यक्तींचाही त्यात वाटा असतो. इतकेच नव्हे तर एकूण परिस्थितीही पुष्कळदा जबाबदार असते, असे दर्शविण्याचा शरदबाबूंचा प्रयत्न आहे. म्हणून चुका करीत राहणाऱ्या अचलेबद्दल व सुरेशबद्दल शेवटी आपल्या मनात अनुकंपाच निर्माण होते.

महिमवर अचलेचे प्रेम असताना तिचे मन सुरेशकडे का व कसे ओढले गेले, तरीही तिने महिमशीच कसा विवाह केला आणि मग पुन्हा सुरेशबद्दल आकर्षण का व कसे वाटत राहिले, याचे सूक्ष्म, तपशीलवद्ध व सूचक असे चित्रण शरदबाबूंनी मोठ्या कौशल्याने व टप्प्या—टप्प्याने आपल्यापुढे ठेवले आहे. मानवी मनाचे एवढे संमिश्र चित्र अत्याधुनिक कादंबरीतसुद्धा क्वचितच पाहायला मिळते. मानवी मन असे चंचल होण्यासाठी, वारंवार बदलण्यासाठी, तशीच कारणेही घडत असतात याचे भान त्यांनी प्रकर्षाने ठेवले आहे. अचला व सुरेश यांची भेट घडून येते ती महिममुळेच, म्हणजे महिम—अचला यांच्या प्रेमाला सुरेशचा विरोध असल्याने. कारण एका ब्राह्मण युवतीवर महिमचे प्रेम जडावे हे सुरेशच्या हिंदु मनाला पटत नाही. शहरी ब्राह्म युवती संसार नीट करू शकतात असे त्याला वाटत नाही; परंतु अचलेशी प्रत्यक्ष परिचय झाल्यावर अनावर स्वभावाचा सुरेश तिच्याकडे तात्काळ इतका आकृष्ट होतो की, मित्रद्रोह करून तो अचलेचे प्रणयाराधन करू लागतो. तिच्याकडूनही त्याला नकळत उत्तेजन मिळते. योगायोग असा की, महिम या वेळी कलकत्ता सोडून काही कारणासाठी आपल्या गावी गेलेला असतो. महिमच्या थंडपणामुळे व अचलेचे वडील केदारबाबू यांच्या लोभीपणामुळे परिस्थिती बिघडत जाते. अचला व महिम यांचा विवाह झाल्यानंतरही सुरेशचे अचलेसंबंधीचे आकर्षण कमी होत नाही. संधी मिळताच तो तिला पळवून नेतो; परंतु पापाच्या जाणिवेने दोघांचीही मने तळमळत राहातात. सुरेशच्या मृत्यूनेच ही कथा संपू शकते.

सूचक संवाद व नाट्यात्म प्रसंग यातून शरदबाबूंनी कथेचा प्रत्येक टप्पा पायरीपायरीने फुलवीत नेलेला आहे. ही सर्व माणसे चांगलीच आहेत आणि तरीही वरीलप्रमाणे घटना घडत जातात. दोष कुणाला द्यावा यासंबंधी आपल्या मनात संभ्रम निर्माण होतो. सुरेश श्रीमंत, परोपकारी, भावविवश, उतावळ्या वृत्तीचा आहे. कुणाचे दुःख

पाहिले की त्याच्या डोळ्यात अश्रू येतात. धोका पत्करूनही इतरांच्या संकटकाळी धावून जाण्याची त्याची वृत्ती आहे. मग तो असा का वागतो ? अचलेबद्दल वाटलेले बेभान आकर्षण हे त्याचे एक उत्तर आहे. खरे तर ब्राह्मसमाजातील आधुनिक राहणीच्या मुलींबद्दल सुरेशचे मन पूर्वी चांगले नव्हते; परंतु अचलेबद्दल त्याचे मन इतके चांगले बनते की, एक प्रतिक्रिया म्हणून तो बेभानपणे तिच्या प्रेमात पडतो. बुद्धिमान, लाघवी, सुंदर व मोकळेपणाने वागणाऱ्या युवतीशी त्याचा पूर्वी कधी परिचयच झालेला नव्हता. त्यामुळे तो आता ती ब्राह्म आहे हेही विसरतो व ती आपल्या परम मित्राची प्रेयसी आहे हेही विसरतो. लहानपणापासून श्रीमंतीत व लाडात वाढल्याने, घरी एका आत्याबाईखेरीज कुणी नसल्याने, मनात येईल ते बोलून व करून दाखविण्याची त्याला सवय आहे. दारिद्र्यामुळे लहानपणापासून झालेले महिमचे हाल पाहून सुरेशने त्याला अनेकदा कळवळून आग्रह केला होता की, महिमने त्याच्याकडे राहावे, त्याच्या प्रमाणे डॉक्टरकी शिकावी, निदान त्याची आर्थिक मदत स्वीकारावी; परंतु महिम स्वाभिमानी व थंड प्रवृत्तीचा आहे. आश्रिताची भूमिका स्वीकारल्यास मैत्रीस बाध येईल हे त्याला लहान वयातच कळले असावे, म्हणून सुरेशचा प्रेमाचा जुलूम तो प्रथमपासून अमान्य करीत आलेला आहे. कदाचित त्यामुळेच सुरेशचा महिमबद्दलचा आदर प्रथमपासून दुणावतो. महिम तत्त्वनिष्ट, अबोल, स्वयंपूर्ण आहे, त्यामुळे तो एकलकोंडा व भावरहित वाटतो. आपल्या सुखदुःखात तो कुणाला वाटेकरी करीत नाही ही सुरेशची तक्रार होती, नंतर अचलेनेही हीच तक्रार केलेली आहे.

## केदारबाबूंचा धूर्तपणा

पण सुरेशचा अनावर व असंयमी स्वभाव हेच त्याच्या वर्तनामागचे कारण होते की, अचलेनेही त्याला प्रोत्साहन दिले होते ? तिचे सौंदर्य व बुद्धिमत्ता पाहिल्यावर सुरेश झपाटल्यासारखा होतो. रक्त एकदम त्याच्या डोक्यात चढते, डोळे लाल होतात, हात कापू लागतात. दुसऱ्याच भेटीत अनावर होऊन तो तिला मिठीत घेतो; पण अचलेसारख्या सुविद्य मुलीला या अनावर माणसाला झटकून टाकणे इतके अवघड का जावे ? अर्थात त्याचीही कारणे शरदबाबूंनी सूचित केलेली आहेत. तो महिमचा जिवाभावाचा मित्र होता व महिमच्या बोलण्यामधून सुरेशच्या स्वभावाची तिला पूर्वीपासूनच थोडी-फार कल्पना आलेली असणार. त्यामुळे त्याची दांडगाई खेळीमेळीने सहन करण्याची तिची प्राथमिक भूमिका दिसते. महिमचा मित्र असलेला सुरेश आपले खरोखरीच प्रणयाराधन करील असे तिला वाटले नसावे.

अचलेचे महिमवर प्रेम होते. त्याचे चारित्र्य, धीरोदात्तवृत्ती यामुळे अचला व केदारबाबू यांना त्याच्याविषयी प्रेमादर होता. तो हिंदू असला तरी अचलेचा विवाह त्याच्याशी झाल्यास हरकत नाही अशी केदारबाबूंची भूमिका असावी. कारण आधुनिक राहाणीमुळे ते स्वत: आर्थिक अडचणीत होते. विवाहाबद्दल व महिमच्या आर्थिक परिस्थितीबद्दल स्पष्ट बोलणी झालेली नव्हती. कारण महिमचा कायद्याचा अभ्यास अजून चालू होता. एक दिवस सुरेशची केदारबाबूंशी प्रथमच भेट झाल्यावर या प्रेमाच्या व विवाहाच्या विरुद्ध असलेला सुरेश आपल्या स्वभावानुसार त्यांना स्पष्टपणे सांगतो की, एका ब्राह्म मुलीशी त्याच्या मित्राने विवाह करावा हे त्याला मान्य नव्हते. तो पुढे म्हणतो : त्याची परिस्थिती कशी आहे, स्त्रीपुत्रांचा प्रतिपाल करण्याचे सामर्थ्य त्याला आहे किंवा नाही, खेड्यातल्या हिंदू समाजाशी विरोध आला असता मोडक्या-तोडक्या घरात संसार थाटायला आपली मुलगी तयार आहे की नाही, तयार नसली तर महिम कोणती योजना करणार आहे, या साऱ्या गोष्टींचा आपण विचार केलेला आहे का ?' आपल्या परम मित्राला अविचारी विवाहापासून वाचविण्याची सुरेशची भूमिका होती. अर्थात त्याने उपस्थित केलेल्या मुद्द्यांचा केदारबाबूंनी अजून विचार केला नसावा. कारण विवाहाविषयी त्यांना, महिमला किंवा अचलेला इतकी घाई झालेली नव्हती. महिम मार्गाला लागेपर्यंत थांबण्याची सर्वांचीच तयारी होती. हे सर्व शरदबाबूंनी स्पष्ट न सांगता सूचित केले आहे.

परंतु नंतर अचलेला पाहिल्यावर, तिचे सौंदर्य, मोकळेपणा, महिमवरील तिची निष्ठा, या तिच्या गुणांमुळे सुरेश भारावून जातो. आपण इथे येऊन महिमविरुद्ध व या विवाहाविरुद्ध बोलून काही तरी अन्याय केला, या विचारामुळे तो इतका ओशाळून जातो की अचलेला त्याचे कौतुक वाटते. त्याच्या स्वभावाबद्दल थोडीफार कल्पना असल्याने ती त्याच्या बोलण्याबद्दल गैरसमज करून न घेता, त्याच्याशी मित्रत्वाने व मोकळेपणाने वागते, परंतु त्यामुळे त्याला वेगळ्याच प्रकारचे उत्तेजन मिळाल्यासारखे होते. सुरेशच्या वरील उद्गारामुळे तिच्या मनात महिमबद्दल संदेह निर्माण होत नाही; परंतु दुसऱ्याच भेटीत अनावरपणे सुरेश तिला आपल्या मिठीत घेतो, तेव्हा आपण समजलो त्यापेक्षा जास्त भडक डोक्याचा हा माणूस आहे हे लक्षात येऊन ती जास्त काळजीपूर्वक वागू लागते. उदाहरणार्थ, एक दिवस केदारबाबू सुरेशला राहण्याजेवण्याचा आग्रह करतात, तेव्हा सुरेश हिंदू असल्याने त्याला आपल्या घरचे जेवण चालणार नाही, केदारबाबूंनी त्याला आग्रह करू नये, असे ती सुचवून पाहाते.

परंतु अचलेला पाहिल्याबरोबर पहिल्याच दिवशी सुरेश मुग्ध कसा होऊन गेला हे केदारबाबूंच्या नजरेने टिपलेले असते व त्यांच्या मनात काही वेगळेच विचार सुरू झालेले असतात. निर्धन महिमपेक्षा सधन सुरेश त्यांना मनातल्या मनात जावई म्हणून अधिक पसंत पडतो. पहिल्या खेपेस वेगळ्या संदर्भात सुरेशने त्यांना महिमच्या निर्धनतेबद्दल माहिती दिलेली असते, त्या गोष्टीचा ते मुद्दाम विपर्यास करतात व महिमने स्वतःच आधी ही माहिती आपल्याला न दिल्याबद्दल त्याला खोटारडा ठरवून, सुरेशने आपल्याला सावध केल्याबद्दल त्याचे आभार मानतात. असे करण्यात त्यांचा कोणता हेतु होता हे सुरेशच्या व अचलेच्याही लक्षात येते; परंतु त्यांची ही भूमिका सुरेशच्या पथ्यावर पडते. महिमवर आपण अन्याय करीत आहोत या जाणिवेपेक्षा अचलेचे आकर्षण अधिक सामर्थ्यशाली ठरते. मुलीचा विवाह सुरेशशी करून दिल्यास तो सधन असल्याने; कर्जापायी गहाण पडलेले आपले घर वाचेल, असा केदारबाबूंचा हिशेब आहे. कर्जाचा उल्लेख त्यांनी एकदा केल्यावर सुरेश लगेच त्यांना कर्जफेडीसाठी मोठी रक्कम देऊन टाकतो. इथे, हे पैसे घेऊ नयेत असे अचलेने केदारबाबूंना सुचविले आहे; परंतु ते ऐकत नाहीत. अचलेचा विवाह सुरेशशीच

लावून द्यायचा असे त्यांनी मनात ठरविलेले आहे. अचलाही हळूहळू व्यवहारी दृष्टिकोणातून पाहायला शिकेल अशी त्यांना उमेद आहे.

खरे म्हणजे अचलेशी ते याबाबतीत स्पष्ट चर्चा कधीच करीत नाहीत. दडपेगिरीने वागतात. तथापि मुलीला न विचारता, जुन्या हिंदु रिवाजाप्रमाणे स्वतः त्यांनी वराची निवड केली असेही व्हायला त्यांना नको आहे. 'घर राहिलं तर तुमचं दोघांचं राहील' अशा सूचक शब्दात ते आपला मनोदय वारंवार व्यक्त करतात व अचलेचे प्रणयाराधन करण्यासाठी सुरेशला प्रोत्साहन व अवसर देतात. अचलेला त्यांचे हे वर्तन आवडत नाही; परंतु स्त्री–सुलभ संकोचाने ती गप्प राहिली असली पाहिजे. कर्जफेडीसाठी सुरेशने दिलेले पैसे पुढे परत मागण्याचा त्याचा विचार नव्हता, हे कळल्यावर या उपकाराच्या बंधनाने तिलाही, बांधल्यासारखे होते व नंतर आज्ञाधारक मुलीची भूमिका तीही वठवू लागते. इतकी मोठी रक्कम सुरेशने केवळ आपल्यासाठी देऊ केली या विचाराने त्याचे प्रेम किती मोठे होते याची जाणीवही तिला झाली असावी व त्या जाणिवेने ती सुखावलीही असावी.

सुरेशला आतापर्यंत प्रेमभावनेची ओळख नव्हती; सुशिक्षित तरुणीशी कधी त्याचा परिचयही झालेला नव्हता. महिमने आपल्या प्रेमाबद्दल त्याला काही दिवसांपूर्वी सांगितले, तेव्हा त्याने कडाडून विरोध केला होता व 'एक महिनाभर या मुलीला भेटू नको' असा उपदेश महिमला केला होता. एखाद्या मुलीवरचे प्रेम विसरण्यास एवढा कालावधी पुरे आहे असे त्याला वाटले असावे. अचलेला प्रत्यक्ष पाहिल्यावर प्रेमभावनेशी त्याचा प्रथम परिचय होतो. महिमपेक्षा आपण खरोखर अचलेच्या प्रेमाला अधिक पात्र आहोत; असे त्याला वाटू लागते. अचलेसारख्या मुलीच्या प्रेमाचा हा दुर्मिळ ठेवा महिमला लाभलेला असताना महिम त्याची योग्य बूज ठेवीत नाही, अचलेचा योग्य तो अनुनय करीत नाही, तिला न सांगतासवरता परगावी जाऊ शकतो याचे त्याला आश्चर्य वाटू लागते. महिमसारख्या रुक्ष माणसाशी अचलेसारख्या मुलीची गाठ घालून नियतीने मोठा अन्याय केला आहे, अशी भावना त्याच्या मनात निर्माण झाली असावी. म्हणूनच अचलेचा अनुनय करताना मित्रद्रोहाची जाणीव तीव्रतेने त्याच्या मनात उद्भवत नाही. एखाद्या हट्टी मुलाला एखादे खेळणे देऊन टाकावे, तसे रुक्ष स्वभावाचा महिम स्वतः बाजूला सरून अचला त्याला देऊन टाकील अशी आशाही त्याला वाटली असावी. महिमवर आपण खोटा अन्याय करीत आहोत असे केदारबाबूंनाही वाटत नाही. मात्र सुरेश व अचला यांनीच एकमेकांची निवड केली असे स्वतःला भासविण्यात त्यांना आनंद आहे. अचलेची भूमिका अशी दिसते की, आपल्या वडिलांनी आपल्याला हुकूम केला व सुरेशला आपल्याला देऊन टाकले व ते आपल्याला मान्य करावे लागले, त्यामुळे आपल्यावर फारसा दोषारोप येत नाही. सुरेशची अशी भूमिका दिसते की, महिमपेक्षा तो स्वतः केदारबाबूंना जावई म्हणून अधिक पसंत पडला, तर त्यात त्याचा स्वतःचा काही दोष नव्हता. प्रत्येकाने स्वतःचे असे समर्थन, स्वतःशी असे केले असावे. त्यांचे फक्त बाह्य दिसणारे वर्तन शरदबाबूंनी चित्रित केलेले आहे.

अर्थात या सर्व व्यक्तींपैकी कुणीच आपली भूमिका महिमपुढे नीटपणे विशद करीत नाही. प्रत्येकाला वाटते की, दुसऱ्याने हे काम करावे किंवा महिमनेच बदललेली परिस्थिती समजून घेऊन बाजूला व्हावे; परंतु तो काही दिवसांसाठी गावी गेलेला असतो. तो परत, कलकत्त्यास येऊन केदारबाबूंकडे येतो तेव्हा सर्वांचेच वर्तन त्याच्या दृष्टीने चमत्कारिक व अपमानकारक होते. त्याच्या येण्याच्या वेळी, त्याला टाळण्यासाठी, केदारबाबू अचला व सुरेशसह मुद्दाम बाहेर निघून जाण्याचा परिपाठ ठेवतात. एकदा तर तो आला असताना केदारबाबूंचे वर्तन स्पष्टपणे अपमानकारक होते व या सर्व प्रकारामुळे, अचलेचे महिमबद्दलचे दडपून ठेवलेले प्रेम व सहानुभूती पुन्हा उफाळून वर येते आणि तिची ओढून–ताणून आणलेली आज्ञाधारक मुलीची भूमिका ढासळून पडते. एकदा ती महिमला एकीकडे गाठून सुरेशबद्दल तक्रार करते व आपल्या प्रेमाची खूण म्हणून आपल्या बोटातली अंगठी महिमच्या बोटावर चढविते. हे झाले नसते, तर बदललेली परिस्थिती पाहून महिम कदाचित मुकाट्याने दूर [बसला असता. कारण एकट्याने दुःख सहन करण्याची त्याला सवय होती; परंतु अचलेच्या या भावप्रदर्शनामुळे तो पुन्हा एकदा केदारबाबूंची भेट घेण्याचे ठरवतो.

या खेपेस केदारबाबू त्याला स्पष्ट सांगतात की, त्याची आर्थिक स्थिती सुधारेपर्यंत ते अचलेचा विवाह थांबवून ठेवू शकत नव्हते व म्हणून ते आपली मुलगी त्याला देणार नव्हते. तेव्हा अचलेने काकुळतीने केलेली विनंती लक्षात घेऊन, महिम अचलेला विचारतो, 'ही अंगठी तू परत घेणार आहेस का ?' या बैठकीचे पर्यवसान शेवटी कुणीकडे झुकणार हे लक्षात येताच आतल्या खोलीत बसलेला सुरेश चिडून जातो, मत्सराने त्याचा तोल जातो व मित्रप्रेम विसरून तो क्षुद्रपणाने वागतो. अचानक एखादा प्रसंग नाट्यात्म पद्धतीने चितारून शरदबाबू त्यातून किती प्रकारचे अर्थ व्यक्त करू शकतात, याचे हे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. अकस्मात बाहेरच्या खोलीत प्रवेश करून सुरेश नाटकीपणाने केदारबाबूंना सांगतो की, त्याला थांबायला वेळ नव्हता. प्लेगने ग्रासलेल्या एका गावी, बाळपणच्या एका मित्राचा जीव वाचविण्यासाठी, त्याला ताबडतोब जाणे भाग होते. महिमनेही यायला पाहिजे होते; परंतु महिम आपल्या मित्राला संकटकाळी विसरला असावा. त्याबद्दल सुरेश महिमची नाटकीपणाने निर्भर्त्सनाही करतो. सुरेशने तावातावाने केलेले उपरोधाचे भाषण ऐकून सर्वजण चकित होतात. त्याच्या भाषणातील खोटेपणा व त्यामागील हेतू अचलेच्या प्रथम लक्षात येतात. प्लेगसारख्या धोक्यापासून चार हात दूर राहाण्याच्या प्रयत्नात एका बालमित्राला विसरण्याइतका महिम क्षुद्र व स्वार्थी होता असे दर्शवून, इतरांचे मत महिमविषयी कलुषित करण्याचा त्याचा प्रयत्न होता. वास्तविक हा

**महिम अचलेला विचारतो, 'ही अंगठी तू परत घेणार आहेस का ?'**

बालमित्र कोण व प्लेग कुठे होता, याची काहीच माहिती महिमला नव्हती हे त्याच्या चेहऱ्यावरून स्पष्ट दिसून येत होते. औदार्य; दुसऱ्यासाठी धोका पत्करणे, हे गुण सुरेशमध्ये खरोखरच होते. त्यांचे प्रदर्शन करून, निदान काही गुणांत तरी आपण महिमपेक्षा कसे श्रेष्ठ आहोत हे अचलेला व केदारबाबूंना दाखवून देणे, हा त्याचा दुसरा हेतु होता. त्याचा तिसरा हेतु असा होता की, अचलेची प्राप्ती आपल्याला होणार नसेल तर जीवनात आपल्याला काहीच स्वारस्य नाही, प्लेगने ग्रासलेल्या गावी आपण लोकसेवेसाठी जाऊन स्वतःचे जीवन संकटात झोकून देऊ, हे अचलेच्या निदर्शनास आणावे, आणि तिच्या दयेच्या आणि सहानुभूतीच्या भावनेस आवाहन करावे. हे सर्व अचलेच्या लक्षात येते व तिला त्याच्या वर्तनाची इतकी चीड येते,की आतापर्यंतची शालीनता भिरकावून देऊन ती उघडपणे महिमची बाजू घेते व सुरेशबद्दल तिरस्कार व्यक्त करते. महिम परगावी गेलेला असल्याने अचला काही काळ गप्प बसली असली, तरी त्याच्या पुनरागमनानंतर सुरेशचे जे स्वार्थीपणाचे व अन्यायाचे वर्तन होते त्यामुळे अचलेचे मन विटून जाते व तिचा निर्णय निश्चितपणे महिमच्या बाजूला झुकतो व तो व्यक्त करण्याचे धैर्यही तिला प्राप्त होते.

सुरुवातीलाच जर अचलेने सुरेशचा निषेध केला असता व बापाबरोबर स्पष्ट चर्चा केली असती तर सुरेशच्या स्वभावाबद्दल कल्पना येऊन केदारबाबूंनी महिमविरुद्ध निर्णय घेताना विचार केला असता. वडिलांच्या भूमिकेमुळे अचलेची जी कुंचबण झाली त्याऐवजी सुरेशला झटकून टाकण्यास वडिलांची अप्रत्यक्ष मदतही होऊ शकली असती; कारण केदारबाबूंना सुखवस्तु राहाणीची सवय असली, तरी विवाहानंतर अचलेला सुरेशचा पडलेला मोह त्यांना बिलकूल आवडत नाही. वेळीच योग्य भूमिकेतून अचला वागली असती, तर सुरेश ताळयावर आला असता. त्याने आपल्या होऊ घातलेल्या ' वहिनी 'ची क्षमा मागितली असती आणि पुढील सर्व गोष्टी टळल्या असत्या; परंतु महिमवर प्रेम असतानाही, एका अगदी वेगळया प्रकारच्या तरुणाशी संबंध आला, त्याच्या दुर्दम्य प्रेमाचे दर्शन झाले, वडिलांनाही तो पसंत पडला, त्यामुळे अचलेचेही मन प्रथमपासूनच थोडेफार चळले होते असे स्पष्ट दिसते. मित्रद्रोह करून सुरेश आपले प्रियाराधन चालू ठेवील असे तिला प्रथम वाटले नसावे; पण एकीकडे वडिलांच्या निर्णयाने तिची कुचंबणा होत राहाते, तर दुसरीकडे सुरेशच्या दुर्बलतेबद्दल तिला अनुकंपाही वाटत राहाते. त्याच्या भावविवशतेमुळे व अगतिकतेमुळे तिचे स्त्री–मन विरघळत राहाते. ती एक ब्राह्मयुवती आहे, पुरुषाचा नुसता स्पर्श झाला की शरीर विटाळते, अशी तिची कल्पना नाही. त्यामुळे सुरुवातीला ती सुरेशशी मोकळेपणाने वागत राहाते व त्याच्याकडून घडणाऱ्या चुकांना क्षमा करीत जाते. अर्थात त्याच्या प्रेमाच्या सतत दर्शनाने तिचा अहंकार व अस्मिता त्या त्या वेळी फुलविली गेली असली पाहिजे, व तिला ही गोष्ट सुखद वाटली असली पाहिजे.

पण सुरेशचे हे प्रणयाराधन चालू असताना या दोघांचीही मने महिमच्या विचाराने खिन्न व अस्वस्थ होत राहातात. पैशाने आपण अचलेला विकत घेऊ पहात आहोत असे सुरेशला मधून मधून वाटत राहाते. त्याच्या श्रीमंतीमुळे, मिळू शकणाऱ्या ऐषआरामामुळे, त्याच्या स्वतःच्या दुर्दम्य प्रेमामुळे, ती महिमला विसरू शकेल असा विश्वासही त्याला वाटत राहातो; परंतु शेवटी तिला फसवून पळवून नेण्याचा त्याचा गुन्हा तिच्या दृष्टीने अक्षम्य ठरतो. कथानक संपत संपता त्याच्या लक्षात येते की मनाशिवाय शरीर ही एक निर्जीव गोष्ट आहे. ज्या स्त्रीचे मन आपल्याला मिळत नाही तिचे शरीर ही एक निरूपयोगी गोष्ट ठरते. सुरुवातीला प्रेमभावनेची ओळखच नसणाऱ्या सुरेशची प्रेमकल्पना कटु अनुभवातून प्रगल्भ होत गेलेली आहे.

## अचलेचा निर्णय

महिम व अचला यांचा विवाह कोणत्या परिस्थितीत झाला हे दर्शवून, त्यांचा संसार कोणत्या प्रकारचा होऊ शकेल, या संबंधी काही अंदाज करण्याची संधी आपल्याला शरद्‌बाबूंनी उपलब्ध करून दिलेली आहे. इतरांच्या स्वार्थी व व्यवहारी वृत्तीची चीड येऊन, अचलचे मन पुन्हा महिमच्या प्रेमाचा आसरा शोधते व ती आग्रहाने महिमशी त्वरित लग्न करते; पण महिमला विवाहानंतर तिला आपल्या खेड्यात नेऊन संसार थाटावा लागतो. वास्तविक आताच विवाह करण्याची महिमची परिस्थिती नव्हती. कायद्याच्या परीक्षेचा निकाल लागून जरा जम बसल्यानंतर विवाह करण्याचा त्याचा प्रथम विचार होता; परंतु सुरेशच्या केदारबाबूंच्या घरातील प्रवेशामुळे,अचलेच्या विवाहाचा प्रश्न घसाला लागतो.म्हणजे महिम व अचला यांच्या मनाचीही विवाहाबाबत पूर्वतयारी होण्यापूर्वीच घाईने हा विवाह झालेला आहे. महिमचा जम बसेपर्यंत त्याने व अचलेने दोघांनी एकमेकांची वाट पहात काही काळ थांबावे, असे त्याने एकदा सुचविलेही; परंतु हा विवाहच केदारबाबूंना आता मान्य नसल्याने त्यांनी या सूचनेचा विचार केला नाही. अचलेचीही आता थांबण्याची तयारी नव्हती; कारण तसे झाल्यास पूर्वीप्रमाणे पुन्हा आपल्यावर सुरेशच्या प्रेमाचे व वडिलांच्या आग्रहाचे दडपण येणार, हे तिला स्पष्ट दिसत होते. या दोघांनाही निक्षून काही सांगावे व महिमसाठी काही काळ वाट पाहात थांबावे, हा मार्ग अचलेने अनुसरला असता तर तो फार योग्य ठरला असता; परंतु महिमवरच्या प्रेमामुळे आपल्याला अडचणीचाही संसार सुखाचा होईल अशी तिची कल्पना असावी.

परंतु हा विवाह मनाच्या साशंक व द्विधा अवस्थेत झालेला आहे. निरुत्साहाच्या वातावरणात झालेला आहे. विवाहापूर्वी सुरेश आग्रहाने तिला व केदारबाबूंना आपल्या घरी घेऊन जातो. तेव्हा तिला तेथील ऐश्वर्य व सुरेशच्या आत्याबाईंचा प्रेमळपणा पाहून वाटले असावे की, ती एका चांगल्या घरात पडली असती. महिमवरील प्रेमामुळे जरा घोटाळाच झाला होता. उलट, महिम विवेकी व साधुप्रवृत्तीचा असला तरी सुरेशने मध्ये जो घोळ निर्माण केला होता,त्यामुळे त्याचेही मन अचलेच्या प्रेमाबद्दल व निष्ठेबद्दल साशंक असणारच. वडिलांच्या आग्रहामुळे का होईना; परंतु काही काळ अचलेने सुरेशचा विचार केलेला होता याची जाणीव त्याच्या मनात राहाणार. सुरेशच्या धिसाडघाईमुळे व केदारबाबूंच्या लोभीपणामुळे त्याला स्वतःच्या विवाहाचा निर्णय वाजवीपेक्षा जास्त लवकर घेणे भाग पडले, असेही त्याला वाटत राहणार. परंतु अचलेच्या प्रेमाच्या जाणिवेमुळे त्याला थोडाफार दिलासाही मिळाला असावा. त्याची आर्थिक अडचण माहीत असतानाही तिने त्याच्याबरोबर प्रेमपूर्वक विवाह केलेला होता. त्यामुळे दारिद्र्यामुळे सुरुवातीला थोडाफार

त्रास झाला. तरी हळूहळू सर्व काही ठीक होईल असे तो मानून चालतो व अचलेच्या आग्रहाखातर हा विवाह वाजवीपेक्षा जास्त लवकर घडून येतो.

पण मग धुळीने व चिखलाने भरलेले ते महिमचे खेडे, कौंबळयाच्या छताचे घर, गावातले अशिक्षित लोक, इत्यादी गोष्टी पाहून अचलेचा संसाराचा उत्साह सुरुवातीलाच मावळतो. शिस्तप्रिय महिम कामानिमित्त दिवसभर कुठे तरी गायब असतो. पहाटे उठून तो शेतीच्या देखीरेखीसाठी जातो, सायंकाळी शिकवणीसाठी जातो. एका म्लेंच्छ मुलीला लग्न करून महिमने घरी आणलेली आहे, या विचाराने खेडयातली मंडळी इकडे फिरकत नाहीत. एका म्हाताऱ्या माणसाशी लग्न झालेली महिमची एक बालमैत्रीण मृणाल हिच्या उत्साही वर्तनामुळे चार-दोन दिवस बरे जातात; परंतु तिच्या व महिमच्या संबंधाबद्दल अचलेला शंका येऊ लागते. महिमच्या एकलकोंडया व घुम्या स्वभावामुळे कुठल्याच गोष्टीचे तो स्पष्टीकरण देत नाही. बाळबोध वळणाचा महिम, आपल्यावर आपल्या पत्नीचा विश्वास असणारच, असणेच योग्य व स्वाभाविक, असे गृहीत धरून चालला असावा. मृणालच्या म्हाताऱ्या सासूचा आजार, सासूच्या सोवळयामुळे मृणाल अचलेच्या हातचे खाऊ शकली नसती ही अडचण, अशा गोष्टींची माहितीही अचलेला नाही व ती मुद्दाम करून दिली पाहिजे याची जाणीव महिमला नाही. त्यामुळे अचलेचे दिवस दुःखा-कष्टात व गैरसमजामुळे झालेल्या मनस्तापात जातात. कुरबुरी, गैरसमज व त्यातून तणाव निर्माण होतात, व सुरेश तिथे आगंतुक पाहुणा म्हणून येताच स्फोट होतो. सुरेशच्या व्यक्तिमत्त्वात परस्पर विरोधी गुणांचा समावेश झालेला आहे. अचलेच्या विवाहामुळे त्याचा जो मनोभंग होतो, त्यामुळे हा उदार माणूस चिडून जातो. अचलेचा संसार खेडयातल्या जीवनामुळे दुःखाकष्टाचा झाला असल्यास तिला योग्य तो धडा मिळाल्यासारखे होईल असे सूडाचे विचार त्याच्या मनात येतात एक दिवस अनावर कुतूहलाने व अचलेला पाहण्याच्या अनावर भावनेने आपली बॅग घेऊन तो महिमच्या घरी जाऊन हजर होतो. त्या वेळी अचलेच्या प्रतिक्रिया योग्य प्रकारच्या झाल्या असत्या तर सुरेशच्या भावनांना योग्य ते वळण मिळण्याची शक्यता निश्चितपणे होती. कारण विवाहानंतर स्त्रीच्या मनोवृत्तीला थोडे पतिपरायण वळण मिळणे स्वाभाविक असते; परंतु अचला या वेळी अगदी वेगळया मनःस्थितीत आहे. सुरेशकडून आगीत तेल ओतले जाते. नवरा-बायकोत भांडणे लावून सुरेश पुन्हा आपल्या सरळ मनाचे व प्रेमाचे प्रदर्शन करीत राहातो. त्यामुळे अचलेचे मन त्याच्या प्रेमटपणाशी महिमच्या अलिप्ततेची तुलना करू लागते व महिमचा तिला अतिशय राग येऊ लागतो. एका घाणेरडया खेडयातल्या एका कुबट घरात आपण येऊन पडलो, याला महिम जबाबदार आहे व त्याला तर आपली पर्वा नाही, अशी अचलेची भावना होते. खेडयातल्या लोकांची शिवाशीव इत्यादी प्रकारामुळे तिचा स्वाभिमान दुखावला गेलेला असतो आणि महिमच्या संयमी आणि कर्तव्यनिष्ठ भूमिकेत तिला तिच्याबद्दलचे औदासीन्य व बेपर्वाई दिसू लागते. एक दिवस भांडण करून ती सुरेशसमोरच महिमला सांगून टाकते की, तिचे त्याच्यावर प्रेम नव्हते व ती वडिलांकडे कलकत्त्याला जाऊन राहणार होती.

त्याच रात्री महिमच्या घराला आग लागते. महिमने बांडुर्जीमहाशयांना दिलेल्या उत्तरामुळे व आगीतून अचलेच्या दागिन्यांची पेटी बाहेर काढण्यासाठी त्याने पत्करलेल्या धोक्यामुळे त्याचे आपल्यावर किती प्रेम आहे हे अचलेच्या लक्षात येते. व तिचे मन जरा सावरते. पति-पत्नीत समझोता होण्याची संधी निर्माण होते. घर जळाल्यामुळे अचलेने तूर्त सुरेशच्या सोबतीने कलकत्त्यास जाऊन आपल्या वडिलांकडे राहावे असे ठरते; परंतु तिची जीवनदृष्टि महिमच्या जीवनदृष्टिपेक्षा किती वेगळी होती हे शरदबाबूंनी जणु नकळत स्पष्ट केले आहे. महिमनेही लवकरच गाव सोडून स्थलांतर करावे व कलकत्त्याला येऊन स्थायिक व्हावे असा आग्रह अचला धरते. कलकत्त्याला येण्याची त्याची तयारी नसल्यास, दुसऱ्या एखाद्या शहरात स्थायिक व्हावे, तिचे दागिने विकून संसाराला सुरुवात करता येईल, असा प्रस्ताव त्याच वेळी अचला मांडते. विवाहानंतर पतीचे जे काही असेल ते स्वीकारण्याचा प्रयत्न करण्याऐवजी ते स्वतःच्या सोयीसाठी नाकारण्याची वृत्ति यात स्पष्ट दिसून आल्यामुळे, महिमला अर्थातच हा प्रस्ताव मान्य होत नाही. शिवाय अशा चर्चा करण्याची ही वेळ नसल्याने, संसार चालू ठेवण्यासाठी अचलेने ही जणु काही एक अट घातल्याचा भास होतो. तथापि महिम वाद घालीत नाही. मुबक शब्दांत तो एवढेच स्पष्ट करतो की, तिचे दागिने वापरणे त्याला वेगवेगळया कारणांमुळे शक्य नव्हते. तेव्हा प्रेम, अश्रू, समझोता विसरून अचला लगेच भांडायला उठते. मृणालबद्दलच्या संशयाचा उल्लेख करून ती उत्तर देते की, तिचे दागिने वापरण्याचा अधिकार खरे तर महिमला नव्हताच. थोडयाच वेळात महिम अचलेला व सुरेशला स्टेशनवर पोहोचवून देतो; परंतु मृणालचा वृद्ध नवरा गेले दहा-बारा दिवस अतिशय आजारी होता म्हणून त्याचा बराचसा वेळ तिथे जात होता, त्याच दिवशी सकाळी त्याचे प्राणोत्क्रमण झाले होते इत्यादि गोष्टी अचलेला स्पष्ट करून सांगाव्यात असे त्याला वाटत नाही. अचलेचे संशयी व असंमजस वर्तन, तिची स्वयंकेंद्रित वृत्ति पाहून मन बधिर झाल्यामुळे तो असा वागतो की, मुळातल्या त्याच्या घुम्म्या व एकलकोंडया स्वभावामुळे तो असे वागतो, हे शरदबाबूंनी स्पष्ट केलेले नाही. महिम व अचला दोघेही आपआपल्या परीने संवेदनाक्षम, अभिमानी व ताठर आहेत, त्यामुळे गैरसमज व तणाव वाढत जातात हे मात्र स्पष्ट होते.

महिमला सुरेशबाबत व अचलेला मृणालबाबत संशय येणे, त्या परिस्थितीत स्वाभाविक होते. आगीनंतरच्या चर्चेत आपल्या पुन्हा लक्षात येते की, या पति-पत्नींच्या जीवनदृष्टीतच मूलभूत फरक होता. अचलेला शहरी जीवनाची व सुखसोयींची आवड आहे. महिमला या गोष्टी आकर्षक वाटत नाहीत. तो वकील झाल्यानंतर गावात राहून शेती पहात वकिली करणार होता की, कलकत्त्यात येऊन वकिली करणार होता हे स्पष्ट नाही. वकिलीची परीक्षा पास

**महिमला सुरेशबाबत व अचलेला मृणालबाबत संशय येणे स्वाभाविकच होते.**

झाल्यानंतर त्याबाबत विचार करता येणे शक्य होते. त्यापूर्वीच त्याच्यावर संसाराची जबाबदारी पडल्याने त्याने आपल्या खेड्यात तूर्त येऊन स्थायिक होणे स्वाभाविक होते व उत्पन्न वाढविण्यासाठी शेतीकडे लक्ष देणे, शिकवणी करणे, या गोष्टीही स्वाभाविक होत्या. एवढ्या साध्या गोष्टी अचलेच्या ध्यानात ती सुविद्य असूनही येत नाहीत. कारण ती स्वयंकेंद्रित आहे आणि सुरेशच्या बाबतीत तिच्याकडून काही चुका झाल्यामुळे, ती स्वत: स्खलनशील असल्यामुळे, सर्वच माणसे अशी असतात असे ती धरून चालते व महिम-मृणाल यांच्या संबंधाबद्दल सहजपणे संशय घेऊ शकते. वास्तविक नात्याप्रमाणे मृणालही महिमची दूरची आजी लागत होती असे मृणालने तिला सांगितलेले असताना अचलेचा संशय वृथाच म्हटला पाहिजे. ती ब्राह्मण असूनही तिला सहज स्वीकारण्याचा उदारपणा मृणालने दाखविला होता ही गोष्ट अचलेच्या ध्यानात राहात नाही. मृणालची सासू आजारी होती हे तिला माहीत होते. नंतर तिचा नवराही आजारी पडतो व मृणाल वारंवार अचलेकडे येऊ शकत नाही. उलट महिमचा वेळ तिथल्या अडचणींमुळे तिकडे जाऊ लागतो. या गोष्टीबद्दल मोकळेपणाने काही चौकशी करावी असे अचलेला वाटत नाही. कारण तेवढ्यात सुरेश उपस्थित होतो. मग त्याची आणि महिमची तुलना करण्यात, सुरेशकडे ज्या सुखसोयी मिळू शकल्या असत्या त्यांची व महिमकडे असलेल्या गैरसोयींची तुलना करण्यात अचलेचे मन गुंतलेले राहते. आग लागुन घर जळल्यावर, तिची गैरसोय होऊ नये म्हणून महिम तिला कलकत्त्यास पाठवून देतो. वास्तविक तिने निघून येणेच चूक होते. पती एवढा अडचणीत असताना अन्य एखादी स्त्री त्याला सोडून बापाकडे जाऊन राहिली नसती. लवकर घर उभारणेही शक्य झाले असते. तसे करण्यासाठी आपले दागिने वापरावेत असे अन्य एखाद्या स्त्रीने म्हटले असते. तथापी मृणाल आग्रह धरते की, त्वरित महिमने गाव सोडावे व अन्य शहरात जाऊन राहण्यासाठी दागिने वापरावेत. नवे घर गावात उभारण्यासाठी, शेती सुधारण्यासाठी दागिने वापरावेत अशी सूचना तिने केली असती, तर ही बातमी लगेच गावात पसरून या म्लेंच्छ मुलीबद्दल गावातल्या लोकांचे मन लगेच चांगलेही झाले असते.

काही गोष्टी महिमने तिला नीटपणे उघड करून सांगितल्या नाहीत, याबद्दल त्याच्याकडे जसा दोष येतो त्यापेक्षा जास्त दोष अचलेकडे, परिस्थितीची माहिती करून घेण्याचा प्रयत्नच न केल्याबद्दल येतो. तिच्यासारख्या सुविद्य मुलीने, आपल्यासारख्यावर मृणालबद्दल अविश्वास दाखवावा याचा महिमच्याही मनाला मोठा धक्का बसला असला पाहिजे. त्याच्या मनावर व शरीरावर केवढा ताण पडला होता हे त्याच्याकडे पाहूनही अचलेला दिसत होते. घर जळल्यानंतर काही दिवस, तिला कलकत्त्यास वडिलांकडे पाठविणे योग्य होते. कारण खेड्यात तिची मोठी गैरसोय झाली असती व तिनेही तिथे गैरसोय निर्माण केली असती; परंतु गंमत अशी की, कलकत्त्यास आल्यावर महिमचे काही पत्र न आल्याबद्दल तिला केवळ रागच येत राहातो व मृणालबद्दल संशय येत राहातो. महिमच्या स्वास्थ्याबद्दल, प्रकृतीबद्दल, मनस्थितीबद्दल, तिला काळजी लागून राहिल्याचे दिसत नाही केदारबाबूंना अचला व सुरेश यांच्या संबंधाबद्दल संशय वाटून काळजी लागून राहाते. बरेच दिवस महिमचे पत्र आले नाही तरी या दोघांपैकी एकाच्याही मनात येत नाही की, महिमच्या गावी एक फेरफटका मारून तिकडील खबर घ्यावी. नंतर खबर मिळते की, महिम फार आजारी पडल्याने सुरेश येऊन त्याला आपल्या घरी कलकत्त्यास घेऊन गेला होता.

आता विधवा झालेली मृणाल महिमच्या शुश्रूषेसाठी कलकत्त्यास सुरेशकडे येते. तिच्या सेवाभावाचे सर्वांनाच कौतुक वाटते व तिचे आचरण प्रत्यक्ष पाहिल्यावर अचलेचेही मन तिच्याबद्दल साफ होते. या आजारामुळे महिम व अचला यांची मने जवळ येण्याची संधी निर्माण होते. कारण नेहमी अलिप्तपणे वावरणारा महिम, आता अचलेवर अवलंबून राहाण्यास शिकतो. मृणालच्या उदारपणामुळे, आपणही एखाद्या सतीप्रमाणे नवऱ्याची सेवा करावी अशी इच्छा अचलेच्या मनात थोडीफार निर्माण होते; परंतु प्रत्यक्षात फारशी सेवा तिच्याकडून होत नाही. सेवेची तिला सवय नाही. ती बहुधा आपल्याच विचारात गर्क राहाते. त्यामुळे महिमसाठी चुलीवर ठेवलेला सुरवा कधीकधी करपून जातो. त्याची अचलेला शरम वाटली; तरी तो विचार तिच्या मनात फार काळ टिकून राहात नाही. उलट ती महिमच्या खाटेजवळ रात्री वाचता वाचता झोपी गेली असताना सुरेश मध्यरात्री येऊन एकदा तिच्या अंगावर पांघरूण घालून जातो या आठवणीशी तिचे मन चाळा करीत राहाते.

पतीबद्दल फारसे आकर्षण नसलेल्या व परपुरुषाबद्दल आकर्षण असलेल्या स्त्रीप्रमाणे अचलेचे वर्तन वारंवार घडून येते. ती एक सुशिक्षित ब्राह्म महिला असल्याने तिचे सुशिक्षित, स्वतंत्र विचाराच्या स्त्रीप्रमाणे होणारे वर्तन कोणते व असतीप्रमाणे होणारे वर्तन कोणते, हे ठरविणे कधीकधी कठीण जाते. सुरेशच्या प्रेमाच्या दर्शनाने तिची अस्मिता फुलविली जाते, व त्याचे आपल्यावर प्रेम आहे ही कल्पना तिला सुखद वाटते हे तर उघडच आहे. शिवाय सुरेशची दुर्बलता व भावविवशता यामुळे तिचे स्त्री मन विरघळत राहाते. तो अनावर स्वभावाचा असल्याने कोणत्याही क्षणी कसाही वागू शकेल, याची जाणीव तिला असणारच. कदाचित या परिस्थितीतील धोक्यामुळेही तिच्या मनाला सुरेशबद्दल एक रोमँटिक आकर्षण वाटत राहिले असेल.

म्हणूनच महिमला बरोबर घेऊन ती जेव्हा हवापालटासाठी जबलपूरकडे निघते तेव्हा ती सुरेशला 'आमच्याबरोबर चला' असे स्वतःच सुचवते. हा छोटा तपशील शरदबाबूंनी फार अर्थपूर्ण बनविलेला आहे. हा तिचा मोहाचा क्षण होता व अविचाराने ती मोहाला बळी पडली, असे पुढील हकीकत लक्षात घेता म्हणावे लागेल. जबलपूरकडे महिम व अचला निघणार असतात, त्या दिवशी दिवसभर सुरेश तोंड दडवून बसलेला होता. महिमचा निरोप घ्यायला तो पुढे येत नाही. अचलेबाबत पूर्वी त्याचे जे वर्तन झाले त्याबद्दल त्याला संकोच वाटत असावा असाही याचा अर्थ होतो. किंवा महिमच्या आजारामुळे अचला व महिम हे एकमेकांच्या जवळ आले, आता जबलपूरच्या वास्तव्यात ते एकमेकांच्या अधिक जवळ येतील व अचला आपल्याला कायमची दुरावेल, या विचाराने तो उद्विग्न झाला असावा. काही का असेना, आपली मनस्थिती काबूत ठेवण्यासाठी तो दूर राहातो, यात त्याचा शहाणपणाच दिसून येतो. त्याचे जे महिमवर उपकार झाले त्याबद्दल त्याला शोधून काढून

त्याचे आभार मानण्याची व त्याचा निरोप घेण्याची जबाबदारी महिमवर होती; परंतु सुरेशचा स्वभाव माहीत असल्याने तो स्वस्थ राहातो. कदाचित त्याने हे काम पूर्वीच केले असावे, कदाचित त्याला या औपचारिकपणाची आवश्यकता वाटली नसावी, कदाचित या साठी सुरेशला मुद्दाम शोधून काढावे लागावे, हे त्याला आवडले नसावे. अशा वेळी अचलेने गप्प बसायला पाहिजे होते; परंतु तिला सौजन्याची उबळ येते व ती सुरेशच्या खोलीत निरोप घेण्यासाठी जाते व *'तुम्हीही आमच्याबरोबर चला, तुमचीही प्रकृति बरी नाही'* असे आमंत्रण स्वतःच देते. त्याच्या भकास चेहऱ्याकडे पाहून तिला गहिवर येतो. दयाबुद्धीने ती असे बोलते की क्षणिक मोहाने ? त्याच्या प्रकृतीसाठी त्यानेही आपल्याबरोबर यावे एवढीच तिची इच्छा होती, तर महिमबरोबर तिने आधी यासंबंधी चर्चा का केली नाही? सुरेशच्या सहवासाचा मोह अजून तिला होता, हेच शरदबाबूंना सूचित करावयाचे आहे. सुरेशच्या स्वभावातील चांगुलपणा त्याच्या असंयमावर मात करील व सर्वांचेच दिवस जबलपूरला चांगले जातील अशी आशा तिला वाटली काय ? काही का असेना, तिने एकटीने दिलेल्या निमंत्रणाच्या आधारे तो जेव्हा आपल्या बॅगसह स्टेशनवर आयत्या वेळी हजर होतो, तेव्हा महिमला आश्चर्य वाटते व केदारबाबूंचे मन आशंकेने बधिर होऊन जाते.

अचलेच्या ओढाळ मनाला सुरेशचे आकर्षण अजूनही वाटत होते हे लेखकाने अशा प्रकारे स्पष्ट केलेले आहे. त्यामुळे प्रवासात जेव्हा तिला फसवून सुरेश अन्यत्र घेऊन जातो तेव्हा अचलेने त्याला, आतापर्यंत दिलेले प्रोत्साहनच या गोष्टीला जबाबदार आहे, असे आपल्यालाही वाटू लागते. सुरेशचा स्वभाव माहीत असूनही महिमला न विचारता तिने सुरेशला बरोबर येण्याचे निमंत्रण दिले होते, त्यामुळे त्याला एक प्रकारे आव्हान मिळाल्यासारखे होते. प्रवासात वारंवार तो स्त्रियांच्या डब्याजवळ येऊन अचलेची चौकशी करतो. त्यामुळे तिचे मन सुखावते. अर्ध्या प्रवासानंतर महिमच्या नकळत तो तिला भलत्याच गाडीत बसवून अन्यत्र घेऊन जातो, तेव्हा ती चकित होते. त्याला दोष देऊ लागते. त्याने आपला सर्वनाश घडवून आणला असा त्याला बोल लावते. उलट अचलेच्या मोहवश स्वभावाची सुरेशलाही चीड येते. तिनेच दूर राहून मोहापासून त्याला वाचवायला नको होते का ? तो चिडून अचलेला म्हणतो, 'तू असा काही आव आणलेला आहेस की, जणू काही तुझा एकटीचाच सर्वनाश होतोय; पण ज्याला सर्वनाश म्हणता येईल ती परिस्थिती माझ्या बाबतीत कुठवर जाऊन पोहोचलेली आहे याची कल्पना आहे का तुला ? तुझ्यापाशी सौंदर्य आहे, तुझ्या डोळ्यात आसवं आहेत. बायकांच्या जातीला ज्या काही अस्त्रश-स्त्रांची जरूर असते ती सारी तुझ्या भात्यात हजर आहेत, कोणत्याही मार्गानं गेलं तरी तुला अडचण पडायची नाही; पण माझं काय होईल याची कल्पना केली आहेस का? मी पुरुषमाणूस. तुरुंगाची वाट चुकवण्यासाठी म्हणून मला स्वतःच्या हातानं स्वतःला गोळी घालून घ्यावी लागेल.' तिला आलेली शिसारी तिच्या डोळ्यात दिसते तेव्हा तो पुन्हा भडकून म्हणतो, 'मोराची पिसं लावून डोमकावळा काही मोर होत नसतो अचला. ही तुझी नजर मी ओळखतो; पण ती तुला शोभत नाही. एवढ्या तेवढ्यानं काही माणूस बाटत नाही. तुला वाटेल त्या स्टेशनवर उतरून तू चालती हो. मी एक पत्र लिहून देतो, ते महिमला दाखव तो तुला घरात घेईल. पैसे देतो ते तुझ्या बापाला दे, त्याचे तोंड बंद होईल... ' तिला त्याने अंधाऱ्या रात्री फसवून गाडी बदलायच्या वेळी महिमला सोडून दुसऱ्याच गाडीत बसवून आणले होते, *त्याबाबत तो म्हणतो, 'हा एवढा मोठा गुन्हा आहे का ?* नवऱ्याच्या घरात, त्याच्यासमोर तू उघड उघड बोलली होतीस— परपुरुषाबद्दलचं प्रेम कबूल केलं होतंस. विसरलीस का ते ? ज्या माणसानं तुझ्या घराला आग लावून, तुझ्या नवऱ्याला जाळून मारायचा घाट घातला असं तुला वाटलं होतं, त्याला बरोबर ये म्हणून तूच म्हणालीस. तो आलाही तसा. आठवतंय का तुला ? त्याच्याच आश्रयाखाली दिवस काढलेस, तिथंच चोरून रडत होतीस आणि त्यालाच बरोबर ये म्हणून तूच म्हणालीस ना ? तो आलाही तसा. आठवतंय ? त्या गुन्ह्यापेक्षा हा गुन्हा मोठा का ? आणखी देखील अशा अदलीबदलीच्या असंख्य गोष्टी आहेत. म्हणूनच ना आज मला एवढा धीर झाला ? मुळातच तू एक गणिका, म्हणूनच ना मी तुला फसवून आणलं ? तुला पुन्हा पुन्हा सांगून ठेवतो अचला, तू कुणी सती-सावित्री नाहीस. ते तेज, तो दर्प तुला शोभत नाही. '

परंतु प्रवासात जेव्हा डिहरीस्टेशनवर ती आगगाडीतून उतरते, तेव्हा तोही तिच्या मागोमाग उतरतो. मग धर्मशाळेत गेल्यावर आजारी पडतो. तेव्हा अपरिहार्यपणे तिला त्याची शुश्रूषा करावी लागते व त्याचा संबंध तिच्याशी जोडला जातो व आता यातून सुटका नाही, दुसरा मार्गच नाही, अशी तिची धारणा होते. डिहरीची नवी मैत्रीण राक्षसी व तिचे प्रेमळ स्वभावाचे वडील रामबाबू हे या दोघांना पतिपत्नी समजून त्यांच्यावर प्रेमाचा वर्षाव करतात; परंतु पापाच्या जाणिवेमुळे अचला पूर्णपणे सुरेशच्या स्वाधीन होऊ शकत नाही व केलेल्या प्रमादामुळे सुरेशचेही मन जळत राहाते. अचलाही त्याला दोष देत राहाते. या दुसऱ्या व्यक्तीमुळे आपला अधःपात झाला असे दोघेही समजतात. डिहरीला सुरेश तिच्यासाठी बंगला घेतो, घोडागाडी घेतो. ऐषारामाची, संपत्तीची उणीव नसते. या सर्व गोष्टींचा तिला मधून मधून मोहही पडतो. परंतु पापाची अंतस्थ जाणिव तिच्या मनाला शांतता लाभू देत नाही. अर्थात सुरेशच्या अनावर स्वभावाचे प्रायश्चित्त त्यालाही मिळते. मित्रद्रोहाच्या जाणिवेच्या, आणि एवढे सर्व करून अचलेचे प्रेम जिंकण्यास असमर्थ ठरल्याच्या जाणिवेच्या वणव्यात तो होरपळत राहातो. ही कथा त्याच्या मरणाबरोबरच संपू शकते.

स्वतःच्या वर्तनाचे समर्थन अचला स्वतःच करू शकत नाही. लेखकाने मात्र तिच्या वर्तनाचे स्पष्टीकरण देण्यासाठी एकदा म्हटले आहे की, ती ज्या समाजात वाढली होती ' तिथल्या प्रत्येक हालचालीत आचार–विचारात आणि आहार विहारात, विलासीपणा बाबत कुणालाच तिटकारा नव्हता. अनुरागाचेच प्रस्थ उत्तरोत्तर

**' तुला सांगतो अचला, तू कुणी सती-सावित्री नाहीस. ते तेज तुला शोभत नाही. '**

माजत असल्याचे ती पाहात आली होती. हिंदुधर्माच्या कोणत्याही आदर्श भावनेचा तिच्यावर संस्कार झालेला नव्हता. वैराग्यभावना तिला अपरिचित होती.परक्याच्या अनुकरणाने घडविलेला समाज ती जन्मादारभ्य पाहात आलेली होती. त्या समाजातील प्रत्येक स्त्री-पुरुष केवळ या संसाराच्या तहानेने व्याकुळ होऊन, दिवसेंदिवस शुष्क होऊन जात असल्याचे तिने पाहिले होते' हीच मूल्ये शिरोधार्य मानली तर एक पुरुष न आवडल्यास दुसरा शोधणे, एक स्त्री न आवडल्यास दुसरी शोधणे, याबद्दल कुणी कुणाला दोष देण्याचे कारण नाही. पण सनातन हिंदुसमाजाने हा प्रश्न वेगळया प्रकारे सोडविलेला होता. त्याबद्दल अचलेशी बोलताना मृणालने म्हटले होते, 'लग्न म्हणजे तुमच्या दृष्टीने नुसती एक सामाजिक बाब आहे. म्हणून तुम्ही या बाबतीत बऱ्यावाईटाची चर्चा करता, बुद्धिवाद करून मतामत बदलता; पण आमच्या लेखी तो धर्म आहे.लहानपणापासून आम्ही धर्म म्हणूनच पतीची भावना ग्रहण करीत आलो. हा विषय तर्कांकुतर्कांच्या अगदी पलीकडचा आहे.' अचला जेव्हा सुचविते की, माणसे धर्मसुद्धा बदलतात. तेव्हा मृणाल उत्तरते, 'बदलत असतात ती धर्माबद्दची मते; पण मूळ अस्सल वस्तू म्हणून जी आहे ती कधी बदलता येते का वहिनी ? म्हणूनच या साऱ्या लढाई–झगडयाला तोंड देऊन साऱ्या जातीत ती मूळ वस्तू एकच होऊ राहिली आहे... पतीच्या गुणदोषांची आम्ही चर्चा करतो. त्याबद्दलची आमची मतंही बदलतात. आम्ही देखील माणसंच आहोत ना ! पण पती म्हणजे आमच्या लेखी धर्म ! धर्म म्हणूनच तो नित्य. स्त्रीधर्माच्या भावनेतून जी स्त्री आपल्या पतीला अंतरात पाहायला शिकली नाही. तिच्या पायातली बेडी कायम जखडलेली असो की सुटलेली असो, स्वतःच्या सतीत्वाचं जहाज भलं मोठं आहे अशी ती खुशाल कल्पना करो, कसोटीच्या चोरवाळूत सापडल्यावर तिला बुडावंच लागेल. मग ती बुरख्याच्या आत असलो तरी बुडेल, बाहेर असली तरी बुडेल !'

## गुंतागुंत–गैरसमज

तरीही सुरेशला तोडून टाकणे अचलेला शक्य होत नाही. शेवटी हे तणावाचे जीवन त्यालाच अशक्य होते. वैराग्य त्याच्याच मनात उद्भवते. आपले मृत्युपत्र करून ठेवून प्लेगने ग्रासलेल्या माझुली या गावाच्या सेवेसाठी तो एक दिवस डॉक्टर म्हणून उपस्थित होतो व तेथे त्याचा मृत्यू ओढवतो. मृत्युशय्येवरून तो अचलेला सांगतो : 'माझे म्हणून जे काही आहे त्याच्याशी तू कुठलाच संपर्क येऊ देऊ नकोस अचला. तू निश्चिंत हो ! निर्विघ्न हो ! माझ्याशी असलेले सारे लागेबांधे सर्वतोपरी तोडून फेकून दे ! माणसाने प्रयत्न केला तर या जगातली अनेक दुःखं त्याला सहन करता येतात. मी दिलेलं दुःखही तू एके दिवशी अनायासे सहन करायला समर्थ होशील!'

मृणालच्या उपदेशामुळे व तिच्या प्रयत्नामुळे शेवटी महिम अचलेला थोडीफार क्षमा करू शकेल व बहुधा तिचा स्वीकारही करू शकेल अशी सूचना देऊन लेखकाने या कादंबरीचा शेवट केलेला आहे.

दोन तरुणांमध्ये अचलेचे मन हेलकावे खात होते, ते एखाद्या विशिष्ट क्षणापुरते नव्हे. सुरेशचा मोह तिला वारंवार पडलेला आहे, याचे कारण म्हणजे सुरेश व महिम यांच्या व्यक्तिमत्त्वामधील विरोध. जे एकात होते ते दुसऱ्यात नव्हते. म्हणून तिला जणू या दोन्ही व्यक्ती पाहिजे होत्या. महिमचे अचलेवर प्रेम असले तरी त्याची वृत्ती विरागी आहे. भावनाविष्कार, प्रेमाची ऊब मिळणे या गोष्टीची सुशिक्षित स्त्रीला तरी जरूर असते. पतीला आपण नेहमी हवेसे असतो ही कल्पना तिला सुखद वाटते. जीवनातले अद्‌भुतरम्यत्वही तरुण स्त्रीच्या मनाला मोह घालते; परंतु महिमची विचारसरणी सरळ व एकमार्गी आहे. त्याच्या धीरगंभीर वृत्तीबद्दल व संयमाबद्दल प्रथम अचलेला आकर्षण वाटले असले तरी तिच्या जीवनात लवकरच एक वैफल्याची भावना निर्माण होते. महिम संयमी व शांत वृत्तीचा आहे; परंतु जीवनसाथी म्हणून तो जी व्यक्ति निवडतो तिचे प्रेम व विश्वास तो संपादू शकत नाही. त्याचे गुण, त्याची जीवनदृष्टी अचलेच्या बुद्धीला पटतेही; परंतु त्याचे व्यक्तिमत्त्व तिच्या कल्पनाशक्तीला भारून टाकू शकत नाही. या दोघांमधील दुराव्याचे विश्लेषण करण्याचे प्रयत्न महिमने एक–दोन वेळा केले असले तरी ते फार त्रोटक आहेत. त्याचा स्वतःच्या जीवनदृष्टीवर इतका अमोघ विश्वास आहे की, तो स्वतःला तिच्या ठिकाणी कल्पून तिच्या अडचणी जाणू शकत नाही. आणि सुरेशबद्दल तिला वाटणारे आकर्षण त्याला पूर्णपणे आकलन झाल्यानंतरही, तो चर्चा न करता मुकाट्याने दुःख सहन करतो. रागावून त्याने आकांडतांडव केले असते तरीही अचलेवर अनुकूल परिणाम झाला असता; परंतु त्याच्या सहनशक्तीमुळे व औदार्यामुळे ही समस्या अधिक गुंतागुंतीची होत असते व गैरसमज वाढत जातात.

मित्राने महिमचा विश्वासघात केला असला, त्याच्या पत्नीलाच पळविले असले, तरी त्याच्या मृत्यूसमयी आवश्यक ती मदत करण्यास महिम उपस्थित आहे. कारण जीवन बदलत गेले तरी तो बदलत नाही. दुःख सहन करण्याचे सामर्थ्य त्याच्यात भरपूर प्रमाणात आहे; परंतु आपले हृदय तो कोणाला देऊ शकत नाही, हा एक प्रकारचा स्वार्थीपणाच. माणूस नुसता संयमी असून चालत नाही, तो संवेदनाक्षमही असावा लागतो. महिम विप्रदासच्या जातीचा आहे; परंतु विप्रदास अधिक बुद्धिमान व संवेदनाक्षमही आहे व प्रत्येक गोष्ट नीट योजनापूर्वक करण्याची त्याला सवय आहे. त्याने अशा परिस्थितीत अचलेशी विवाहच केला नसता ! शिवाय इतर अनेक गुणांमुळे विप्रदासचे व्यक्तिमत्त्व उत्तुंग आहे, तसे महिमचे नाही. सुरेशच्या मृत्यूनंतरही महिम अचलेशी चर्चा करीत नाही. नुसताच निघून जातो. तूर्त तरी त्याची भूमिका अशी दिसते. सुरेश पहिल्यापासून होता तसाच होता. बदलण्यासारखा नव्हता. अचला एक स्त्री होती व म्हणूनच जे घडले त्याची जबाबदारी तिच्यावर जास्त पडत होती. तिनेच सुरेशपासून दूर राहावयास पाहिजे होते.

सुरेशची धाडसी वृत्ती, श्रीमंती, चटकन निर्णय घेण्याची सवय, उत्कटता या गुणांचे अचलेला कौतुक वाटले असले पाहिजे. महिमच्या थंडपणामुळे तिच्या मनाची जी भूक अतृप्त राहिली होती, तिची पूर्तता सुरेशच्या व्यक्तिमत्त्वामुळे होते. तिला वाटलेल्या या आकर्षणाचा फायदा सुरेश आपल्या अविवेकी, अनावर वृत्तीमुळे उठवू शकतो. मनात आधी ठरवून तो वाईट वागतो असेही दिसत नाही. आगगाडीतून अचलेला चुकवून अन्यत्र नेणे ही क्रिया आधी

ठरवून झालेली नाही. स्वतःची खोटी समर्थने करण्याचीही त्याला सवय दिसत नाही. पश्चात्ताप झाला तरी तो पश्चात्तापाचा मोठा देखावा करीत नाही. 'मी आहे हा असा आहे' अशी त्याची वृत्ती आहे. मरतानाही तो अचलेला सांगतो की, स्वतःला शिक्षा म्हणून त्याने आपण होऊन मृत्यू पत्करलेला नव्हता. जगण्याची त्याला इच्छा होती; परंतु एक डॉक्टर म्हणून त्याला कळले होते की, आता ते शक्य नव्हते. शेवटी त्याच्याजवळ त्याचा परम मित्र महिम व त्याची प्रेयसी अचला हे दोघे उभे असूनही तो एकाकीच आहे. त्याच्या जीवनातल्या या एकाकीपणातूनच त्याला परोपकाराची तीव्र इच्छा स्फुरत असावी. महिमची जीवनदृष्टी त्याला मान्य नसली किंवा पचण्यासारखी नसली तरी महिमवर त्याचा मोठा विश्वास आहे व आपल्या संपत्तीची सर्व व्यवस्था त्याने शेवटी महिमवर सोपविली आहे.

## स्वातंत्र्याचा दुरुपयोग

या कादंबरीतील समस्येत गुंतलेल्या सुरेश, महिम, अचला, केदारबाबू इत्यादी प्रत्येक पात्राची भूमिका लेखकाने बहुधा सूचकतेने विशद केलेली आहे; परंतु त्यामुळे कादंबरीतील समस्या जीवनाइतकीच गुंतागुंतीची होते. कारण सर्वच पात्रांना आपण समजू शकतो व सर्वांचेच वर्तन आपल्याला थोडेफार दोषार्ह व थोडेफार समर्थनीय वाटते. केदारबाबू ब्राह्म असले तरी ते सुखवस्तूपणे जगू इच्छिणारे व त्यासाठी कर्जही काढणारे एक सामान्य गृहस्थ आहेत. मुलीचा विवाह संपन्न व्यक्तीशी व्हावा असे सर्वच वधूपित्यांना वाटत असते. महिमशी तुलना करता सुरेश हा जावई म्हणून त्यांना अधिक पसंत असला तरी विवाहानंतरची अचलेची व सुरेशची घसट त्यांना मुळीच आवडत नाही व ते सुरेशचा स्पष्ट शब्दात निषेधही करतात. सुरेश व अचला परागंदा झाल्यावर हा म्हातारा मृणालच्या वात्सल्ययुक्त प्रेमामुळे एक नवे जीवन जगतो व सर्वांना क्षमा करण्यास शिकतो. तथापि केदारबाबूंच्या आग्रहामुळेच प्रथम अचला सुरेशचा विशिष्ट दृष्टिकोणातून विचार करू लागते हेही खरे आहे. अचलेने व केदारबाबूंनी सुरेशबद्दलचा आपला निर्णय योग्य वेळीच स्पष्टपणे महिमला कळवला असता तर बहुधा त्याने तो निर्णय मुकाट्याने मान्य केला असता व पुन्हा अचलेची भेट घेतली नसती असाही संभव दिसतो. गैरसमज वाढविण्यासाठी व सुरेशच्या स्वभावावर प्रकाश टाकण्यासाठी सुरेशचा महिमकडला मुक्कामही शरदबाबूंनी मुद्दाम योजलेला आहे; परंतु खरी समस्या या पतिपत्नींच्या संस्कारांतून, स्वभावांतून व जीवनकल्पनांतून उद्‌भवते, हे लेखकाच्या मांडणीमधून स्पष्ट व्हावे. प्रेम करताना ज्या अडचणी जाणवत नाहीत त्या विवाहानंतर संसारांत जाणवतात, ज्या गोष्टींशी जुळवून घेऊ असे आधी वाटते त्या गोष्टींशी प्रत्यक्षात जुळवून घेता येत नाही.

पतिपत्नींतील संघर्षाचा उत्कर्षबिंदू साधण्यासाठी सुरेशचा महिमकडील मुक्काम, नंतर जबलपूरचे निमंत्रण, ही कारणे शरदबाबूंनी कल्पिली. त्यामुळे अचलेसारख्या स्त्रीच्या मनाचा ओढाळपणा हा या कथेचा मुख्य विषय बनत जातो. अर्थात त्याची बीजे आधीपासून पेरली गेलेली आहेत. वेगवेगळ्या पात्रांकडे जो दोष येतो तो कमी करण्याचा शरदबाबूंनी कितीही प्रयत्न केलेला असला तरी मूळ समस्या कायम राहाते. अचला अनुभवी असल्याने तिच्याबद्दल आपल्याला कितीही सहानुभूति वाटली तरी अखेर दोष प्रामुख्याने तिच्याकडेच येतो. सुरेशकडे पुष्कळच दोष येतो; परंतु त्याचा जन्मदत्त स्वभाव हे त्याचे समर्थन आहे. त्याचा स्वभाव माहीत असून अचलेने प्रथमपासून त्याच्याशी 'फ्लर्टिंग' केलेले आहे, निदान त्याला तसे वाटलेले आहे. म्हणजेच, महिम–अचला यासारख्या व्यक्ति विवाहाने एकत्र आल्या व त्यांना सुरेशसारखा मित्र असला तर जो धोका संभवतो तो शरद्‌बाबूंनी चित्रित केलेला आहे.

जीवनात असे धोके निर्माण होत असल्याने ही कथा विशिष्ट व्यक्तींची राहात नाही, तर प्रातिनिधिक बनते. परिस्थितीची दडपणे व त्यावर मात करू इच्छिणारी माणसाची स्वतंत्र इच्छाशक्ति यांची ही कथा बनते. कोणत्याच प्रकारची मूल्ये जिच्या मनात सुरुवातीला पक्की भिनलेली नाहीत अशा प्रकारची अचला ही एक सामान्य सुशिक्षित मुलगी आहे. शहरी वातावरणात वाढल्याने, सामाजिक किंवा घरगुती दबावाच्या अभावामुळे, ती स्वतंत्र आहे. म्हणजेच निवड करण्याचे स्वातंत्र्य तिला आहे. ती महिमची निवड करते; परंतु या निवडीबरोबर येणाऱ्या जबाबदाऱ्यांची पुरेशी जाणीव तिला दिसत नाही. विवाहानंतर ज्या अडचणी उद्‌भवतात त्यामुळे सुरेशसारख्या माणसाचे प्रेम आपल्याला मिळू शकते या जाणीवेमुळे महिनाभरातच ती आपल्या नवऱ्याला सांगू शकते की, तिचे प्रेम त्याच्यावर नव्हते व म्हणून ती त्याला सोडून देण्याच्या विचारात होती. माणसाला मिळालेल्या स्वातंत्र्याचा आपल्या दुर्बलतेमुळे माणूस योग्य उपयोग करीत नाही, ही या कादंबरीची मध्यवर्ती कल्पना आहे, म्हणून हा विषय स्थलकालातीत आहे. हक्कांची जाणीव व कर्तव्यांची जाणीव यातील विरोध इथे चित्रित केलेला आहे. त्या त्या वेळी निर्णय करण्याचा अधिकार जिने वापरला, परंतु जी योग्य निर्णयाप्रत येऊ शकली नाही, अशा तरुणीची ही कथा आहे.

निर्णयाचा अधिकार माणसाने अनुभवाने मिळवावा लागतो. आपली पात्रता आधी सिद्ध करून मग मिळवावा लागतो. महिम किंवा केदारबाबूंचा विचार न घेता, सुरेशला जबलपूरला येण्याचे निमंत्रण देण्याचा निर्णय अचलेने घेतला. हा विचारपूर्वक घेतलेला निर्णय नव्हता. तिने हे निमंत्रण देण्यात आपले व्यक्तिगत स्वातंत्र्य वापरले व त्याचे परिणाम लगेच तिला भोगावे लागले. प्रवासात भेटलेली राक्षसी अचलेला पतीसह डिहरीला येऊन राहण्याचे निमंत्रण एकटी आपल्या पतीला न विचारता देते तेव्हा अचलेला आश्चर्य वाटते. अचला हे विसरते की, राक्षसीने गेल्या काही वर्षात आपल्या संसाराच्या पद्धतीने आपल्या पतीचा विश्वास संपादन केला असला पाहिजे. बहुधा, हिंदु स्त्रिया म्हणजे गुलाम अशी या ब्राह्म मुलीची कल्पना होती. पुढे घडलेल्या घटनांच्या संदर्भात या लहानशा प्रसंगाला एक उपरोधिक अर्थ प्राप्त होतो. कारण हिंदू स्त्री एक गुलाम असते असे समजणाऱ्या अचलेने शेवटी आपल्या स्वातंत्र्याच्या अहंभावाने व फाजील आत्मविश्वासाने वागून चुका करून स्वतःचे जीवन बरबाद करून घेतलेले आहे. जीवनात माणसाने कुठे तरी श्रद्धा ठेवणे, कुठली तरी मूल्ये मानणे, आवश्यक असते. सुरेश मोहवश होऊन कसाही वागला तरी चांगुलपणावर त्याची श्रद्धा आहे, मित्रप्रेमावर आहे, परोपकारावर आहे. कोवळ्या वयात माणसाच्या मनावर जे बरे-वाईट दिसेल त्याचा परिणाम होतो. त्यामुळे महिमचे उच्च विचार व त्याचे धीर-गंभीर वर्तन यांचा प्रभाव पडून अचला त्याच्याकडे आकृष्ट झाली; परंतु स्वाभिमानीपणा, सुखलोलुपतेच्या सवयी, इत्यादी दोषांमुळे ती चुका करीत जाते. 'शेवटचा परिचय' मधील सवितेशी तिचे पुष्कळच साम्य आहे. अर्थात तिला जे भोगावे लागते त्याची जबाबदारी सुरेश व महिम यांजवरही पडते. झालेल्या गोष्टीबद्दल कुणावर किती जबाबदारी टाकावी हे आपल्याला निश्चितपणे ठरविता येत नाही. शरदबाबू हे एक महान वास्तवदर्शी व मानवी मनाची गूढता पूर्णपणे जाणणारे कलावंत होते याचेच हे गमक आहे. □

( पुढील अंकात 'शेषप्रश्न' )

## रामायणातील संस्कृती संघर्ष

# वाचकाच्या मनात संभ्रम निर्माण करून त्याला भांबावून टाकण्याच्या हेतूनेच हे पुस्तक लिहिले गेले आहे !

गेली सुमारे दोन हजार वर्षे रामकथा भारतीय जीवन व्यापून राहिली आहे. वैयक्तिक आणि सार्वजनिक जीवनातील सर्वोच्च नैतिक आदर्श या कथेने भारतीयांना दिले. त्यामुळेच विविध राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक आक्रमणांना यशस्वीपणे तोंड देऊन विसाव्या शतकाच्या अखेरीसही रामकथा भारतीयांच्या सांस्कृतिक आणि अध्यात्मिक जीवनाचा अभंग भाग बनून राहिली आहे.

अर्थात विद्वान संशोधक आणि चिकित्सकांनाही या कथेने सतत आव्हान दिले आहे. रामकथेचा विविध बाजूंनी अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न अनेक भारतीय व परदेशी विद्वानांनी केला. प्रा. अरुण कांबळे यांचे 'रामायणातील संस्कृतिसंघर्ष' हे पुस्तक त्यातूनच जन्माला आले. पण रामायणाच्या अभ्यासकांनी किंवा समीक्षकांनी या पुस्तकाची योग्य प्रकारे दखल घेतली नाही, अशी तक्रार प्रा. कांबळे यांच्या वर्तुळातून केली जाते. म्हणूनच काहीशा उशीराने पण पुस्तकातील सर्व मुद्द्यांची तपशीलवार नोंद घेण्याचा प्रयत्न या ठिकाणी केला आहे. प्रामाणिक चिकित्सकाची भूमिका ठेवून रामकथेचा अन्वयार्थ लावला जावा, एवढाच आग्रह आहे.

सतीश कामत

**प्रा.** अरुण कांबळे यांचे 'रामायणातील संस्कृतिसंघर्ष' हे पुस्तक सुमारे वर्षापूर्वी हातात पडले. जेमतेम ऐंशी पानांच्या या पुस्तकाविषयी आधीच थोडीशी हवा निर्माण झालेली होती. पुस्तकाच्या प्रसिद्धीनंतर मोठीच घुमाळी माजली. अंधपणाने संस्कृतीचा पाठपुरावा जतन करणाऱ्यांनी पुस्तक फारसं न वाचताच रद्दबातल ठरवलं, तर त्याची गंभीर दखल घेतल्याचा आव आणणाऱ्या मंडळींनी आपलं पुरोगामी ब्रह्मचर्य सिद्ध करण्याची संधी, या दृष्टिकोनातूनच पुस्तकाची मलावण केली. पण प्रा. कांबळे यांनी एकापाठोपाठ एक काढलेले निष्कर्ष मूळ वाल्मिकी रामायणातील तपशिलाशी संदर्भासह ताडून पाहण्याचा प्रयत्न फारसा होऊ शकला नाही. कोणी तसा केलाच तर या रणधुमाळीत त्याकडे कोणी फारसं लक्षही दिलं नाही. त्यामुळेच ही धूळ खाली बसल्यावर शांतपणे या पुस्तकाविषयी विचार करावा, चर्चा करायी या हेतूने हा लेखनप्रपंच करत आहे. यामध्ये रामाची आणि रामभक्तांची किंवा रावणाची आणि रावणभक्तांची वकिली करण्याचा उद्देश नाही; पण प्रा. कांबळे यांनी काढलेले निष्कर्ष मूळ रामकथेशी कितपत सुसंगत आणि विसंगत आहेत, ते मांडण्याचा इथे प्रयत्न आहे.

अर्थात मूळ विषयाला हात घालण्यापूर्वी हे स्पष्ट केलं पाहिजे की प्रा. कांबळे यांनी त्यांच्या पुस्तकातील दिलेले वाल्मिकी रामायणातील संदर्भ कोणत्या वाल्मिकी रामायणाच्या आधारे दिले, ते कुठेही स्पष्ट केलेलं नाही. कारण मूळ वाल्मिकी रामायणात सुद्धा मान्यता प्राप्त तीन पाठ आहेत. १) दाक्षिणात्य २) गौडीय आणि ३) पश्चिमोत्तरीय. त्यामध्ये स्वाभाविकच पाठभेद आहेत. प्रा. कांबळे यांनी त्यांच्या पुस्तकात दिलेले संदर्भ या तिन्ही पाठींशी पडताळून पाहिले असता दाक्षिणात्य प्रतीच्या आधारे त्यांनी हे विवेचन केले असावे, असा अंदाज बांधता येतो. त्यामुळे येथे मी दिलेले संदर्भही याच प्रतीच्या आधारे आहेत.

रामायणातील संस्कृति–संघर्षाबाबतचा प्रा. कांबळे यांचा विचार या चर्चेमध्ये सर्वांत महत्त्वाचा आणि मूलभूत असला तरी त्यापूर्वी दोन–तीन लहान मुद्द्यांचा परामर्ष घेणं आवश्यक वाटतं. त्यापैकी पहिला मुद्दा म्हणजे, रामायणातल्या राम या व्यक्तिरेखेविषयी प्रा. कांबळे यांनी दोन महत्त्वाचे निष्कर्ष काढले आहेत. १) रामाला सीतेव्यतिरिक्त इतरही अनेक स्त्रिया होत्या. २) राम हा पित्याची अवहेलना, टवाळी करणारा ढोंगी पितृभक्त होता. यापैकी पहिल्या निष्कर्षाच्या पुराव्यार्थ प्रा. कांबळे यांनी रामायणातल्या उत्तरकांडातील सहा (सर्ग ४२) आणि अयोध्यकांडातील दोन (सर्ग ३६) असे आठ श्लोक दिले आहेत. तसेच अयोध्याकांडातील एका श्लोकाचा फक्त उत्तरार्ध (सर्ग ८–श्लोक १२) दिला आहे. यापैकी उत्तर-

कांडातील बेचाळिसाव्या सर्गामध्ये, रावण-वधानंतर राम सीतेसह अशोकवनात बसतो, सीतेसह मदिराप्राशन आणि मांसाहार करतो, गायन-नृत्यनिपुण अप्सरा-किन्नर त्याच्यापुढे दारू पिऊन, धुंद होऊन गाऊ-नाचू लागतात असं सर्व रोमँटिक वर्णन आहे. प्रा. कांबळे यांनी त्यांच्या पुस्तकात हाच संदर्भ दिला आहे. रामाच्या भोवती सौंदर्यवान स्त्रिया नृत्य करत, हे यावरून सिद्ध होते; पण त्यावरून रामाला सीतेव्यतिरिक्त इतरही अनेक स्त्रिया होत्या, असा निष्कर्ष कसा निघू शकतो ? फार तर एवढेच म्हणता येईल की, सीतेव्यतिरिक्त इतरही स्त्रियांचं सौंदर्य आणि कलागुण पाहण्यात राम दंग होत असे. अशा स्त्रियांना तो दागिने भेट म्हणून देऊन खूष करत असे. (वाल्मिकी रामायणात तसा संदर्भ आहे.) त्यावरून तो बऱ्यापैकी रसिक माणूस असला पाहिजे.

अयोध्याकांडातलेही दोन श्लोक (सर्ग ३६) प्रा. कांबळे यांनी रामाच्या बहुपत्निकत्वाचा पुरावा म्हणून दिले आहेत. हा संदर्भ असा आहे की, कैकेयीने मागितलेले वर पूर्ण करण्यासाठी रामाला वनवासात पाठवण्याचा प्रसंग दशरथावर येतो. रामाला राजपदी बसवण्याचं त्याचं स्वप्न धुळीला मिळतं. आपल्या पूर्वी दिलेल्या वचनामुळे रामाला प्रदीर्घ वनवास भोगावा लागणार असल्याची बोच त्याला अधिकच अस्वस्थ करते. तेव्हा वनवासातलं रामाचं जीवन तरी सुसह्य करावं, असं वाटल्यामुळे या ठिकाणी दशरथ सुमंताला सांगतो की, 'रत्नांनी संपूर्ण भरलेली चतुरंग सेना रामाबरोबर पाठवण्यासाठी तयार कर. चतुरपणे बोलणाऱ्या सुंदर स्त्रिया आणि धनवान वाणीपुत्रांनी रामाच्या मोठ्या पसरलेल्या सैन्यांना शोभा आणावी. या स्त्रिया म्हणजे वेश्याच होत्या, असं अनुमान प्रा. कांबळे यांनी काढलं आहे. ते योग्य मानलं तरी पुढं असा प्रश्न निर्माण होतो की, या स्त्रिया खरंच रामाबरोबर पाठवण्यात आल्या का ? अयोध्याकांडातच ३७ व्या सर्गामध्ये स्वतः रामाने हा सर्व लवाजमा नाकारल्याचा उल्लेख आहे (श्लोक १ ते ५) प्रा. कांबळे यांच्या नजरेतून हा तपशील कसा सुटला ?

याहूनही सर्वांत महत्त्वाचं म्हणजे, रामाला वनवासात धाडणाऱ्या कैकेयीनेच रामाला एकपत्नीव्रताचं – प्रशस्तिपत्रक दिलं आहे. अयोध्याकांडात ७२ व्या सर्गामध्ये रामाला वनवासात पाठवण्याचे कारण कैकेयी भरताला सांगते. त्या वेळी ती म्हणते की, रामाने कोणाही ब्राह्मणाचं धन लुटलं नाही. कोणाही निरपराध धनवान किंवा दरिद्री माणसाची हत्या त्याने केली नाही. परस्त्रीकडे तर राम ढुंकूनही पाहात नाही; पण मुला, मीच रामाला अभिषेक होणार असे ऐकून तुझ्या पित्याकडे राज्याची आणि रामाला राज्यातून घालवून देण्याची मागणी केली; तुझ्या पित्याने आपल्या नेहमीच्या वृत्तीला अनुसरून मी मागितले तसे केले. (श्लोक ४५ ते ४८)

या पार्श्वभूमीवर प्रा. कांबळे यांच्या मताला पुष्टी केवळ एकाच ठिकाणी मिळू शकते. ती म्हणजे, अयोध्याकांडातल्या आठव्या सर्गातील बारावा श्लोक. रामाला राज्याभिषेक होणार, असे कळल्यावर मंथरा कैकेयीला म्हणते की, रामाच्या अनेक स्त्रियांना आता आनंद होईल. (द्रष्टा खलु भविष्यन्ति रामस्य परमाः स्त्रियः । ) रामाची समर्थकमंडळी या 'परमाः स्त्रियः'चा अर्थ 'रामपत्नीच्या (सीतेच्या) श्रेष्ठ सख्या' असाही करतात; पण तो योग्य वाटत नाही. त्यामुळे प्रा. कांबळे यांचा रामाच्या बहुपत्नीकत्वाचा मुद्दा मान्य करायचा असेल तर तो वाल्मीकी रामायणातील या एकाच ओळीच्या आधारे करावा लागेल. बाकी, राम युवराज असताना त्याच्या सेवेसाठी सुंदर दासी असत, किंवा उत्तम दागिने घातलेल्या स्त्रियांच्या हातांचा स्पर्श रामाच्या हाताला झाला होता, अशी विखुरलेली वाक्ये एकत्र करून फारसं काहीच हाती लागत नाही.

## पूर्वार्ध गाळून उत्तरार्ध

याव्यतिरिक्त इतर काही विद्वानमंडळी आणि 'पउमचरिय', 'गुणभद्रकृत', 'उत्तरपुराण', 'भुषुण्डी रामायण' 'बृहत्कोशलखंड' यासारख्या ग्रंथांचा आधार देऊनही प्रा. कांबळे यांनी रामाचं बहुपत्नीकत्व सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे; पण वाल्मीकी-रामायण हा प्रमाणभूत ग्रंथ वगळून इतर ग्रंथांमध्ये रामाविषयी कोणी काय म्हटलं आहे, हे सांगून सिद्धांत उभा राहू शकत नाही. न्यायशास्त्राच्या भाषेत ज्याला 'अंतर्गत पुरावा' (Internal evidence) म्हणतात तोच अशा सिद्धांताचा मुख्य आधार असतो.

इथे जाता जाता हेही नमूद केलं पाहिजे की, केवळ याच संदर्भात नव्हे, तर 'रामायणातील संस्कृति-संघर्ष' हा आपला मुख्य सिद्धांत सिद्ध करतानाही प्रा. कांबळे यांनी या इतर विद्वानमंडळींचा आणि ग्रंथांचाच प्रामुख्याने आधार घेतला आहे. त्यांची निवड मोठी हुषारीची, सामान्यांना दिपवून टाकणारी असली तरी मूळ वाल्मीकी-रामायणाच्या आधारे या संस्कृति-संघर्षाचा शोध घेऊ पाहणाऱ्यांना ती उपयोगी ठरत नाही.

रामाची पितृभक्ती दांभिक असल्याचा आरोप प्रा. कांबळे यांनी केला आहे. त्याच्या आधारार्थ त्यांनी अयोध्याकांडातले (सहा ते दहा आणि तेरा-चौदा) साडेसहा श्लोक उद्धृत केले आहेत. या ठिकाणी वनवासातली पहिली रात्र घालवताना, राम-लक्ष्मणाजवळ कैकेयीने मागितलेले वर, ते पूर्ण करण्यासाठी दशरथाला झालेल्या वेदना आणि राम-लक्ष्मणाच्या नशिबी आलेला वनवास, या सर्व नुकत्याच घडून गेलेल्या प्रसंगांविषयी आपल्या प्रतिक्रिया नोंदवत आहे. स्वाभाविकच इथे रामाच्या वक्तव्यावर बुद्धिनिष्ठतेपेक्षा भावनिकतेचा पगडा जास्त आहे. तरीही त्याचं पहिलं वाक्य असं आहे की, लक्ष्मणा, आज महाराजांना झोप लागणं खरोखर कठीण आहे. प्रा. कांबळे यांनी श्लोक उद्धृत करताना मात्र अयोध्याकांडातल्या सहाव्या श्लोकाचा हा पूर्वार्ध वगळला आहे आणि फक्त 'कृतकामा तु कैकेयी तुष्टा भवतुमर्हति ।– इच्छा पूर्ण झाल्यामुळे कैकेयी मात्र आनंदित झाली असेल !– हा उत्तरार्ध घेतला आहे. खरं म्हणजे, हा पूर्वार्ध वगळण्याचं कारण नव्हतं; पण त्यामुळं कदाचित, दशरथाच्या मानसिक अवस्थेबद्दल रामाला असलेली सहानुभूती व्यक्त झाली असती आणि मग पुढला सगळा भाग त्याच सहानुभूतीच्या दृष्टिकोनातून रामाच्या तोंडून बाहेर पडला असल्याचं वाचकांच्या लक्षात आलं असतं, अशी भीती प्रा. कांबळे यांना वाटली असावी. त्यांनी हा श्लोक संपूर्णच गाळला असता तर शंका आली नसती. कारण त्यांनी दिलेल्या या उत्तरार्धामुळंही रामाच्या पितृभक्तीवर कोणताच प्रकाश पडत नाही. बहुधा, याच दृष्टिकोनातून त्यांनी या मालिकेतील (श्लोक सहा ते चौदा) ११ आणि १२ हे भरताविषयी

वक्तव्य असलेले श्लोक गाळलेही आहेत. या पार्श्वभूमीवर या सहाव्या श्लोकाचा मात्र पूर्वार्ध न देता फक्त उत्तरार्ध देण्यामागे निश्चित काही तरी हेतू असला पाहिजे, अशी शंकेला जागा निर्माण होते,

इथे राम दशरथाला कैकेयीच्या आहारी गेलेला आणि बुद्धिभ्रंश झालेला कामात्मा म्हणतो हे खरं आहे. प्रा. कांबळे यांनी ते मराठी-मध्ये 'बाईलवेडा' किंवा म्हातारचळ लागलेला अशी विशेषणं लावून आणखी खुलवलं आहे; पण हे भाषांतर स्वच्छ आणि शुद्ध नाही. स्वतःची मतं आणि भावना त्यावर लादण्याचा प्रयत्न इथे आहे. कारण या दोन विशेषणांचा प्रा. कांबळे यांनी उद्धृत केलेल्या साडेसहा श्लोकांमध्ये कुठेही उल्लेख नाही. उलट 'इदं व्यसन-मालाक्य राज्ञश्च मतिविभ्रमम् । काम एवार्थ धर्माभ्यां गरीयामिती मे मतिः ।। या श्लोकाचा अर्थ त्यांनी, 'दशरथाने अर्थ आणि धर्म सोडले असून एका कामाचाच अवलंब केला आहे, असा दिला आहे. संस्कृतच्या जाणकारांच्या लक्षात हा विपर्यास सहज येईल. या श्लोकाचा साधा-सरळ अर्थ असा आहे की, महाराजांवर आलेलं हे संकट आणि त्यांचा झालेला मतिभ्रंश लक्षात घेता श्रेष्ठ अर्थ आणि धर्मापेक्षा काम नेहमीच जास्त बलवान ठरतो, असं मला वाटतं.

बाकी रामाच्या पितृभक्तीचे पुरावे इथे देण्याची गरज नाही. ते सर्वज्ञात आहेत. प्रा. कांबळे यांचं म्हणणं ते बेगडी, दिखाऊ आहे, असं होतं. वर केलेल्या चर्चेवरून प्रा. कांबळे यांचंच या संदर्भातील लेखन काहीसं दिशाभूल करणारं असल्याचं उघड होईल.

## रामाने वाली-वध का केला ?

वाली आणि सुग्रीव यांच्या युद्धामध्ये रामाने विनाकारण हस्तक्षेप करून वालीला ठार मारलं, वाली शाखा–मृग (वानर । पशू) होता म्हणून ठार मारलं, असं प्रतिपादन प्रा. कांबळे यांनी वाली–वधाच्या संदर्भात केलं असून पुढं अशीही पुष्टी जोडली आहे की, वालीला पशू म्हणून संबोधणारा राम इथल्या आदिम जमातीची – शूद्रांचीच निर्भर्त्सना करत होता. स्वतः अधर्मातून (वालीवधाच्या) दोषमुक्त होण्यासाठी वालीलाच अपराधी ठरवत होता. अपराध कोणता, तर तू शाखा–मृग आहेस हा ! उच्च वर्णीयांची शूद्रांकडे पाहण्याची दृष्टीच रामाच्या या कथनातून व्यक्त झाली आहे.

प्रा. कांबळे यांचं 'संस्कृती–संघर्षा'चं तत्त्वज्ञान इथूनच सुरू होतं. वाल्मीकि रामायणातल्या किष्किंधाकांडामध्ये १४ ते १८ या पाच सर्गामध्ये मिळून वाली–वधाची संपूर्ण कथा आहे. त्यांपैकी १७ व्या सर्गातले सहा श्लोक आणि अठराव्या सर्गातले फक्त दोन श्लोक देऊन प्रा. कांबळे यांनी अक्षरशः धूळफेक केली आहे. संशोधक विचारवंताच्या भूमिकेपासून ते हळूहळू दूर जात असून त्यांचं लेखन प्रचारी राजकीय स्वरूपाचं होऊ लागल्याची जाणीव इथे होते. कारण त्यांनी सतराव्या सर्गातले उद्धृत केलेले सहा श्लोक योग्य आहेत. झाडाआडून रामाने बाण मारल्यामुळे घायाळ झालेला वाली अति-शय जळजळीत शब्दांत रामाला त्याच्या या कृत्याबद्दल इथे जाब विचारत आहे. खरं म्हणजे, प्रा. कांबळे यांनी फक्त सहाच श्लोक उद्धृत केले. प्रत्यक्षात सुमारे तीस-पस्तीस श्लोकांमध्ये मिळून वालीचं हे वक्तव्य आहे. त्याच्या अखेरीस वाली रामाला आपल्या वधाचं कारण विचारतो. प्रा. कांबळे यांनी ते नोंदवलं आहे आणि पुढे लगेच अठराव्या सर्गातले फक्त ३९ व ४० हे दोन श्लोक उद्-धृत करून असं म्हटलं आहे की, वालीनं वधाचं कारण विचारलं तेव्हा राम त्याला म्हणाला की. मांसाहारी मनुष्य, सावध नसलेल्या, पळणाऱ्या पशूला घायाळ करतो. असे केल्याने त्याला दोष लागत नाही. शिकार खेळणं हा त्याचा धर्म आहे. (श्लोक ३९) हे वानरा, धर्मज्ञ राजर्षी मृगया करतात. ते केल्याने त्यांना पाप लागत नाही. तू सुद्धा शाखामृग असल्याने माझ्याशी युद्ध करत होतास की नाही, हा प्रश्नच उपस्थित होत नाही. तुला मारण्याचा मला अधिकार आहे.' (श्लोक ४०)

आता गंमत अशी आहे की, या दोन श्लोकांच्या अलीकडला आणि पलीकडला असा अठराव्या सर्गाचा उर्वरित सर्व भाग प्रा. कांबळे यांनी कुठे विचारात घेतलेलाच नाही. सतराव्या सर्गाच्या अखेरीस वाली त्याच्या वधाचं रामाला कारण विचारतो. आणि अठराव्या सर्गाची सुरुवात रामाच्या या संदर्भातल्या प्रदीर्घ स्पष्टी-करणाने होते. हे स्पष्टीकरण सुमारे ४२ श्लोकांत आहे, मग प्रा. कांबळे यांनी न दिलेल्या ४० श्लोकांमध्ये काय आहे ? इथे राम वालीला म्हणतो की, केवळ रोषामुळे तू माझी निर्भर्त्सना करणे योग्य नाही. मी तुला का मारले त्याचे कारण लक्षात घे. सनातन चालत आलेल्या धर्माचा त्याग करून भावाच्या बायकोशी तू रत होतोस. हा महात्मा सुग्रीव जिवंत आहे त्याच्या रुमेशी तू रत होतोस म्हणजे सुनेशी पापकर्म करतोस. तेव्हा वानरा, तू असा धर्मापासून भ्रष्ट झालास, वाटेल तसा वागू लागलास, भावाच्या पत्नीशी तू लगट केलीस, त्याला हाच दंड सांगितला आहे. वानरराजा, लोकविरुद्ध, लोका-चाराला सोडून वागणाऱ्याला शिक्षा केल्यावाचून दुसरा निग्रह मला दिसत नाही. मी क्षत्रियकुलात जन्मलो आहे. असले पाप मी सहन करू शकत नाही. सख्ख्या बहिणीशी किंवा धाकट्या भावाच्या बायकोशी जो मनुष्य कामवासनेने व्यवहार करतो त्याला वध हाच दंड सांगितला आहे. (श्लोक १७ ते २३)

अशाच पद्धतीने राम आणखीही बरंच बोलतो. त्यानंतर पुन्हा वाली त्याला उत्तर देतो. रामानं वधामागचं दिलेलं स्पष्टीकरण तो पूर्णपणे मान्य करतो आणि आधीच्या वक्तव्याबद्दल रामाची माफी मागतो. ( सर्ग १८, श्लोक ४४ ते ४९)

एखाद्या श्लोकाचा फक्त पूर्वार्ध गाळणाऱ्या किंवा ओळीने आठ श्लोक घेताना मधलेच दोन गाळून टाकणाऱ्या प्रा. कांबळे यांना हे जवळजवळ पन्नास श्लोक लक्षातच कसे आले नाहीत, याचं खरो-खरच आश्चर्य वाटतं. म्हणजे असं की, मांडणीच्या बाबतीत इतका चोखंदळपणा, नीर–क्षीरविवेक दाखवणाऱ्या चिकित्सकाकडून तरी असं सुमारे चाळीस–पन्नास श्लोकांच्या सबंध गठ्ठ्याकडेच दुर्लक्ष होणं अपेक्षित नाही.

किष्किंधाकांडातले हे दोन सर्ग (१७ व १८) संपूर्ण वाचल्यावर इथे उच्च वर्णीय विरुद्ध नीचवर्णीय किंवा क्षुद्र असा मूल्य लढा नसून नीतिमान विरुद्ध व्यभिचारी असा तो आहे, संघर्ष दोन संस्कृतींमधला नसून सुसंस्कृत आणि कुसंस्कृतामधला आहे. प्रा. कांबळे यांनी म्हटल्याप्रमाणे ३९ आणि ४० हे श्लोकही वाल्मीकि–रामायणामध्ये आहेत; पण ते वाली–वधाचे मुख्य कारण नव्हते. अठराव्या सर्गातील पहिल्या ४३ श्लोकांपैकी हे दोन–तीन श्लोक वगळता बाकी सर्व

भागामध्ये वालीच्या अनैतिकतेचाच पाढा आहे. त्यामुळे इथे तरी प्रा. कांबळे यांच्या संस्कृति–संघर्षाच्या तत्त्वज्ञानाला तर्कशुद्ध, सुसंगत पाया आढळून येत नाही. हा संघर्ष दोन संस्कृतींमधला नसून दोन प्रवृत्तींमधला आहे, असं इथे तरी स्पष्टपणे जाणवतं.

### सीताहरणाचा मामला

या पुस्तकामध्ये प्रा. कांबळे यांनी 'सीताहरण' या घटनेविषयी लावलेला अन्वयार्थही लक्ष वेधून घेणारा आहे. रावणाने सीतेला जबरदस्तीने पळवून नेले, या पारंपारिक कथाभागाचं खंडन त्यांनी अरण्यकांडातील (सर्ग ४६) आठ श्लोक उद्धृत करून केलं आहे. या श्लोकांमध्ये रावणाने सीतेच्या शरीरसौंदर्याचं तपशीलवार वर्णन केलं आहे. रावणाच्या या वक्तव्यानंतरही सीता त्याचा आदरसत्कार करते त्या अर्थी 'मामला काही औरच आहे हे त्वरित ध्यानात येतं', असा शेरा मारून प्रा. कांबळे मोकळे झाले आहेत; पण इथेही त्यांनी या आठ श्लोकांच्या पुढचे–मागचे संदर्भ अजिबात पाहिलेले नाहीत, असं खेदानं म्हणावं लागतं.

अरण्यकांडातीलच पस्तिसाव्या सर्गाच्या अखेरीस रावण मारीच नावाच्या राक्षसाची भेट घेतो, असा प्रसंग आला आहे. छत्तिसाव्या सर्गातील पहिल्या तब्बल एकवीस श्लोकांमध्ये स्वतः रावणाने मारिचाला सीताहरणाची योजना तपशीलवार समजावून सांगितली असून या कामी कांचनमृग होण्याची विनंती त्याला केली आहे. त्यानंतर अनुक्रमे ३७ (२५ श्लोक), ३८ (श्लोक ३३), आणि ३९ (२५ श्लोक); अशा लागोपाठच्या तीन सर्गांमध्ये मिळून मारिचाने रामाच्या गुणांची मुक्तकंठाने प्रशंसा करून रावणाला या योजनेपासून परावृत्त करण्याचा निकराचा प्रयत्न केला आहे. तसेच तरीही रावणाने असं काही केलंच तर रामाकडून त्याला सर्व बांधवांसह रणामध्ये प्राणांना मुकावे लागेल, असा भाकितवजा इशाराही दिला आहे.

चाळिसाव्या सर्गामध्ये (२७ श्लोक) रावणाने मारिचाचे हे सर्व बोलणे साफ धुडकावून लावले असून त्याने या कामी सहाय्य केल्यास त्याला अर्धे राज्य देण्याचेही कबूल केले आहे आणि तसे न केल्यास तेथेच ठार मारण्याची धमकी दिली आहे. अखेर बेचाळिसाव्या सर्गात मारिचाने रावणाची विनंती मान्य करून ते दोघे मोहिमेवर निघाले आहेत. म्हणजे येथपर्यंतच्या कथाभागावरून हे स्पष्ट होते की, रावण सीतेला मनाने वश करू इच्छित नव्हता, तर मारिचाच्या सहाय्याने मोठ्या धूर्तपणे तिला आश्रमात एकटी पाडून पळवून नेण्याचा त्याचा डाव होता. हे करण्यामागचं कारणही त्याने ३६ व्या सर्गात दिलं आहे. रामानं खर आणि दूषण या महाबलाढ्य राक्षसांसह हजारो राक्षसांना ठार मारून त्यांच्या उपद्रवातून दंडकारण्य मुक्त केले, तसंच राम आणि लक्ष्मणांनी त्याची बहीण शूर्पणखा हिला विद्रूप केलं, म्हणून त्याचा बदला घेण्यासाठी सीतेला पळवून आणण्याची आपली योजना असल्याचं त्या सर्गामध्ये रावणाने मारिचाला सांगितलं आहे.

आता प्रत्यक्ष रावण–सीता भेटीचा प्रसंग पाहू. प्रा. कांबळे यांनी त्यांच्या पुस्तकामध्ये उद्धृत केल्याप्रमाणे अरण्यकांडातीलच ४६ व्या सर्गामध्ये रावण सीतेच्या समोर जाऊन उभा राहिला आहे आणि तिच्या शरीर–सौंदर्याचे तपशीलवार वर्णनही त्याने केले आहे. या त्याच्या वक्तव्यानंतरही सीता रावणाचे आदरातिथ्य करते, हा प्रा. कांबळे यांनी दिलेला तपशीलही खरा आहे आणि इथेच त्यांचा प्रश्नार्थक आरोप आहे की, कोणती स्त्री परपुरुषाकडून अशी कामातुर वर्णने सहन करेल? आणि तेही स्वतःच्याच आश्रमासमोर?

आजच्या काळाच्या संदर्भात प्रा. कांबळे यांचा हा आरोप खराही ठरू शकेल; पण रामायणातील या प्रसंगाचा अन्वयार्थ लावताना प्रा. कांबळे यांनी ह्याच सर्गातले ३५ आणि ३६ हे दोन श्लोक आणि त्यापुढील ४७, ४८ आणि ४९ हे तीन सर्ग काळजीपूर्वक वाचले असते तर त्यांची शंका फिटली असती!

सेहेचाळिसाव्या सर्गाच्या अखेरीस असे नमूद करण्यात आले आहे की, हाती कमंडलू घेऊन आणि भगवे वस्त्र नेसून ब्राह्मणवेषामध्ये आलेल्याला (रावणाला) पाहिल्यामुळे आणि तो त्याच्याबरोबर चलण्याची विविध प्रकारे विनंती करत असल्याचे ध्यानात आल्यामुळे वस्तुस्थिती सांगितल्याशिवाय या प्रसंगातून आपली सुटका नाही, हे सीतेने ओळखले व त्यामुळे त्या काळच्या रिवाजानुसार तिने आधी त्या 'ब्राह्मणाचा' आदर–सत्कार केला. त्यानंतर ४७ व्या सर्गातील पहिल्या सुमारे वीस–बावीस श्लोकांमध्ये स्वतःची संपूर्ण माहिती सीतेने रावणाला दिली आहे. तरीदेखील रावणाने आपला आग्रह चालूच ठेवला आहे. (श्लोक २४ ते ३१) त्यावर सीतेचे त्याला सुमारे वीस श्लोकांचे जळजळीत उत्तर आहे. या उत्तराच्या शेवटी ती त्याला म्हणते की, सिंह आणि कोल्हा, समुद्र आणि नाला, उत्कृष्ट सुरा आणि आंबील, चंदनाचे पाणी आणि चिखल, गरुड आणि कावळा किंवा हंस आणि गिधाड यांच्यामध्ये जे अंतर तेच अंतर दाशरथी राम आणि तुझ्यामध्ये आहे! इंद्रासारखा प्रभाव असणारा, हाती धनुष्य–बाण घेतलेला राम जिवंत असताना तू माझे हरण केलेस तरी माशीने गिळलेले यज्ञीय लोणी जसे तिच्या पचनी पडत नाही, तशी मी तुझ्या पचनी पडणार नाही! (श्लोक ४५ ते ५०)

तरीही रावण त्याचा आग्रह चालूच ठेवतो आणि सीतेचा कडवा विरोध सहन न होऊन ४९ व्या सर्गामध्ये त्याने तिला बळाच्या जोरावर धरून नेल्याचा प्रसंग आला आहे. यानंतर ५० ते ५४ या चार सर्गांमध्ये मिळून सीताहरणाचा प्रसंग पूर्ण झाला आहे. सीतेने दिलेले शाप शांतपणे ऐकत विरोध करू माहणाऱ्या जटायूपक्ष्याला तुंबळ युद्धामध्ये ठार करून रावण लंकापुरीमध्ये पोचला आहे.

आणखी दोन सर्ग पुढे गेलं तर ५६ व्या सर्गात सुरुवातीलाच असं वर्णन आढळून येईल की, रावणाने सीतेचा पिच्छा सोडलेला नाही. मधूनच तो तिची अक्षरशः पाय धरून विनवणीही करत आहे; पण त्यावर पुन्हा स्वच्छ नकाराचे उत्तर देताना सीता

**मारिच राक्षसाने सीताहरणाला विरोध केला होता!**

रावणामध्ये आणि स्वत:मध्ये गवताच्या काडीचा आडोसा धरून बोलत आहे. अशाच स्वरूपाचं वर्णन पुढे सुंदरकांडामध्ये एकविसाव्या सर्गाच्या सुरुवातीलाही आहे.

तेव्हा प्रा. कांबळे यांनी अरण्यकांडातील ३५ ते ४२ आणि ४६ ते ५४ हे सर्ग तसेच वर नमूद केलेला तपशील पुन्हा एकदा नजरेखालून घालावा व मगच खरा 'मामला' काय आहे हे ठरवावे, अशी त्यांना विनंती आहे. या विनंतीमध्ये खोचकपणा अजिबात नाही. निर्भीड संशोधक – विचारवंत म्हणून प्रस्थापित होऊ इच्छिणाऱ्यांनी हे करणे खरोखरच आवश्यक आहे. त्यांच्याच हिताचं आहे.

## राज्य बळकावण्याचे रामाचे षडयंत्र

पुस्तकामध्ये प्रा. कांबळे यांनी मद्य–मांसाहारी राम–सीता, हिंसक राम आणि ब्राह्मण्याचा समर्थक राम अशी तीन छोटी पण स्वतंत्र प्रकरणे दिली आहेत. त्यांपैकी पहिली दोन जवळजवळ शंभर टक्के खरी आहेत. वाल्मीकी रामायणामध्ये याबाबतचे संदर्भ ठायीठायी आहेत. मात्र 'ब्राह्मण्याचा समर्थक' असे रामाचे वर्णन करणे म्हणजे त्याला त्याच्या जीवितकार्यापेक्षा जास्त श्रेय देण्यासारखे वाटते. राम केवळ परंपरेचे पालन करणारा, 'बाबावाक्यं प्रमाणम्' असे मानणारा, आजच्या भाषेत बोलायचं तर प्रवाहपतित माणूस होता. किंबहुना 'मर्यादा-पुरुषोत्तम' या त्याच्या अन्यथा गौरवपूर्ण उपाधीमध्ये मला तरी परंपरने आलेल्या मर्यादा तोडू न शकणारं दुबळं व्यक्तिमत्त्वच जाणवतं. अन्यथा, सीता विशुद्ध आहे, याचा स्वत:ला पूर्ण विश्वास असताना, तिचा त्याग त्याने केलाच नसता; पण प्रजाजनांमधल्या संशयास्पद कानगोष्टींनासुद्धा या दुबळ्या माणसाने अपकीर्तीच्या भीतीपोटी अवास्तव महत्त्व देऊन सीता गरोदर असतानाही निर्दयपणाने तिला वनात सोडून दिलं. या सर्व घटनेचं समर्थन रामभक्त 'ईश्वरी संकेत' अशा गूढ शब्दांत करतात; पण असे संकेत त्यांनाच लखलाभ असोत !

तेव्हा, प्रा. कांबळे रामाला ब्राह्मण्याचा समर्थक म्हणत असले तरी एखाद्या गोष्टीचं समर्थन करण्याचीही त्याची ताकद नव्हती, हे उघड आहे. खुद्द प्रा. कांबळे यांनीदेखील त्यांच्या पुस्तकाच्या अखेरीस दिलेल्या सात निष्कर्षांपैकी (पान ६२,६३) पहिला, रामाविषयीचा निष्कर्ष या संदर्भात वाचण्यासारखा आहे. ते म्हणतात की; 'राम हा एक सामान्य पुरुष होता. (तो विष्णूचा अवतार नव्हता.) त्याचे वर्तन सामान्यांप्रमाणे होते. त्याचे व्यक्तित्व गुणदोषांनी व्याप्त होते. रामायणात तो अवतरतो, तो ब्राह्मणी धर्माचा संरक्षक व प्रचारक म्हणून.' प्रा. कांबळेसुद्धा येथे रामाला ब्राह्मणी धर्माचा 'समर्थक" म्हणत नाहीत. 'स्त्री-शूद्र, अतिशूद्रांचा विरोधक व निर्दालक म्हणून.'

या निष्कर्षातील शेवटचे मत (स्त्री–शूद्रांचा विरोधक, निर्दालक) वगळता प्रा. कांबळे यांची रामाविषयीची आधीची सर्व मते किंवा निष्कर्ष मलाही पूर्णपणे मान्य आहेत. आता ब्राह्मणी धर्माचा संरक्षक आणि प्रचारक असलेला माणूसही शूद्रांचा विरोधक आणि निर्दालक कसा असू शकत नाही, याविषयी लेखाच्या अखेरच्या भागात चर्चा करू. इथे फक्त एवढेच नोंदवून ठेवतो की, रामाचा पवित्रा संपूर्ण रामायणभर बचावाचाच आहे. स्त्री–शूद्रच काय, इतर कोणाचाही विरोध किंवा निर्दालनासाठी आवश्यक असणारा आक्रमकपणा त्याच्या स्वभावातच नाही. रावणाने सीतेला पळवलं नसतं तर हे महाराज, चौदा वर्षांनी पुन्हा शांतपणे अयोध्येत जाऊन बसले असते ! रावणाची आणि त्यांची गाठसुद्धा पडली नसती. रामायणात रामाने केलेले सर्व हल्ले किंवा युद्धे बचावासाठी आणि बचावात्मक आहेत. अंगावर आलं तरच शिंगावर घ्यायचं, अशी त्याची वृत्ती आहे; पण तो कथानायक असल्याने प्रत्येक ठिकाणी शत्रूचा नि:पात अटळ आणि अपरिहार्य आहे. अर्थात या मांडणीमध्ये 'ईश्वरी संकेतां'ना स्थान नाही, हेही पुन्हा एकवार स्पष्ट करू इच्छितो. याचबरोबर रामाचा स्त्री किंवा शूद्रांशी संघर्ष करण्याचा प्रसंग तरी रामायणामध्ये कुठे आला आहे का, हेही नीट तपासून पाहणे आवश्यक आहे. पण त्याची चर्चा पुढे करू.

प्रा. कांबळे यांनी रामावर आणखी एक महत्त्वाचा आरोप केला आहे. तो म्हणजे, अयोध्येच्या राज्यावर खरा अधिकार भरताचाच असताना राज्य बळकावण्याचे षडयंत्र रामाने रचले. या संदर्भात त्यांनी असे म्हटले आहे की, 'रामाला राज्याभिषेक करण्याचे दशरथाने ठरविले, हा वस्तुतः एक दुष्ट कट होता. राज्यभिषेकाचा न्याय्य अधिकार भरताचाच होता. दशरथाने कैकेयीशी लग्न करताना तिला असे वचन दिले होते की, राज्याभिषेक मी तुझ्याच पुत्राला करीन, स्वत: रामच हे भरताला (तो वनवासात रामाची समजूत काढण्यास गेला तेव्हा) सांगतो. (अयोध्याकांड, सर्ग १०७ श्लोक ३) दशरथाने कैकेयीस लग्नाची मागणी घातली, तेव्हा त्याला नकार मिळाला. कारण कैकेयी व दशरथ यांच्या वयात खूप अंतर होते. दशरथ वृद्ध होता. तर कैकेयी तरुण ! कामांध (रामाने दशरथास दिलेले विशेषण) दशरथाची कैकेयीशी लग्न करण्याची अतीव इच्छा होती. त्यामुळे त्याने कैकेयीस वचन दिले की, तुझ्या मुलालाच मी राज्याभिषेक करीन !

'राज्यारोहणाचा वास्तविक अधिकार भरतास असता त्यास आजोळी पाठवून रामास राज्याभिषेक करण्याचा कट का करण्यात आला ? राज्याभिषेकाचा अधिकारी भरत आहे, हे रामास ठाऊक असूनदेखील तो या कट–कारस्थानास बळी पडला ? उलट, रामाच्या राज्याभिषेकाची तयारी भरत व कैकेयी यांना अज्ञानात ठेवून केली जात होती. यात विघ्न येऊ नये म्हणून दशरथ दक्ष होता. तो तसे रामास सांगतोदेखील ! (अयोध्याकांड, सर्ग ४, श्लोक २४–२५)

प्रा. कांबळे यांच्या या म्हणण्यामध्ये काही अंशी का होईना, निश्चितपणे तथ्य आहे. पहिल्या परिच्छेदात प्रा. कांबळे यांनी, राज्यावर भरताचा अधिकार असल्याचे रामाला माहित होते, असे साधार दाखविले आहे. त्यामध्ये एवढीच दुरुस्ती मूळ वाल्मीकी रामायणातील तपशील पाहता सुचवावीशी वाटते की, दशरथाने कैकेयीशी विवाह करताना तिच्या मुलाला (पर्यायाने भरताला) राज्यपदी बसवण्याचे वचन दिले नव्हते, तर अयोध्येचे राज्य कैकेयीच्या वडिलांना (केकय राजा) शुल्क म्हणून देण्याचे वचन दिले होते. आता हे शुल्क केव्हा आणि कोणत्या स्वरुपात द्यायचे होते, यासंबंधी काहीही स्पष्टीकरण रामायणात मिळत नाही. त्यामुळे भरताला राज्याभिषेक करून ही वचनपूर्ती करण्यास दशरथ बांधील होता, असा दावा कोणी केला तर तो साधार खोडून काढता येणार नाही.

या ठिकाणी हेही नोंदवले पाहिजे की, रामायणातील अयोध्यकांडातल्या दहा ते एकोणीस या नऊ सर्गांमध्ये मिळून कैकेयी दशरथाकडे रामाला वनवासात पाठवण्याची आणि भरताला राज्याभिषेक करण्याची मागणी करते, हा प्रसंग, तसेच रामाला बोलावून हे सर्व सांगितले जाते व राम त्याचा स्वीकार करतो, हा प्रसंग तपशीलवार आला आहे; पण त्यामध्ये दशरथ, राम किंवा स्वत: कैकेयीच्या बोलण्यात कुठेही दशरथ–कैकेयी विवाहाच्या वेळी दशरथाने काही वचन दिल्याचा (कैकेयीच्या वडिलांना अयोध्या राज्य शुल्क म्हणून देण्याचा किंवा तिच्या मुलाला राज्याभिषेक करण्याचा) उल्लेख एका शब्दानेही नाही. तिथे सर्वत्र उल्लेख आढळतो तो पूर्वी देव–दानवयुद्धात कैकेयीने अतिशय कठीण प्रसंगी दशरथाला सहाय्य केल्याचा आणि त्यामुळे प्रसन्न होऊन दशरथाने तिला दोन वर मागण्याची संमती दिल्याचाच !

मात्र अशा परिस्थितीतही प्रा. कांबळे यांच्या निष्कर्षाला एकाच संदर्भाच्या आधारे, काही अंशी का होईना, मान्यता द्यावी लागते. तो संदर्भ म्हणजे, अयोध्याकांडातल्या १०७ व्या सर्गातला पुरा भ्रात: पिता न: 'स मातरं ते समुद्वहन् । मातामहे समाश्रौषीद्रा ज्यशुल्क मनुत्तमम् । हा श्लोक. कारण या श्लोकावरून हे मान्य करावे लागते की, कैकेयीचा राज्यावर काही तरी अधिकार निश्चितपणे होता आणि रामालाही तो माहित होता. शिवाय, स्वत: दशरथ अयोध्याकांडातल्या चौथ्या सर्गामध्ये (श्लोक २४–२५) रामाला बोलावून त्याला यौवराज्याभिषेक करण्याचा निर्णय सांगतो त्या वेळीही तो असे म्हणतो की, 'अशा प्रकारच्या कार्यात विघ्ने फार येत असतात. जोपर्यंत या नगरापासून भरत दूर पाठविला गेला आहे तोपर्यंत माझ्या मताने तुझ्या अभिषेकाकरिता योग्य काळ आहे.' अर्थात दशरथाच्या या बोलण्यातील गर्भित अर्थाचेही स्पष्टीकरण रामायणात अन्यत्र कुठेही नाही; पण त्याच्या मनात या राज्याभिषेक–प्रकरणी काही तरी शंकेची पाल सतत चुकचुकत होती, एवढे मात्र त्यावरून निर्विवादपणे सिद्ध होते.

या चर्चेवरून असे अनुमान काढता येईल की, भरताऐवजी रामाला यौवराज्याभिषेक करण्याच्या कटातील मुख्य आरोपी स्वत: दशरथ आहे आणि या प्रकरणी स्वत:ला असलेली काही तरी माहिती दडवून ठेवल्याचा आरोप रामावर ठेवावा लागेल. हे दोन्ही आरोप पुराव्याधारे शंभर टक्के शाबीत करणे कठीण आहे; पण प्रा. कांबळे यांनी त्यांच्या पुस्तकात दिलेल्या आणि वर विस्तृतपणे चर्चा केलेल्या तपशिलावरून रामाच्या राज्याभिषेकाची योजना संशयातीत, निष्पाप मनाने तयार झाली नव्हती, हे निश्चितपणे जाणवते. तसे जाणवण्याइतपत पुरावा मूळ रामायणामध्ये पुरेसा उपलब्ध आहे

रामावर प्रा. कांबळे यांनी आणखीही एक महत्त्वाचा आक्षेप त्यांच्या पुस्तकामध्ये ठेवला आहे. तो म्हणजे, राम स्त्री आणि शूद्रांचा विरोधक, निर्दालक होता. या संदर्भात थोडीशी चर्चा या लेखामध्ये मगाशी केली आहेच. राम स्त्री–जातीचा विरोधक–निर्दालक असल्याचे मत प्रा. कांबळे यांनी मुख्यत्वे उदाहरणांच्या आधारे व्यक्त केले आहे. १) रावणाचा पाडाव करून सीता पुन्हा प्राप्त झाल्यानंतर रामाने तिला करायला लावलेले अग्निदिव्य आणि त्यानंतरही केवळ लोकापवादामुळे तिला भोगायला लावलेला वनवास आणि २) शूर्पणखा या राक्षसिणीला रामाने दिलेली वागणूक.

यापैकी सीतेच्या बाबतीतील रामाच्या वागण्याचे समर्थन कोणीही सभ्य, सुसंस्कृत माणूस करू शकणार नाही. सीतेसारख्या महान साध्वीला आपण देत असलेल्या वागणुकीबद्दल त्याला खरेच दु:ख वाटत होते किंवा नाही, हे कोणालाच ठामपणे ठरवता येणार नाही. आदर्श राजा कसा असावा, याचा वस्तुपाठ घालून देण्यासाठी वैयक्तिक सुख–दु:खे बाजूला ठेवून 'राजा प्रकृतिरंजनात्' या न्यायाने राम तसे वागला, असे स्पष्टीकरण त्याचे समर्थक देतात; पण पत्नीच्या चारित्र्याबद्दल प्रजा शंका घेत असेल आणि स्वत:च्या दृष्टीने तिचे चारित्र्य संशयातीत असेल तर आपणच राजपदावरून बाजूला होणे हाही पर्याय असू शकतो की नाही ? रामाने तसे केले असते तर जनमताची नोंद त्याने जास्त चांगली किंमत मोजून घेतल्यासारखे झाले असते आणि सीतेवरील अन्यायही टळू शकला असता. शिवाय, सीतेची शंका ती 'सीता' आहे म्हणून नव्हे तर 'रामपत्नी', 'राजपत्नी' आहे म्हणून घेतली गेली होती. अशा वेळी त्याचे प्रायश्चित्त घेण्याची जबाबदारी राजावरही येतेच. आता सीतेविना जीवन जगणे हेच प्रायश्चित्त होते, असे कोणी म्हणत असेल तर मग सीतेला दुप्पट प्रायश्चित्त भोगावे लागले, असे म्हणावे लागेल त्यामुळे रामाच्या या वर्तनाचे समर्थन पूर्वीच म्हटल्याप्रमाणे 'ईश्वरी संकेत' या परवलीच्या शब्दांखेरीज अन्य कोणत्याही प्रकारे करता येणार नाही. सीतेच्या अप्रतिष्ठेपेक्षा रामाने या ठिकाणी 'राजपदाची प्रतिष्ठा' या बुरख्याखाली स्वत:ची 'इमेज' राखण्याचा, वाढवण्याचा स्वार्थी आणि छुपा प्रयत्न केलेला आहे, हे मान्य करावे लागते; पण त्याबद्दल त्याला एकदम स्त्री–विरोधक मात्र म्हणता येणार नाही. वैयक्तिक जीवनामध्ये स्वत:च्या पत्नीवर एखाद्याने अक्षम्य अन्याय केला तर त्याला त्याबद्दल कठोर शासन केले जावे, याबाबत दुमत असण्याचे कारण नाही; पण म्हणून त्याला सबंध स्त्री–जातीचाच विरोधक म्हणणे हेही अन्यायाचे, पूर्वग्रहदूषित दृष्टीचे द्योतक ठरेल.

रामावरील या आरोपाच्या पुराव्यादाखल प्रा. कांबळे राम आणि लक्ष्मणाने रावणाची बहीण शूर्पणखा हिची केलेली चेष्टा आणि विटंबनेचे उदाहरणही तपशीलवार दिले आहे. त्यापैकी राम–लक्ष्मणाने शूर्पणखेला एकमेकाकडे टोलवून तिची चेष्टा करणे योग्य नव्हते, हे शंभर टक्के मान्य. एखादी स्त्री आपल्या अगदी प्रेमात पडली आहे, हे लक्षात आल्यावर तिच्या प्रेमाला प्रतिसाद द्यायचा नसेल तर देऊ नये; पण त्याचबरोबर तिची, तिच्या प्रेमाची चेष्टाही करू नये, हे तत्त्व कोणीही सभ्य, सुसंस्कृत माणूस मान्य करेल. राम–लक्ष्मण तसे नव्हते का ? रामायणातील इतर संदर्भांवरून तसेही मत बनवणे कठीण आहे. मात्र एक गोष्ट इथे कबूल

## राज्याभिषेकाची योजना निष्पाप नव्हती !

करावी लागेल की, विरंगुळा किंवा मनोरंजनाच्या हेतूने असेल, कदाचित, पण राम–लक्ष्मण शूर्पणखेशी उचित वागले नाहीत. शूर्पणखाही रामावर इतकी लुब्ध झाली होती की, रामाने आपण विवाहित आहोत, असे तिला सुरवातीलाच सांगितले; पण त्यामुळे नाराज होऊन ती परत गेली नाही, तर तिने सीतेला खाऊन टाकून हा प्रश्नच मिटवण्याची ऑफर दिली आणि अखेरीस राम व लक्ष्मण यांपैकी कोणीच आपल्याशी लग्न करायला तयार होत नाही, हे लक्षात आल्यावर संतापाच्या भरात ती सीतेवर धावूनही गेली! तेव्हा शूर्पणखेचे नाक आणि कान कापण्याचा आदेश रामाने लक्ष्मणाला दिला व लक्ष्मणाने त्याच्या शिरस्त्यानुसार या आदेशाची कार्यवाही केली. (अयोध्याकांड, सर्ग १८ वा)

ही सबंध घटना पाहता राम–लक्ष्मणाला वर म्हटल्याप्रमाणे काही अंशी दोष निश्चितपणे द्यावा लागेल; पण त्यावरून प्रा. कांबळे म्हणतात तशी, रामाने या कृतीद्वारे 'स्त्रीत्वाचीच विटंबना' केली काय? रामायणातील संदर्भ लक्षात घेता असा सर्वव्यापक, सर्वसमावेशक निष्कर्ष बरोबर ठरणार नाही.

## बौद्धराजा रावण

आता राम शूद्रांचा विरोधक आणि निर्दालक होता किंवा नाही, याचा निर्णय करण्यासाठी या पुस्तकातील प्रा. कांबळे यांच्या मुख्य प्रतिपादनाकडे वळावे लागेल. त्यांच्या मते 'रामायणातील रावण व त्यांच्यासारखे अन्य हजारो राक्षस भारतातील त्या काळच्या आदिम जमातीचे होते आणि या सर्वांनी बौद्धधर्म स्वीकारला होता. खुद्द रावण हा बौद्धराजा होता. साहजिकच ब्राह्मण्याचा प्रचार व संरक्षण करत फिरणाऱ्या रामाच्या संस्कृतीपेक्षा या गटाची संस्कृती पूर्णपणे भिन्न होती. किंबहुना, पूर्ण विरोधी होती. म्हणून रामायणातील संघर्ष हा बाहेरून आलेले आर्य विरुद्ध या देशातील मूळचे अनार्य–द्रवीड–दस्यू यांच्यातील संघर्ष आहे. तो राजकीय संघर्षाबरोबरच सामाजिक – सांस्कृतिक असा संघर्ष आहे.

'रामायणातील राक्षस हे अनार्य–द्रविड–नागलोक होत. त्यांचा ब्राह्मणी यज्ञयागजनित हिंसा, ब्राह्मणांना देण्यात येणाऱ्या दानाद्वारे होणारा सामाजिक संपत्तीचा अपव्यय, सुरापान, आर्यांच्या देव–देवता व त्यांचे कर्मकांड यांना विरोध होता. रामायणात ते बौद्ध असल्याचे पुरावे मिळतात. यांनाच नंतरच्या काळात अस्पृश्य करण्यात आलं. राक्षसाधिपती रावण हाही तत्त्वचिंतक, लोकहितदक्ष असा बौद्धराजा होता.

'रामायणातील संघर्ष अशा प्रकारे आर्य विरुद्ध अनार्य, ईश्वरवादी विरुद्ध अनीश्वरवादी, आत्मवादी विरुद्ध अनात्मवादी, हटवादी विरुद्ध पारलौकिकवादी, कर्मकाण्डी विरुद्ध पाखण्डी, ब्राह्मण्यपूजक विरुद्ध ब्राह्मण्याचे विरोधक, मूळचे रहिवासी विरुद्ध बाहेरून आलेले उपरे यांच्यामधील संघर्ष होय.

'आजचे वाल्मीकी रामायण हा ब्राह्मणी तत्त्वज्ञानाचा प्रचार करणारा ग्रंथ आहे. हा बौद्धधर्माला, अनीश्वरवादी दर्शनाला विरोध करणारा 'अँटीथिसिस' आहे.'

प्रा. कांबळे यांचे हे प्रतिपादन नोंदवत असताना अनेक ठिकाणी पेन अडखळलं. संशोधक–विचारवंत म्हणवणारा माणूस कोणताही सबळ, अंतर्गत किंवा बाह्य पुरावा नसताना एखादं काव्य रचत जावं तसे एकामागोमाग एक सिद्धांतांचे इमले कसे चढवत जातो, याचं सकौतुक आश्चर्य वाटलं. या सिद्धांतांच्या पुष्टीसाठी लेखकाने दिलेल्या पुराव्यांचं तोकडेपण पुढे सिद्ध करणारच आहे; पण इथे हे नोंदवल्याशिवाय राहवत नाही की, या सबंध प्रतिपादनामध्ये प्रा. कांबळे संशोधक–विचारवंत राहिलेले नाहीत. ते एक राजकीय नेता बनले आहेत. आपला पक्ष श्रेष्ठ आहे, असे जनमानसावर ठसवण्यासाठी स्वपक्षाची ताकद आणि कार्य वाढविण्याऐवजी समोरच्या पक्षाची प्रतिमा मलिन करणे हाच सर्वांत सोपा आणि प्रभावी उपाय आहे, असे सध्याच्या काळातील राजकारणी मानतात. दुर्दैवाने प्रा. कांबळे हेही त्याच मार्गाचे बळी ठरले आहेत.

रामायणातील रावण आणि त्याचे राक्षसगण बौद्ध होते, हा सिद्धांत स्वीकारण्यासाठी किमान अट म्हणजे, गौतमबुद्धाचा उदय आणि त्याच्या तत्त्वज्ञानाचा विकास झाल्यानंतरच रामायणाची रचना झाली असली पाहिजे; पण बुद्धाच्या उदयापूर्वीच ही रचना झाली असल्याचे काही तर्कसुसंगत पुरावे आणि सर्वमान्य विद्वानांच्या अभ्यासावरून सिद्ध झाल्यास प्रा. कांबळे यांचा मुख्य इमलाच भुई-सपाट होईल.

आपल्या म्हणण्याच्या आधारासाठी प्रा. कांबळे यांनी प्रथम 'लंकावतारसूत्र' या महायान बौद्धधर्माच्या तत्त्वज्ञानात्मक ग्रंथाचा गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. लंकाधीश रावणाला तथागत बुद्धाने केलेला सद्धर्माचा उपदेश या ग्रंथामध्ये असून पहिल्या अध्यायात रावण आणि बुद्ध यांचा संवाद दिलेला आहे. प्रा. कांबळे यांनी त्यांच्या पुस्तकात या ग्रंथातील प्रत्यक्ष दाखला एकही दिलेला नाही; पण तामिळनाडूतील थोर समाजक्रांतिकारक पेरियार इ. व्ही. रामस्वामी यांचे या ग्रंथाविषयीचे मत दिले आहे. 'Ramayana–A True Reading' या पुस्तकामध्ये श्री. रामस्वामी यांनी रावणाने बौद्धधर्माचा स्वीकार केला होता, असे सांगून म्हटले आहे की, Because it was spoken so high of Ravana in the Buddhist literature, the brahmins and pandits characterised Ravana in such vile temrs in the Ramayana written by them.

प्रा. कांबळे यांनी हे वाक्य उद्धृत करून वाल्मीकी रामायणातील आणि 'लंकावतारसूत्र'मधील रावण एकच असल्याचाही दावा केला आहे; पण तो इथे वादाचा मुख्य मुद्दा नाही. रावण बौद्ध होता किंवा नाही, यासंबंधी प्रा. कांबळे यांनी प्रत्यक्ष 'लंकावतारसूत्र'मधील काही दाखले दिले असते, तर त्यांचा गंभीरपणे विचार करता आला असता; पण त्या ग्रंथावरील श्री. रामस्वामी पेरियार यांचे फक्त आठ ओळींचे मत नोंदवून ते मोकळे झाले आहेत हे मत असू शकते; पण त्याचा खरे–खोटेपणा तपासण्यासाठी, सिद्ध करण्यासाठी काही प्रत्यक्ष पुरावा नको काय? प्रा. कांबळे यांना त्याची गरज वाटत नसावी.

सहज जाता जाता, प्रा. कांबळे यांच्या युक्तिवादातील, त्यांच्याच पुस्तकात आढळलेली एक विसंगती इथे स्पष्ट करतो. रावणाविषयी

सर्वसामान्य माणसाचे जे अनेक गैरसमज आहेत त्यांपैकी रावणाला दहा तोंडे होती, हा एक मोठा गैरसमज आहे, असे प्रा. कांबळे म्हणतात. काही विद्वानांची याबाबतीतील मते आणि प्रत्यक्ष वाल्मीकी रामायणातील सुमारे अर्धा डझन अवतरणे देऊन प्रा. कांबळे यांनी हा गैरसमज चांगल्या प्रभावीपणे दूर केला आहे. (पान ५९–६०–६१) रावण इतरांप्रमाणेच एक डोके, दोन हात आणि दोन पाय असलेला माणूस होता, अशी नोंदही रावणासंबंधीच्या निष्कर्षामध्ये त्यांनी केली आहे; पण पुन्हा 'लंकावतारसूत्र'-मधील I who have came here am called Ravana, the ten headed king of Rakshasas (अध्याय १ ला, पान ६) हे रावणाच्याच तोंडचं वक्तव्यही प्रा. कांबळे याच पुस्तकात (पान ४५) देतात. पुढे त्याच्यावर टिप्पणी करताना ते असेही म्हणतात की, रावण 'दशानन' नव्हे, 'दशबल' होता आणि 'दशबल' हे बुद्धाचे एक नाव होते; पण मग त्या 'The ten headed king of Rakshasas' या भाषांतराचे काय? 'लंकावतारसूत्र' च्या भाषांतरकाराला 'दशानन' म्हणजेच 'दशबल' हा अन्वयार्थ माहीत नव्हता काय? म्हणजे आता रावणाला दहा तोंडे नव्हती, या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ प्रा. कांबळे यांनी दिलेली वाल्मीकि रामायणातली अवतरणे खरी मानायची की, 'लंकावतार सूत्र 'मधील हे भाषांतर खरे मानायचे? अर्थात रावणाला पाच तोंडे होती की, दहा होती की वीस होती, हे मला स्वतःला अजिबात महत्त्वाचे वाटत नाही. रामायणात रावण नावाची व्यक्तिरेखा आहे, एवढे या विषयाच्या चर्चेसाठी पुरेसे आहे; पण प्रा. कांबळे यांची संशोधन आणि चिकित्सेची पद्धत निदर्शनाला आणून देण्यासाठी हा तपशील मांडावा लागला.

अशाच स्वरूपाची आणखी काही विद्वानांची परस्पर विसंगत विधाने, मते नोंदवत प्रा. कांबळे यांनी त्यांच्या पुस्तकातील ४९ ते ५५ या पानांमधून रावण आणि त्याचे राक्षसगण बौद्ध असल्याचे सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. याच बौद्धांना नंतरच्या काळात अस्पृश्य करण्यात आले, असेही मत त्यांनी ठामपणे नोंदवले आहे. या मताला बळ यावे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांपासून विठ्ठल रामजी शिंद्यांपर्यंत अनेक विद्वानांची शेरेवजा एकेक–दोन–दोन विधाने दिली आहेत. या सर्व सामाजिक विचारवंतांबद्दल मला नितांत आदर आहे. म्हणूनच मी असे म्हणू इच्छितो की, आपल्या युक्तिवादाला बळकटी आणण्यासाठी प्रा. कांबळे यांनी या विचारवंतांच्या मतांचा संदर्भहीन गैरवापर करून घेतला आहे. एका अर्थाने वैचारिक क्षेत्रातील ही अनैतिकताच आहे.

रावण ब्राह्मण होता, असा सर्वमान्य समज आहे. वाल्मीकी रामायणातही तसे दाखले अनेक ठिकाणी आहेत. (उदाहरणार्थ, अरण्यकांड–सर्ग ३२, श्लोक २३, सर्ग ४८ श्लोक १ ते ५, युद्धकांड–सर्ग १०९, श्लोक २१ ते २४, उत्तरकांड–सर्ग ९, श्लोक १९ ते ३६, इत्यादी, इत्यादी) अनेक विद्वानांनी रामायणातील हे अंतर्गत पुरावे ग्राह्य मानले आहेत. प्रा.कांबळे यांनी त्यांची दखलसुद्धा घेतलेली नाही. त्यामुळे त्यांचे खंडन करण्याचाही प्रश्न त्यांच्यापुढे उद्भवला नाही. बरे, त्याबाबत प्रा. कांबळे यांना दोष दिला नाही, तरी रावण आणि त्याचे राक्षसगण बौद्ध होते, हे सिद्ध करण्यासाठी तरी त्यांनी उपलब्ध रामायणातील किमान एक दाखला तरी द्यावयास नको काय? प्रा. कांबळे यांनी तेवढीदेखील तसदी घेतलेली नाही. कारण उघड आहे. रामायणात तसा उल्लेख एका अक्षरानेही आढळत नाही- त्यामुळे पुन्हा केवळ इतर विद्वान म्हणतात म्हणून, रावण आणि त्याचे राक्षसगण बौद्ध होते, हे मान्य करण्याची गळ ते वाचकांना घालतात. उपलब्ध रामायणामध्ये काही ठिकाणी बुद्ध आणि बौद्धांविषयीचे उल्लेख निश्चितपणे आहेत; पण ते सर्व प्रक्षिप्त (नंतर घुसडलेले) असल्याचे प्रतिपादन अनेक तज्ज्ञांनी केले आहे. तसेच यापैकी एकही उल्लेख रावण आणि त्याच्या राक्षसगणाच्या संदर्भात नाही हेही इथे लक्षात घ्यायला हवे; पण प्रा. कांबळे हे प्रतिपादन फेटाळून लावताना म्हणतात की, 'ब्राह्मणी ग्रंथकारांची वृत्ती अशी असते की, ज्यामुळे अडचणीत येतील त्या गोष्टींना प्रक्षिप्त म्हणून मोकळे व्हायचे! प्रक्षिप्तपणाचे हे नाटक सिद्ध होणारे नाही, उलट त्यांची ब्राह्मणी वृत्ती स्पष्ट करणारे आहे.

एकीकडे हे लिहिणाऱ्या प्रा. कांबळे यांनी त्यांच्याच पुस्तकात 'रामायणाचा रचनाकाळ' या प्रकरणामध्ये मात्र ते ज्यांना गुरुस्थानी मानतात अशा काही विद्वानांची मते देऊन बुद्ध आणि बौद्धाविषयी रामायणात आलेले उल्लेख हे त्यामध्ये नंतर घालण्यात आले, असेही म्हटले आहे. मूळ रामायणाचे विकृतीकरण किंवा प्रमुख पुनर्लेखन झाले, असे मत नोंदवले आहे. 'ब्राह्मणी वृत्तीचे ग्रंथकार ज्याचे स्पष्टीकरण 'प्रक्षिप्त' असे देतात त्यामध्ये आणि प्रा. कांबळे यांनी उद्धृत केलेल्या विद्वानांच्या वर दिलेल्या मतांमध्ये काही गुणात्मक फरक आहे काय?

## विखुरलेले संदर्भ

म्हणजे मूळ वाल्मीकी रामायणामध्ये बुद्ध किंवा बौद्धधर्माचा संदर्भ नव्हता, हे प्रा. कांबळे यांच्या गुरुजनांसह सर्वांना मान्य आहे; पण त्यांच्या मते, ते रामायण आता अस्तित्वातच नाही. प्रा. कांबळे यांनी त्यांच्या पुस्तकाच्या 'रामायणाचा रचनाकाळ' या प्रकरणामध्ये याबाबत असेही म्हटले आहे की, 'इ. स. च्या तिसऱ्या–चौथ्या शतकाच्या दरम्यान रामायणाचे प्रमुख पुनर्लेखन झाले असे म्हणावे लागेल. याचा अर्थ वाल्मीकी रामायण हे मूळ रामायणाचे पुनर्लेखन होऊन अस्तित्वात आलेले, बुद्धिझमचा प्रतिपक्ष (Anti thesis) म्हणून आवतरलेले असे रामायण आहे व त्याचा रचनाकाळ सुमारे तिसरे-चौथे शतक हा आहे. उपलब्ध वाल्मीकि रामायणाच्या अभ्यासाअंती माझे हे ठाम मत झाले आहे.'

हे ठाम मत मी मान्य करतो; पण आता प्रा. कांबळे यांना माझी एवढीच विनंती आहे की, मूळ, प्रचलित, पुनर्लिखित, पुनर्रचित, बुद्धिझमचा प्रतिपक्ष (anti–thesis) म्हणून तिसऱ्या–चौथ्या शतकात अवतरलेली, विकृतीकरण केलेली अशी जी काही रामायणाची

**वाल्मीकी रामायणामध्ये बुद्ध किंवा बौद्ध धर्माचा संदर्भ नव्हता.**

प्रत त्यांच्या हाती असेल त्यामधून त्यांनी रावण आणि त्याचे राक्षसगण बौद्ध होते किंवा बौद्धधर्माचे उपासक होते, या त्यांच्या म्हणण्याच्या पुराव्यादाखल किमान एक ओळ किंवा श्लोक काढून दाखवावा. प्रचलित रामायणामध्ये एकूण सात कांडे, ६५८ सर्ग आणि सुमारे तेवीस हजार श्लोक आहेत. या सर्व पसाऱ्यामधून बुद्ध आणि बौद्धधर्माविषयी फक्त आठ किंवा दहा उल्लेख प्रा. कांबळे यांनी त्यांच्या पुस्तकात उद्धृत केले आहेत. त्यामध्ये कोणतीही संगती नाही. तसेच मगाशीच म्हटल्याप्रमाणे यापैकी एकही उल्लेख रावण आणि त्याच्या राक्षसगणांना सरळ जाऊन भिडत नाही. आता प्रा. कांबळे विस्तारभयाचे कारण देऊन हा प्रश्न मिटवण्याचा प्रयत्न करणार असतील तर माझे काही म्हणणे नाही; पण जिथे त्यांचा मुख्य सिद्धांतच कोलमडण्याच्या अवस्थेला आला आहे त्या ठिकाणी विस्ताराचे भय कसले ? प्रा. कांबळे यांनी अशा संदर्भांचा आणि उल्लेखांचा वर्षाव करून रावण आणि त्याचे राक्षसगण बौद्ध असल्याचे सिद्ध केले पाहिजे.

सहज जाता जाता, प्रा. कांबळे यांच्या संशोधनपद्धतीचा आणखी एक नमुना पेश करतो. रामायणातल्या बालकाण्डामध्ये पहिल्या सर्गाच्या दुसऱ्या श्लोकात 'श्रमणा' हा बौद्ध उपासकाला उद्देशून असलेला शब्द आला आहे, असे प्रा. कांबळे यांनी त्यांच्या पुस्तकात म्हटले आहे. रामायणाच्या 'प्रचलित' प्रतीमध्ये हा संदर्भ काढून पाहिला तर काय आहे ? तो श्लोक असा आहे 'को न्वस्मिन्सांप्रतं लोके गुणवान्कश्च वीर्यवान् । धर्मज्ञश्च कृतज्ञश्च सत्यवाक्यो दृढव्रतः ।' आता या सबंध श्लोकामध्ये 'श्रमणा' हा शब्द कुठे आहे ते काढून दाखवावे. ही धूळफेक बरोबर नाही; पण प्रा. कांबळे ती करतात. आणि वर असेही म्हणतात की, 'रामायणात बौद्धसंस्कृतिवाचक शब्द आपल्याला एक–दोन ठिकाणी नाही तर सर्वत्र दिसतील. आता एकदा ही धूळफेक लक्षात आल्यावर प्रा. कांबळे यांच्या या विधानावर तरी विश्वास कसा बसावा ? त्यासाठी एकच उपाय आहे. विस्तारभय न बाळगता प्रा. कांबळे यांनी हे रामायणामध्ये 'सर्वत्र व्यापून राहिलेले उल्लेख' वाचकांपुढे सादर करावेत. मान्यवर विद्वानांच्या मतांच्या आधारे निष्कर्ष काढायला हरकत नाही; पण त्याचबरोबर अशा प्रकारच्या संशोधनात्मक चिकित्सेमध्ये मूळ ग्रंथातील अंतर्गत पुराव्यांची (internal evidence) जोड नसेल तर विद्वानांची मते फारशी वजनदार ठरू शकत नाहीत, हे इथे लक्षात घ्यायला हवे.

अखेर या चर्चेच्या सुरवातीला उपस्थित केलेला मुद्दा शिल्लक राहतो, तो म्हणजे रामायणाची रचना बुद्धाचा उदय आणि विकासानंतर झाली, एवढे तरी प्रा. कांबळे निर्विवादपणे सिद्ध करू शकतात काय ? 'रामायणाचा रचनाकाळ' या प्रकरणावर पुस्तकातील पाच–सहा पाने खर्ची घातल्यानंतरही प्रा. कांबळे यांनी फक्त रामायणाचे पुनर्लेखन केव्हा झाले असावे, याबाबत नेहमीप्रमाणे मुख्यत्वे समविचारी विद्वानांचीच मते देऊन निष्कर्ष काढला आहे; पण म्हणून प्रत्युत्तरादाखल त्यांच्या विरोधी गटातील विद्वानांची मते नोंदवून हा निष्कर्ष मोडीत काढण्याची माझी इच्छा नाही. रामायणाची निर्मिती बुद्धकाळाच्या आधीची आहे, असा माझा कयास आहे आणि त्याच्या पुष्टयर्थ मी महावीर, गौतमबुद्धांचे निष्ठावान मान्यताप्राप्त अनुयायी अश्वघोष यांचा संदर्भ देऊ इच्छितो. अश्वघोषांनी 'बुद्धचरित' या नावाचे भगवान बुद्धाचे कथात्मक चरित्र लिहिले आहे. वाल्मीकींनी अनुष्टुभ वृत्तामध्ये लिहिलेल्या रामायणाचा या चरित्राच्या पहिल्याच अध्यायात तपशीलवार उल्लेख आहे. तसेच प्रा. कांबळे यांनीच संदर्भ दिलेल्या 'दशरथजातक' या बौद्धग्रंथामध्ये असलेली जयद्दिसजातक आणि वेस्सन्तरजातक ही दोन जातकेही त्यांनी स्वतःच नीट तपासावीत. राम–सीतेच्या वनवासगमनाविषयी त्यामध्ये भूतकाळातील घटना म्हणून स्पष्ट उल्लेख आहे. 'दसरथजातका'तील रामकथेपेक्षा हे उल्लेख निराळे आहेत, मूळ वाल्मीकि रामायणातील सुसंगत आहेत, हेही त्यावरून उघड होते.

## राज्याचा राखणदार, साम्राज्याचा धनी नाही !

तेव्हा प्रा. कांबळे यांनी उभा केलेला 'रामायणातील संस्कृती-संघर्ष' हा असा आहे. एखाद्या टोलेजंग इमारतीचे बांधकाम हाती घ्यावे, त्या इमारतीला विविध बाजूंनी आधारासाठी टेकू लावावेत, वरती सुरेख छप्पर घालावे; पण मूळ पायातच इमारत खचलेली राहावी, तसा प्रकार इथे झाला आहे. प्रा. कांबळे यांनी तीव्र सांस्कृतिक-सामाजिक लढा चितारण्याचा मोठा आवेश आणला आहे. देशोदेशीच्या विद्वानांच्या मतांचे रंग त्यामध्ये मिसळले आहेत. संदर्भहीन आधारांचे टेकूही या लढ्याला दिले आहेत; पण त्याचे असलीपण सिद्ध होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या निःसंदिग्ध, भक्कम पुराव्यांचाच इथे अभाव आहे !

या पुस्तकाची एकूण रचना अशी आहे की, एखाद्या वाचकाने कोणताही पूर्वग्रह न ठेवता पुस्तक वाचून काढले तर त्याच्या डोक्यात केवळ गोंधळ उडाल्याशिवाय राहणार नाही. अचानक येणाऱ्या वावटळीसारखे विविध प्रकारच्या संदर्भ आणि विचारांचे लोट प्रा. कांबळे यांनी या पुस्तकात उभे केले आहेत. आणि त्यामागचा त्यांचा उद्देशही स्पष्ट आहे. एखादा सिद्धांत, मग भले तो किती का धक्कादायक असेना, सरळपणे, तर्कसंगतपणे वाचकासमोर मांडण्यासाठी या पुस्तकाचा प्रपंच केलेला नाही, तर वाचकाच्या मनात संभ्रम निर्माण करून त्याला भांबावून टाकण्याच्या हेतूनंच हे पुस्तक लिहिले गेले आहे. पुस्तकामध्ये नोंद घेण्यात आलेले विद्वान, विचारवंत आणि पुस्तकाच्या अखेरीस दिलेली संदर्भ-साहित्याची लांबलचक यादी याच तंत्राची निदर्शक आहे; परंतु डोके थोडे शांत ठेवून या वावटळीतून प्रा. कांबळे मांडू इच्छित असलेल्या मुख्य सिद्धांताच्या दिशेने वाटचाल केली तर अखेरीस पुन्हा एका पोकळीला सामोरे जावे लागते. अशी पोकळी की, जिथे फक्त निराशाच पदरी येते ! परंपरागत समजुती आणि संस्कारांना धक्का बसल्याचे दुःख नाही, पण हे धक्के खाल्ल्यानंतरही नव्या विचाराची पालवी फुटणारच नसेल तर वाळूची वादळे झेलत हे वाळवंट तुडवायचे कशासाठी ? भ्रमनिरासाची वेदना जरूर असते; पण त्याचबरोबर नव्या ज्ञानाचा आनंदही असतो. प्रा. कांबळे त्यांच्या पुस्तकातून ही वेदना तीव्र करत जात असल्याचा आभास काही काळ निर्माण होतो; पण नंतर मात्र ती वेदना नाही आणि नव्या ज्ञानाचा आनंदही नाही, अशी अवस्था येते व त्या अवस्थेतच पुस्तक खाली ठेवावे लागते.

हे असं का व्हावं ? केवळ प्रा. कांबळे यांची संशोधनाची पद्धत सदोष आहे म्हणून ? की त्यांच्याही डोक्यात काही तरी गोंधळ (अर्थात Confusion at a higher level ) असावा आणि त्याचे चटके वाचकालाही भोगावे लागले असावेत ? मला तसे वाटत नाही आपल्याला काय म्हणायचं आहे, काय मांडावयाचं आहे, याची पूर्ण कल्पना प्रा. कांबळे यांना असली पाहिजे. फक्त त्यात त्यांची चूक एवढीच की, त्यांनी हे सारं आधी मनात पक्कं केलं, नंतर त्या दृष्टीने सोईचे संदर्भ गोळा करण्यास सुरुवात केली, या संदर्भांची एक माळ तयार केली आणि ती वाचकांपुढे भिरकावून दिली. इथे पुन्हा आव असा की, ही अग्निफुले आहेत. झेपत असतील तर गळचात मिरवा, नाही तर दूर पळा !

अशा परिस्थितीत ' रामायणातील संस्कृती–संघर्ष ' हा विद्वत्ता-प्रचुर, सखोल संशोधनात्मक ग्रंथ राहूच शकत नाही. एखाद्या ग्रंथा-मुळे वाद निर्माण झाल्याने काही बिघडत नाही. किंबहुना, समाजाच्या वैचारिक विकासाला असे वाद पोषकच ठरतात; पण त्यासाठी ते त्याच पातळीवरून घातले गेले पाहिजेत. प्रा. कांबळे यांचा तसा हेतू दिसत नाही. सध्या राजकारणात स्वतःचं महात्म्य प्रस्थापित करण्या-साठी समोरच्या माणसावर चिखलफेक करण्याचं तंत्र सर्रास अवलं-बिलं जात आहे. दुर्दैवाने हेच तंत्र प्रा. कांबळे यांनी या पुस्तकाच्या रूपानं वैचारिक क्षेत्रातही आणलं आहे. त्यामुळं हे पुस्तक धक्का-दायक पण वस्तुनिष्ठ निष्कर्षांचा तर्कसंगत आविष्कार ठरत नाही, तर ती होते केवळ एक राजकीय चिखलफेक! अर्थात प्रा. कांबळे यांचे लक्ष्य असलेल्या गटावर त्याचा फारसा परिणाम होणार नाही. कारण अशा प्रसंगी कासवासारखं टणक पाठ करून निपचित पडून राह-ण्याचं धोरण या गटाने कायम स्वीकारलं आहे; पण प्रा. कांबळे यांना अभिप्रेत असलेल्या चळवळीला मात्र हे निश्चितपणे हानिकारक आहे. चळवळीचे उठावात रूपांतर होण्यासाठी आवश्यक असणाऱ्या तात्त्विक बैठकीचा पायाच अशा लिखाणामुळं ठिसूळ होण्याचा मोठा धोका आहे. प्रा. कांबळे यांनी तो वेळीच ओळखला पाहिजे.

पण मग अखेर रामायण म्हणजे आहे तरी काय ? माझ्या मते, ही एक आखीव–रेखीव पण सपाट नीतीकथा आहे. त्यामुळे त्यातील राम ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा एकाच दिशेने उंचच उंच बांधत नेली आहे. पूर्णत्वाला नेणाऱ्या आदर्शांचं वलय या व्यक्तिरेखेभोवती उभं करण्यात आलं आहे. त्याच्या छायेत इतर व्यक्तिरेखा हेतुतः खुज्या ठेवण्यात आल्या आहेत आणि अखेर या कथानायकाचीच दारूण शोकांतिका आहे. जगाला आदर्शांचा वस्तुपाठ घालून देण्याच्या धड-पडीमध्ये वैयक्तिक जीवन मात्र दुःखमय करून घेणारा राम या ठिकाणी भेटतो आणि कदाचित त्यामुळेच तो महान ठरतो.

या लेखामध्ये पूर्वीच म्हटल्याप्रमाणे हा राम एका विशिष्ट ब्राह्मणी संस्कृतीचा प्रचारक, संरक्षक जरूर आहे; पण त्या पलि-कडे त्याची उडी जाऊ शकत नाही. आपले जीवितकार्य पार पाडत असताना त्याचा संघर्ष होतो तो इथल्या शूद्र, आदिम जमातीशी नव्हे, तर त्याच्याइतक्याच, किंबहुना काकणभर जास्तच पराक्रमी आणि तपस्वीही असलेल्या राक्षसगणाशी ! रामायणामध्ये हा राक्षस-गण दुष्ट प्रवृत्तींचा प्रतिनिधी म्हणून उभा राहतो. त्यांचा विरोध ब्राह्मणी संस्कृतीला नाही. कारण खुद्द राक्षसाधिपती रावण आणि त्याचे अनुयायीही याच संस्कृतीचे आचरण करताना आढळतात. त्यांचा विरोध आहे तो फक्त या संस्कृतीमधील नीती आणि आद-र्शांच्या तत्त्वांना. या तत्त्वांचा पुरस्कर्ता राम त्यांना शत्रुसमान वाटतो व त्यातूनच संरक्षक राम आणि आक्रमक राक्षसगणाचा संघर्ष उभा राहतो.

रामायणातील संघर्षांचा अन्वयार्थ लावताना काही विद्वानांनी हा राजकीय संघर्ष असल्याचे मत व्यक्त केले आहे. भारतामध्ये आलेल्या आर्यांचा प्रतिनिधी राम येथील मूळ रहिवासी असलेल्या अनार्यांना मागे मागे रेटत नेतो आणि आर्य-संस्कृतीची प्रस्थापना करतो, असे प्रतिपादन या संदर्भात केले जाते; पण अशा कार्यासाठी आवश्यक असणाऱ्या विजीगिषुत्वाच्या भावनेचाच अभाव रामाच्या व्यक्ति-रेखेमध्ये सतत जाणवतो. कथानायक असल्याने तो कुठेही पराभूत होत नाही, हे खरे असले तरी अगदी रामायणातील राम-रावण युद्धाचा प्रसंग वाचतानाही निःपक्षपाती मनाला रावणाचीच व्यक्ति-रेखा जास्त प्रभावित करते. आव्हान देण्याची, पेलण्याची आणि त्या साठी प्रसंगी प्राणांची बाजी लावण्याची जिगर या व्यक्तिरेखेमध्ये आहे. रामाच्या सर्व हालचाली, हल्ले आणि विजयामध्येही हिशेबी धोकेच ( calculated risks ) प्रकर्षाने जाणवतात. अशा वृत्तीचा माणूस राज्य राखू शकतो, साम्राज्याचा धनी होऊ शकत नाही.

मला जाणवलेलं रामायण हे असं आहे. मानवी भावनांचा उद्रेक इथे नाही, विचारांचा कल्लोळ नाही. यशाचा धुंदपणा नाही, अप-यशाची दारूणता नाही. एखाद्या थंडगार दिवाणखान्यातल्या भिंती-वर पसरलेल्या सुंदर निसर्गचित्राची विलोभनीयता इथे असेल कदा-चित, पण प्रत्यक्ष निसर्गातल्या कोमलतेच्या आणि रौद्रतेच्या आवि-ष्काराची अपेक्षा मात्र इथे धरता येणार नाही ! □

रामायणातील संस्कृतिसंघर्ष
प्रा. अरुण कांबळे
पँथर प्रकाशन, मुंबई
पृष्ठे– ८० / मूल्य वीस रुपये

**[ या लेखातील वाल्मिकी रामायणाचे मूळ संदर्भ जुळवताना श्रीरामकोश मंडळातील अभ्यासक कु. निर्मला कामत यांचे विशेष साहाय्य झाले. ]**




# दत्ता भटांची एक्झिट

पृष्ठ ४ वरून

आणि म्हणायचे, 'कुणी घर देता का घर, एका तुफानाला, कुणी घर देता का घर ?' त्यांचे हे स्वगत एक तुफानपण घेऊनच यायचे. त्याबरोबरच त्या गद्यकाव्यातील आंतरिक लयीने सारी व्यथा आपल्यापर्यंत धाडकन येऊन आदळायची. इतकी जबरदस्त ताकद त्यांच्या शब्दोच्चारात असायची !

## बहुरूपी

भटांची अशी किती तरी रूपे आठवतात. 'भोवरा', 'रातराणी', 'मेजर चंद्रकांत', 'माता द्रौपदी', 'सूर्यास्त', 'अखेरचा सवाल', 'तो मी नव्हेच' अशा गंभीर नाटकांतून ते भेटले. तर 'विदूषक'मधले रावसाहेब, 'भल्याकाका' मध्ये पोलीस म्हणून भेटले. खानोलकरांच्या 'आपुले मरण देखिले म्या डोळा' या दीर्घांकामध्ये ज्यांनी भटांना पाहिले असेल (दूरदर्शनने दोनदा हा दीर्घांक दाखवला होता) त्यांना भटांची स्थितप्रज्ञता आणि गतिमान सजीवता यातून अभिनयाचे दर्शन कसे घडते याचा प्रत्यय आलाच असेल. असाच प्रत्यय त्यांच्या अनेक चित्रपटांपैकी (एकूण २९ चित्रपट) 'सिंहासन'मधील माणिकराव या भूमिकेचा आलेला आहे.

नटाचे शेवटी नाटक शिल्लक राहते. भटांच्या बाबतीत तर ते शंभर टक्के खरे आहे. नट म्हणून त्यांना आकर्षक देहयष्टी नव्हती. आकर्षक चेहरेपट्टी नव्हती. त्यांना एरवी ज्यांनी पाहिले असेल त्यांना ते खलनायक वाटावेत अशी चेहऱ्याची ठेवण होती. विशेषतः डोळे, भिवयांची जाडी आणि वक्रता त्याजवळ जाणारी होती; पण भटांनी स्वतःला कोणत्याही एका पद्धतीच्या भूमिकेमध्ये अडकवून घेतले नाही. ते नायक झाले, खलनायक झाले, चरित्र-अभिनेते बनले, अगदी छोट्या भूमिकेतूनही सर्वांना सामोरे गेले. त्यांनी आपल्या चेहऱ्याच्या उणीवा आवाजाने, अभिनयगुणांनी आणि प्रतिभास्पर्शाने भरून काढल्या. त्यामुळेच ते अनेक प्रकारच्या भूमिकांचे आव्हान पेलू शकले.

## तुफानपण नडलं ?

भटांची अभिनय-ताकद विलक्षण होती, त्यामुळे त्यांना कोणी छोटी भूमिका करायला सांगितली तर ते संतापत, अस्वस्थ होत. अशीच एकदा 'राजमुकुट' नाटकात त्यांना न पटणारी भूमिका देण्याचा प्रयत्न झाला. त्यावर वि. वा. शिरवाडकरांनी केलेले भाष्य त्यांच्याच शब्दात पाहण्यासारखे आहे. शिरवाडकरांनी म्हटले आहे, 'प्रवाद आहे की, भट न पटणाऱ्या भूमिका स्वीकारीत नाहीत. राजमुकुट या माझ्या नाटकात एक भूमिका करण्यास त्यांनी नम्रपणे नकार दिला. मला वाटतं भटांचंच बरोबर आहे. या प्रसंगी एका श्लोकाची आठवण येते. त्याचा मथितार्थ असा—सोन्याला भट्टीत घालतात त्याचं दुःख होत नाही, ऐरणीवर ठोकतात त्याचं दुःख होत नाही. त्याचं दागिन्यात रूपांतर करताना सोन्याला मनस्वी यातना होतात, त्याचंही दुःख होत नाही; पण जेव्हा त्याची तुलना गुंजेबरोबर केली जाते तेव्हा मात्र सोन्याला अपार दुःख होतं ! भटांना गुंजेबरोबर तोलून घ्यायचं नव्हतं आणि नाही, हे आपण लक्षात घ्या !

सोन्याच्या किमतीचा हा गुणी नट एरवी मात्र खूपच व्यग्र असायचा, अस्वस्थ असायचा. त्यांनी आत्मवृत्तात म्हटले आहे की, 'मी बहुतेक बाबतीत दुर्दैवी ठरलो असलो तरी मित्रांच्या बाबतीत सुदैवी ठरलो आहे.' ही गोष्ट मात्र खरी आहे. त्यांना उदंड मित्र मिळाले. वामनराव पुरोहित, तात्यासाहेब शिरवाडकर, विश्राम बेडेकर यांच्यासारखे स्नेहतुल्य मार्गदर्शक लाभले. यांच्याच सहवासात भट घडत गेले. भटांना वाचनाचे, त्यातही इंग्रजी पुस्तकांच्या वाचनाचे प्रचंड वेड होते. इंग्रजी-हिंदी चित्रपट पाहून त्यातले संवाद तोंडपाठ करायचे वेड होते. चार्ली-चॅपलिन हा तर त्यांचा जिवाचा सखा होता. त्याचे आत्मवृत्त भटांनी मराठीत लिहिले 'जेथे जातो तेथे' आणि 'गरिबी हटाव' ही दोन नाटके लिहिली. 'जहाले मृगजळ आता जलमय' हे आत्मवृत्त लिहून थाटात प्रकाशित केले. १९८३ चा संगीत नाटक अकादमीचा पुरस्कार त्यांना लाभला. तरीही त्यांची 'कलात्मक व्यग्रता आणि अस्वस्थता कमी झाली नाही !

भटांच्या कलात्मक आयुष्याचा वेध घेताना त्यांच्याच एका स्वगतातील (नटसम्राटमधील) ओळी आठवतात — 'तुफानाला त्याचं तुफानपणच नडलं ...!' असं तर त्यांच्या बाबतीत झाले नसेल ना ? पण हे तुफान आता थंडावले आहे. या नट-तुफानाने नेहमीच्या रंगभूमीवरूनच नव्हे तर जगाच्याच रंगभूमीवरून कायमची एक्झिट घेतली आहे. नव्या रंगभूमीवर नव्या भूमिकेत प्रवेशण्यासाठी; पण ही एक्झिट आपल्याला महागाची ठरली ! फारफार महागाची ठरली ! !

—वि. भा. देशपांडे

अलिप्तपणे तरी भेदकतेने
घडवलेले बिहारच्या
माणसाचे दर्शन.

**पूर्णिया**
अनिल अवचट
बारा रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

राष्ट्रवादी भूमिकेतून
नव्या क्षितिजांचा
घेतलेला शोध.

**बलसागर**
श्री. ग. माजगावकर
तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

# नाट्यपंढरी



## □ 'खास लोकाश्रयाखालील'

एक काळ असा होता की, या मराठी मुलखात पंधरा–वीस नाटकमंडळ्यांचा संसार सुखाने चालला होता. त्यात गंधर्व, ललितकला, बलवंत, यशवंत अशा बड्या कंपन्या होत्या, तशाच 'आनंदविलास,' 'भारतभूषण' 'देशबंधू' 'प्रभात संगीत' यासारख्या छोट्या कंपन्याही अनेक होत्या. शिवाय 'शाहू नगरवासी' नि 'महाराष्ट्र' या प्रोज कंपन्याही होत्या. या काळात बहुतेक सर्व नाटकमंडळ्यांना संस्थानिकांकडून काही ना काही मदत मिळतच असे. संस्थानात मुक्काम असला की, सरकारी शिधा, कपडा-लत्ता कार्यकारणाने आर्थिक मदतही होत असे.

बडोद्याचे महाराज श्रीमंत सयाजीराव गायकवाड, यांनी वर्षासन देऊन एखाद्या नामवंत कंपनीचे खेळ दरवर्षी बडोद्यात करण्याची एक योजना आखली. या योजनेनुसार गंधर्व, ललितकला आदी कंपन्यांकडे विचारणा झाली. गंधर्व मंडळीने पाच हजार रुपयांची मागणी केली. केशवरावांनी दहा हजार रुपये मानधनाची मागणी केली. महाराजाकडून मागणीचा तपशील मागविण्यात आला. तेव्हा केशवरावांनी कळविले की, कंपनीला आपला दर्जा आणि श्रीमंतांचा लौकिक संभाळण्यासाठी कमीत कमी इतके मानधन हवेच! अर्थातच केशवरावांची मागणी मान्य झाली नाही नि गंधर्व मंडळीला राजाश्रय लाभला. 'श्रीमंत सयाजीराव गायकवाड यांच्या आश्रयाखालील' असा तिचा उल्लेख होऊ लागला.

बादशाही थाटाच्या गंधर्व नाटक मंडळीने अवघ्या पाचच हजारांची मागणी केली. यामागे सुद्धा एक विशिष्ट हेतु होता असे म्हणतात. कारण 'किर्लोस्कर' सारख्या श्रेष्ठ नि मान्यवर संस्थेतून बाहेर पडल्यावर आपण कितीही गुणी असलो, तरी आपल्यावर लोकांची टीका होणारच याची गंधर्व–टेंबे–बोडस यांना कल्पना असावी. म्हणूनच 'मातृसंस्थेशी बेइमान झालेले' असे लोकांनी बोट दाखवून सांगताना, त्यांचा हात खाली जावा नि तोंड बंद व्हावे, म्हणूनच सयाजीरावांसारख्या लोकप्रिय राजाने जवळ केलेल्या संस्थेवर कोण टीका करणार ?

यानंतर ग्वाल्हेरच्या शिंदेसरकारांनी 'ललितकलादर्श'ला आश्रय देण्याची इच्छा व्यक्त केली. त्या वेळी आमची कंपनी 'लोकाश्रयाखालील' आहे असे मॅनेजर शितूत म्हणाले. पुढे ही योजना केशवरावांना कळवून काही खेळ करण्यासाठी ग्वाल्हेर-दरबारचे रीतसर निमंत्रणही आले. केशवरावांनी आपली कंपनी 'खास लोकाश्रयाखालील' आहे असे नम्रपणे दरबारला कळविले. मात्र तितक्याच आदराने महाराजांच्या वाढदिवसानिमित्त खेळ करण्याचे मानाचे आमंत्रण त्यांनी स्वीकारले. या वेळेपासून 'लोकाश्रयाखालील ललितकलादर्श मंडळी' अशी आवर्जून जाहिरात करण्याचा पायंडा पडला !

असे सांगतात की, केशवराव अशा राजाश्रयाच्या विरुद्धच होते. कारण केशवराव स्वतः कोल्हापूरचे. श्रीमंत शाहूमहाराज रसिक नि आश्रयदाते म्हणून त्यांचा लौकिक-पण केशवरावांचे व्हावे तसे कौतुक महाराजांकडून सुरुवातीला झाले नाही, याची केशवरावांच्या मनी अढी होती. म्हणूनच त्यांच्या मनाने पक्के घेतले होते की, पैसे देऊन खेळ बघायला येणारे प्रेक्षक हेच आपले खरे चहाते–आश्रयदाते ! (बालगंधर्वांच्या भाषेत–मायबाप !) म्हणूनच 'खास लोकाश्रयाखालील' हे बिरुद त्यांनी भूषविले.

## □ बरोबर रात्री ९ वाजता !

नाट्यव्यवसाय सर्वतोपरी उत्तम चालावा, नाटक यशस्वी नि लोकप्रिय होण्याच्या दृष्टीने नित्य नूतन गोष्टी कराव्या अशी केशवराव भोसल्यांची दृष्टी होती. नाटकाच्या प्रयोगसुद्धा जाहीर केलेल्या वेळेवरच सुरू झाला पाहिजे असा त्यांचा कटाक्ष असे. तो काळ वेळेचे भान न राखता सर्वच व्यवहार थंडाईने चालण्याचा होता. त्यामुळे नाटक दिलेल्या वेळी सुरू होणे हे सुद्धा नवल समजले जाई. कधीकधी ते अडचणीचे मुद्दा होई. 'ललितकलादर्श'चा मुक्काम सांगली संस्थानात होता. दिवाणांकरवी आज महाराज नाटकाला येणार, असा निरोप आला. नाटकाची वेळ होत आली तशी श्रीमंतांची स्वारी येण्याची चिन्हे दिसेनात. आता काय करायचे, हा केशवरावांपुढे प्रश्न होता. नाटक सुरू केले नाही तर आपला नियम मोडणार, केले तर महाराजांचा अपमान होणार ! केशवराव स्टेजवर येरझारा घालीत होते. पडदेपटाच्या माणसाला वाटले, की महाराज येईपर्यंत काही नाटक सुरू होत नाही. तो थोडा ढिला राहिला तोच केशवराव कडाडले, 'वेल दे !' पडदा वर गेला. नांदीचे सूर निनादले. खुद्द केशवरावच नांदी म्हणत होते. केशवरावच असल्याने प्रश्नच नव्हता. नांदी लावली हे प्रेक्षकांच्या लक्षातच आले नाही. तोच सरकारस्वारी आपल्या लवाजम्यानिशी थिएटरात आली. नांदी आवरती घेतली नि खेळ सुरू झाला. पडदा वेळेवर उघडला म्हणून प्रेक्षक खूष नि खेळ आपण आल्यावर सुरू झाला म्हणून महाराज संतुष्ट !

नाटक वेळेवर सुरू करण्याचे व्रत स्वतः केशवरावांनी तर पाळलेच; पण त्यांच्यानंतर बापूसाहेब पेंढारकरांनीही आपल्या कारकीर्दीत कसोशीने पाळले ! आजही त्यांचे चिरंजीव भालचंद्र पेंढारकर ते व्रतपालन अगदी निष्ठेने करीत आहेत. पेंढारकरांचे नाटक ना, ते नऊ म्हणजे नऊच्या ठोक्यालाच सुरू होणार !' हे गृहीत धरून प्रेक्षक त्यांच्या नाटकाला जातात.

सहज आठवलं की, 'नटसम्राट'ची सुरुवात ज्या स्वगताने होते, त्याची सुरुवातीची वाक्ये, केशवराव–बापूराव यांच्या वक्तशीरपणाचे कौतुक करण्यासाठी कविवर्य शिरवाडकरांनी लिहिली असावीत.

... खरं म्हणजे वक्तशीरपणा आमच्या अंगात अगदी नाटकाइतकाच भिनलेला आहे. आपल्याला ठाऊक असेल, आमच्या कंपनीची शिस्त अशी होती की, तिसरी घंटा नऊ वाजता म्हणजे बरोबर नऊ वाजता! एकवीस वर्षे कंपनीच्या नाटकाचा पडदा वर गेला, तो बरोबर आठ वाजून साठ मिनिटांनीच ! एकसाष्टावं मिनिट त्या पडद्याने वर जाताना कधी घड्याळात बघितलंच नाही ! ...'

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28


फॅब धुलाई नजरेत भरते...



फॅब धुलाई दरवळत राहते!







नवीन लेमन फॅब

बोरॅक्स युक्त

डिटर्जंट वडी




आता आपल्यासाठी भारतात प्रथमच!
लेमन बोरॅक्सचा प्रभावी फॉर्म्युला या डिटर्जंट वडीमधे.
लेमन फॅब बोरॅक्स युक्त डिटर्जंट वडीमधील
धुलाईची शक्ती इतर कोणत्याही साधारण वडी पेक्षा
अधिक जास्त आहे.
फॅबचा खोलवर मुरणारा फेस अगदी तेलकट आणि
चिवट डाग सुद्धा साफ धुवून टाकतो. कपडे अधिक
शुभ्र-चमकदार आणि खरोखरच स्वच्छ धुतले जातात.
फॅब धुलाई नजरेत भरते...
फॅब धुलाई दरवळत राहते!

**नवीन लेमन फॅब बोरॅक्स युक्त.
स्वच्छ धुलाईसाठी साधारण वडी पेक्षा
अधिक शक्तिशाली!**

कोलगेट- पामऑलिव्हचे दर्जेदार उत्पादन

फक्त महाराष्ट्र राज्यात उपलब्ध.

GKBE.B.84.2 Mar.